# माणूस

शनिवार
२० मे १९७२
पन्नास पैसे



“...मी सरकारी अधिकाऱ्यांना बजावून सांगितलं. म्हटलं,
‘ही संपत्ती माझ्या ‘मेरा देश’ चित्रपटातून मिळालेली आहे’.”

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | २० मे १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | एकावन्न | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे


सप्रेम नमस्कार....

□ अलिकडल्या काही अंकामधून कोर्टकथा, खूनकथा वाचाव्या लागल्या आणि त्याही डोळघावर येतील इतक्या. अर्थात अधूनमधून रुचिपालट म्हणून ठीक. पण हा असा इतका मारा ?

'माणूस'मध्ये एवढ्या प्रमाणावर हा प्रकार काही बरा वाटत नाही. मराठीमध्ये केवळ या विषयासाठी वाहिलेली नियतकालिके थोडी नाहीत. असो. आपल्या संपादनकौशल्यावर अनेक वाचकांप्रमाणे माझाही विश्वास आहे. राग धरू नये. गेल्या दोन-तीन अंकांत 'शतपावली' थांबलेली आढळली. चुकल्या चुकल्यासारखे वाटले. 'कविता' अजिबातच बंद की काय ?
सौ. पुष्पा भावे 'रंगभूमी' सदर समर्थपणे रंगवतात. कुठल्याही पूर्वग्रहदूषित दृष्टीने नाटयकृतीचे मूल्यमापन करताना त्या आढळत नाहीत. एका प्रगल्भ पातळीवर आपल्याबरोबर वाचकाला पण त्या सहज घेऊन जातात. एवढया तोलामोलाचे परिक्षण सध्यातरी दुर्मिळच म्हणावे लागेल.


साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

सौ. पुरंदरे यांच्या 'स्नेहयात्रे'बद्दल उत्सुकता लागून राहिली आहे.
मध्यंतरी आपण जाहीर केलेली श्री. विजय तेंडुलकरांची लेखमाला (दॅट वूमन— ती बाई) केव्हा सुरू करणार ?

२४ एप्रिल, १९७२ — मोहन मुळे, नागठाणे (सातारा)

□ आपला माणूस दि. २९ एप्रिलच्या अंकातील झुंजार वृत्तप्रतिनिधी श्री. अनिल बर्वे यांचा "स्वदेशी वसाहतवादाचा बळी : मराठवाडा" हा लेख आवडला. शीर्षक एकदम उत्कृष्ट आहे. लेख थोड्या काळाचे वास्तव्यात लिहिला असल्यामुळे सविस्तर मागण्या येऊ शकल्या नाहीत.

तरी पण माणूस मराठवाड्यास न्याय मिळऊन देईल अशी खात्री आहे.

२९ एप्रिल, १९७२ — प. रा. प्रयागी, उस्मानाबाद

---

## नवे प्रयोग खर्चाच्या ओझ्याखाली दबले जाऊन केवळ रंजन

---

सप्रेम नमस्कार

श्री. गोविंद पुरुषोत्तम देशपांडे यांचा 'माणूस'च्या एप्रिलच्या अंकात आलेला लेख वाचला. मराठी रंगभूमीच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या छोट्या नाटचगृहाच्या निर्मितीसंबंधीचे विचार योग्य वेळी आणि योग्य शब्दात मांडल्याबद्दल श्री. गोविंद देशपांडे यांचे आणि ते प्रसिद्ध केल्याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन करतो.

शेतीच्या विकासाला जशी छोटी प्रायोगिक क्षेत्रे लागतात तशीच नाटकासारख्या संघकलेच्या विकासालाही छोटी नाटचगृहे हवीत. सुदैवाने नाटकाच्या क्षेत्रात लेखनाचे, आविष्काराचे नवे प्रयोग करणारी मंडळी आज महाराष्ट्रातल्या बऱ्याचशा प्रमुख शहरांतून आढळून येतात. सरकारी नाटचस्पर्धांमुळे हा उत्साह निर्माण झाला आहे. विशेष आनंदाची गोष्ट अशी, की त्यातील काही नटनटींनी व्यावसायिक रंगभूमीवरही यश मिळवून हौशी आणि व्यावसायिक रंगभूमीमधील अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. व्यावसायिक रंगभूमीला काही तडजोडी अपरिहार्यपणाने स्वीकाराव्या लागतात. त्या तडजोडींचे प्रमाण वाढू न देण्याचे कार्य अशा कलावंतांकडून होत असते. व्यावसायिक रंगभूमीचा आश्रयदाता मोठ्या प्रमाणात असला तरी प्रायोगिक रंगभूमीवरही काय चालले आहे याविषयी जागरूक असलेला प्रेक्षक महाराष्ट्रात निर्माण होतो आहे. अशा वेळी केवळ आर्थिक ताणामुळे हे नवे प्रयोग करणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. हा ताण कमी करण्यासाठी

तीनशे-साडेतीनशे प्रेक्षकांपुरते मर्यादित सभागृह असलेल्या ठिकाणी हे प्रयोग होतील, ते प्रयोग उभे करण्यासाठी थिएटरचे भाडे व लागणारा अन्य खर्च कमी होईल अशी सोय होणे आवश्यक आहे. स्वतःची कलाविषयक अभिरुची जी बनली ती बनली, आता ती उगीच तपासून, आपल्या रसिकतेचे आत्मपरीक्षण न करता चार घटका मजेत गेल्या की झाले, हे मानणारा नाटकाचा प्रेक्षक नाटकधंद्याला कदाचित बरकत आणीत असेल, परंतु त्यातून कलेचा विकास होत नाही. नाटक हे गर्दीसाठी असते हे खरे. परंतु गर्दीगर्दीत फरक असतो. 'मनोरंजन', मजेत वेळ घालवणे' यापलीकडेही ह्या कलांच्या क्षेत्रात काही असते असे मानणाऱ्या माणसांचा समूह समाजात असतो. एखाद्या राष्ट्राच्या कलाविषयक कामगिरीचा अंदाज तिथल्या केवळ लोकप्रिय मनोरंजनाच्या प्रकारांतून घेतला जात नाही. रुळलेल्या वाटां-पलीकडे जाण्याची जिद्द असलेले कलावंतच ह्या कामगिरीचे दर्शन घडवीत असतात. रॉबर्ट ब्रूस्टाइन नावाच्या एका चांगल्या नाट्यसमीक्षकाने 'ए कंट्री विदाउट ए

---

**करणारेच नाट्यप्रयोग चालू राहावेत हे योग्य नाही. –पु. ल.**

---

थिएटर इज ए कंट्री विदाउट ए सोल' असे म्हटले आहे. ह्या आत्म्याचे चैतन्य नवे नवे प्रयोग करण्याची त्या देशाची काय धडपड चालली आहे. यावरून दिसत असते. निसर्गातल्या चमत्कारांना 'नमस्कार' करून विज्ञानाची वाढ झाली नाही. मानवी व्यवहारात सतत चालणाऱ्या उलथापालथीकडे नुसती मान वाकवून चालत नसते. मानवी व्यवहार, त्याची भाषा, त्या व्यवहारांचे आविष्कार ठरल्या शब्दांचा आणि घटनांचा आश्रय घेऊनच दाखवीत राहणे कलावंताला मानवत नसते. नव्या सामाजिक, कौटुंबिक, राजकीय खळबळींचे दर्शन जर नव्या स्वरूपात, भाषांचे जुने संकेत मोडून, अभिनयाचे ठोकबंद आडाखे तोडून रंगभूमीवर आले नाहीत तर ते समाजातल्या मंदपणाचे द्योतक म्हणावे लागेल! केशवसुतांनी औचित्याच्या विवेकाला फोल म्हटले ते ह्याच जाणिवेतून. औचित्याचा अर्थ जेव्हा 'चाकोरी' असा व्हायला लागतो त्यावेळी औचित्य, परंपरा, संस्कृती वगैरे शब्द कातडी बचावण्यासाठी केलेल्या ढालीसारखे होतात. साहित्य किंवा इतर कलांमधले नवे दर्शन सदैव डोळ्यांना उथळ सुख देणारेच असते असे नाही. बहुधा ते नसतेच. कधी कधी ते पीडादायकही होते. साधी शाळेला जायला निघालेली मुलगीदेखील एकेकाळी संस्कृतीची भांग चढलेल्या डोळ्यांना पीडादायक झाली होती. ही पीडा होणेही अस्वाभाविक नाही. परंतु त्या नव्या दृश्यांतून घडणाऱ्या मानवी जीवनातल्या एखाद्या अप्रकाशित पैलूचे दर्शन समाजाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने मोलाचे मानले पाहिजे. सर्वसामान्य लोक ही पीडा कलेच्या संदर्भात सहन करायला सहजासहजी

राजी होत नाहीत. कारण त्यांच्या लेखी कलांचा आस्वाद हा तापल्या जीवाला थंडगार सरबताप्रमाणे घ्यायचा असतो एवढेच असते ! म्हणून रुळल्या वाटा सोडून जाणारांमागे लोक जात नाहीत. नाटकासारख्या इतर कलांच्या मानाने अधिक खर्चाच्या कलाप्रयोगाला मूळ धरणेच अशक्य होते. केवळ प्रचंड गर्दीचा पाठिंबा नाही म्हणून हे प्रयोग मुळातच आर्थिक दृष्टचा अशक्य करून टाकणे म्हणजे विकासाची मुळीच उपटून टाकण्यासारखे आहे. आज सुदैवाने महाराष्ट्रात ह्या नव्या प्रयोगांविषयी जोराचे विचारमंथन चालले आहे. मला ह्या प्रयोगांना लाभणाऱ्या थोड्याफार सहानुभूतीइतकाच विरोधही मोलाचा वाटतो. कारण त्यातून ' नाटक ' नावाच्या कलाप्रकाराविषयींची आस्था आढळून येते. नाटकाला एक कलाप्रकार म्हणून फार मोठी मान्यता देणारा समाजच आपली आवड आणि नावड जोरदार रीतीने व्यक्त करतो. परंतु नवे प्रयोग खर्चाच्या ओझ्याखाली चुकीच्या औचित्यविचाराखाली दवले जाऊन केवळ लोकांचे रंजन करणारेच नाट्य-प्रयोग चालू राहावेत असे म्हणणे योग्य नव्हे. मनोरंजनाला मी कधीही गौण मानीत नाही. त्यालाही कसब लागते. परंतु नाटकाने केवळ कसबांतून मिळणाऱ्या मनोरंजनावरच समाजाला गुंगवीत ठेवणे बरोबर होणार नाही. म्हणून जिथे आर्थिक बोजा फारसा नसेल अशा छोटचा नाटचगृहाची केवळ अव्यावसायिकच नव्हे, तर व्यावसायिक रंगभूमीच्या विकासाच्या दृष्टीनेही आवश्यकता आहे. ही गरज श्री. गोविंदराव देशपांडे यांनी मांडल्याबद्दल पुन्हा एकदा त्यांचे अभिनंदन करतो. सरकार आणि नगरपालिकांनी त्यांच्या विचारांना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

९ मे, १९७२, पु. ल. देशपांडे, मुंबई

# ललित चौकशा

## नाझी....
## कानिटकर
## माणूस

संदर्भ : ललित मासिक. मे १९७२ अंक. 'चौकशा' या सदरात
श्री. ज. जोशी यांनी घेतलेली वि. ग. कानिटकर यांची मुलाखत.
पृष्ठ १८.
विषय : 'नाझी भस्मासुराचा उदयास्त' या पुस्तकावर लेखक
वि. ग. कानिटकर यांना 'माणूस'कडून मिळालेले पैसे.

या विषयासंबंधी श्री. कानिटकर यांनी आपल्या मुलाखतीत म्हटले आहे : पैशा-संबंधी म्हणाल तर 'माणूस'मधील दोन वर्षे चाललेली लेखमाला आणि पहिली आवृत्ती या दोहोंचे मिळून मला फक्त रु. १८००।– मिळाले. करा हिशोब! दुसऱ्या आवृत्तीस जरा बरे पैसे मिळालेत.

'माणूस'चा संपादक व 'माणूस' ज्या राजहंस प्रकाशन संस्थेमार्फत प्रकाशित होतो त्या संस्थेचा घटक म्हणून याबाबतची वस्तुस्थिती 'पूर्णपणे' लोकांसमोर ठेवणे कानिटकर यांच्या या जाहीर मुलाखतीमुळे मला आता क्रमप्राप्त झाले आहे.

ललित मासिकाकडेही मी हा खुलासा पाठवू शकलो असतो. पण 'माणूस'शी संबधित असल्याने हा येथे प्रकाशित करणे मला अधिक सोयीचे वाटत आहे.

कानिटकर यांच्या वरील उद्गारांवरून असे दिसते, की त्यांना नाझी लेखमाला व पहिली आवृत्ती यापोटी 'माणूस-राजहंस'कडून दिल्या गेलेल्या पैशासंबंधी असमाधान आहे. नाराजी आहे. आपल्याला कमी पैसे मिळाले, याची खुबीने त्यांनी येथे नोंद केलेली आहे. माझा यावर सरळ प्रश्न असा, की अशी नाराजी होती तर त्यांनी कराराला मान्यता द्यायच्या वेळीच ही आपली भूमिका स्पष्ट का केली नाही? मागाहून आणि तीही जाहीरपणे ही नाराजी व्यक्त करणे व्यावसायिक संकेतांना कितपत धरून आहे?

घडत गेले ते असे. चार ते सहा मोठे लेख होतील अशी सुरुवातीची कल्पना. कानिटकरांजवळ हा विषय काढण्यापूर्वी अशोक शहाणे यांचेजवळही मी हा विषय

बोललो होतो. त्यावेळीही लेखसंख्या एवढीच गृहीत धरलेली होती. पण कानिटकर विषयात रंगले. वाचकांनीही लेखमालेला भरघोस प्रतिसाद दिला. शेवटी बत्तीस की चौतीस लेख होऊन हा विषय संपला.

लेखमाला संपेपर्यंत पैशाचा विषयच निघाला नाही. रोज आम्ही भेटत असू. चर्चा करीत असू. पण इतर विषयांवर किंवा लेखमालेवर.

लेखमाला संपली आणि काही दिवसांनतर कानिटकरांनी पुस्तकाचा विषय काढला. 'माणूस-राजहंस 'चे ते अडचणींचे दिवस होते. एवढे मोठे पुस्तक प्रकाशित करणे त्यावेळी आमच्या आवाक्याबाहेरचे काम होते. त्यामुळे आमचा जवळजवळ नकार समजून कानिटकरांनी इतरत्र खटपटीला सुरुवात केली.

एके ठिकाणी जमले. माणूस अंकात प्रसिद्ध झालेले शंभरएक ब्लॉक्स थोडेफार पैसे घेऊन या प्रकाशकांना द्यावेत अशीही तोंडी बोलणी झाली.

आणखी काही दिवस गेले आणि या प्रकाशकांचा उत्साह मावळला. या प्रकाशकांकडून चालढकल होते आहे असे दिसल्यावर कानिटकरांनी पुन्हा माझेजवळ हा विषय काढला.

हे मी अशासाठी सांगत आहे, की लेखमाला गाजली तरी तिचे पुस्तक व्यावसायिक दृष्ट्या यशस्वी ठरतेच असा काही या क्षेत्रातील सार्वत्रिक अनुभव नाही. असा अनुभव असता, आणि नाझी पुस्तकातून भरपूर द्रव्यलाभाची खात्री असती तर कुठल्याही प्रकाशकाने अशी चालढकल केली नसती.

कानिटकरांनी पुन्हा माझेजवळ हा विषय काढल्यानंतर मी थोडीफार आर्थिक जमवाजमव करून पुस्तक राजहंस प्रकाशनतर्फे प्रकाशित करण्याचे ठरविले.

यानंतर प्रश्न आला पैशाचा. लेखमालेपोटी किती रक्कम धरायची आणि पुस्तकाचा व्यवहार कसा ठरवायचा यासंबंधी आम्ही कानिटकरांच्या घरीच बोलणी केली.

लेखमालेपोटी सात-आठशे रुपये व तेवढेच पुस्तकापोटी अशी माझी सूचना होती. त्यांनी त्यात दोनशेची वाढ केली. अगदी खुशीने हा त्यावेळी एकूण अठराशे रुपयांचा व्यवहार झाला. तसा लगेच करारही करण्यात आला.

पुढे पुस्तकछपाईला सुरुवात झाली. पहिला अंदाज चुकला व पुस्तक अपेक्षेपेक्षा मोठे झाले. व्यवहार करताना डोळ्यासमोर असलेली अठरा रुपये ही किंमत वाढवावी लागली. नवीन किंमत पंचवीस ठेवली.

परंतु या नवीन बदलाचा कानिटकरांशी केलेल्या करारावर काहीच परिणाम होण्याचे कारण नव्हते. कारण पुस्तकाच्या खपावर अवलंबून असणारा, त्याप्रमाणे कमीजास्त होणारा रॉयल्टीचा पर्याय न निवडता कानिटकर सुरुवातीलाच ठराविक रक्कम पत्करून मोकळे झालेले होते. रॉयल्टीचा पर्याय स्वीकारण्यात प्रारंभी धोका असतो. तो कानिटकरांनी टाळलेला होता.

पुस्तक खपू लागले आणि कानिटकरांनी एक दिवस विषय काढला, की त्यांना सातशे रुपये अधिक मिळायला हवेत. किंमत अठराची पंचवीस झाली म्हणून मोबदलाही अठराशेचा पंचवीसशे करावा अशी त्यांची मागणी होती.

मी सांगितले, कानिटकर आपले मैत्रीचे संबंध लक्षात घेता व नाझीला नंतर मिळालेला लोकाश्रय पाहता मी आपल्या इच्छेला मान द्यायला जरूर तयार आहे. पण आपण 'हक्क' म्हणून 'मागणी' करता आहात ती योग्य नाही. आपला व्यवहार ठरल्याप्रमाणे पूर्ण झालेला आहे.

या मुद्यावर गाडे अडले आणि मी पाठविलेला सातशे रुपयांचा चेक कानिटकरांनी परत केला.

ही सर्व नाझी लेखमालेची व पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीची आर्थिक पार्श्वभूमी आहे.

लेखमाला व पहिली आवृत्ती यासंबंधीची आर्थिक बोलणी करताना कानिटकर अननुभवी होते असे म्हणावे का? त्यांचे अनेक लेख, गोष्टी सर्वत्र त्यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या होत्या. दोन तीन पुस्तकेही निघाली होती. प्रकाशकांचा व प्रकाशन व्यवसायाचा त्यांना अनुभव होता. स्वत: त्यांनीही एक पुस्तक प्रकाशित केलेले होते. शिवाय कानिटकर हे भोळेभावडे व सहज आंधळेपणाने कुठलाही व्यवहार करणारे गृहस्थ नाहीत. त्यांनी सर्व साधकबाधक विचार करूनच अठराशे रुपयांच्या करारावर सही केली होती. आता मागाहून नाराजी, तक्रारीच्या सुरात व्यक्त झालेले असमाधान का व त्याची जाहीर वाच्यता का, असा माझा प्रश्न आहे. या विषयाची अशी जाहीर वाच्यता कानिटकरांकडून झाल्यामुळेच मला हा सर्व अप्रिय खुलासा येथे करावा लागतो आहे.

पुढचा मुद्दा : कानिटकर म्हणतात 'दुसऱ्या आवृत्तीत जरा बरे पैसे मिळालेत. 'जरा बरे' यातून काय अर्थ निघतो? दुसऱ्या आवृत्तीच्या वेळी कानिटकरांनी सुरुवातीलाच सांगितले, की त्यांना दहा टक्के रॉयल्टी हवी. राजहंस प्रकाशनाने दहा टक्के रॉयल्टीची कानिटकरांची ही अट मान्य केली व दुसरी दोन हजार प्रतींची आवृत्ती प्रसिद्ध केली. हाही व्यवहार कराराच्या स्वरूपात व्यवस्थित नोंदलेला आहे. यात आता असमाधानाला जागा कोठे आहे? तरी ते 'जरा बरे' या शब्दातून डोकावतेच आहे. आपणच करार करायचे आणि त्यावरील शाई वाळते न वाळते तोच त्यामागील समजुतीच्या भावनांना धक्का पोचेल अशा अर्थाचे उद्गारही जाहीरपणे काढायचे, यात मैत्रीचे तर सोडाच, सामान्य व्यवहाराचे संकेत तरी सांभाळले गेले आहेत का, याचा कानिटकरांनी कृपया अवश्य विचार करावा. 'चौकशा'त शेवटी कानिटकरांनी आम्ही मित्र आहोत असे म्हटले आहे ते मात्र खरेच आहे.

**श्री. ग. माजगावकर**

२० मे १९७२

एक
नवी
कोरी
लेखमाला
माणूस
मधून
लवकरच
सुरू
होत
आहे.

तपशील
पुढील
अंकी

एक नवा संप्रदाय

# मुलाखती आणि मृत्युलेख

प्रा. भी. रा. जहागीरदार

'शतपावली' या सदरात श्री. रविंद्र पिंगे अनेकदा मजेदार मजकूर लिहितात. २९ एप्रिल ७२ च्या अंकात 'माणूस'मध्ये त्यांनी असेच लिहिले आहे—

श्रीमती दुर्गाबाई भागवतांच्या 'पैस'ला दोन्हीकडे म्हणजे राज्य आणि केंद्र पातळीवर बक्षीस मिळाल्याच्या निमित्ताने त्यांचा सत्कार होता. तन्निमित्ताने झालेल्या भेटीतील बोलण्याचा आलेख श्रीमती दुर्गाबाईंच्याच शब्दात 'शतपावली' या सदरात सादर करण्यात आला आहे.

श्रीमती दुर्गाबाईंचे व्यक्तित्व आणि लेखन ख्यातनाम आहे. 'वासुनाका'वरील परिसंवादात त्यांनी केलेले भाषण अजूनही अनेकांना आठवत असेल. त्या संदर्भात श्री. पिंग्यांनी लिहिलेले हे वाक्य 'आगेमागे संतप्त तरुण साहित्यिकांचा गोतावळा आहेच' चपखल बसते. बाईंचे विचार नेहमीच प्रगत आणि पुरोगामी राहिले आहेत.

पण प्रगत विचारांना तुच्छतेची धार नेहमीच आवश्यक आहे का? त्यातही जाता जाता सहजपणे कुत्सित विधाने करणे इष्ट आहे का? श्रीमती दुर्गाबाईंनी लो. टिळकांच्या संदर्भात असेच एक चमत्कारिक विधान केले आहे. बाईंच्या तारुण्यातील प्रगतीशीलतेविरुद्ध नाशिकच्या सनातन्यांनी बहिष्कार घातला तेव्हा वस्तुस्थिती प्रत्यक्ष पाहण्यासाठी नाशकास गेलेली लोकमान्य टिळकांची मुलगी (सौ. केतकर) बाईंच्याकडे आली आणि काही विपरीत न दिसल्याने ती आणि तिच्या मैत्रिणी यांनी बहिष्कार घालणाऱ्या सनातन्यांना फैलावर घेतले. सौ. केतकरांचे हे कृत्य लाख मोलाचे खरे. पण या संदर्भात बाईंच्या तोंडचे शब्द असे—

' ती (सौ. केतकर) फार छान, सुसंस्कृत, उदार होती. टिळकांसारखी खरखरीत नव्हती. '

वास्तविक या प्रकरणात टिळक कुठे येतात ? मग उगाचच जाता जाता टिळकांना असे ओरबाडणे का ?–तरी बरे बाईंचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. आणि दुसरा जन्म मानवाचा मिळेलच असेही नाही असे त्याच म्हणतात. आता टिळकांना एखाद्या मारक्या बैलाचा जन्म मिळाला असला आणि त्याला बाईंच्या वरील विधानाचा सुगावा लागला तर प्रसंग काही बरा नाही. – शिवाय सौ. केतकर सुसंस्कृत आणि उदार होत्या. टिळकांसारख्या खरखरीत नव्हत्या, या एकाच दमात उच्चारलेल्या वाक्यातून टिळकांची अनुदारता आणि असंस्कृतता सहजच ध्वनित होते.

टिळकांवर टीका कमी झाली असे नाही. पण ती अधिक संयुक्तिक झाली आहे. टिळकांवर टीका करणाराचा हात कुणी धरीत नाही. पण ती टीका वेगळ्या निबंधात अधिक गांभीर्याने व्हायला हवी. टिळक म्हणजे ब्रह्मदेव नव्हेत. तेही माणूसच होते. दोष त्यांच्यातही असतील. त्यावर टीका केल्यास कुणाचाच आक्षेप येत नाही. पण गांधी-टिळकांसारख्या थोर व्यक्तित्वांना जाता जाता घेतलेले चिमटे प्रौढ सभ्यतेच्या मर्यादेत बसत नाहीत.

त्यांतही सौ. केतकरांनी केलेले सनातन्यांच्या विरुद्ध बाईंची बाजू घेण्याचे कार्य आणि टिळकांनी इंग्रजाविरुद्ध देशाची बाजू घेण्याचें केलेले कार्य याची तुलनाही होऊ शकत नाही. थोडीशी कठोरता धारण केल्याशिवाय कार्याची व्यापकता वाढू शकत नाहीं. काहींना देशाचा संसार करायचा असतो काहींना कुणाचाच करायचा नसतो. स्वातंत्र्याच्या चळवळीत तुरुंग टाळायला आपल्याला घरगुती अडचणी आणि आजारपणं यांची कारणं सांगता येतात. कारण आपली स्वातंत्र्याची चळवळ वैकल्पिक असते. देशभक्त स्वातंत्र्य चळवळीला अपरिहार्य मानतात. आपल्यातील अंतर इतके प्रचंड असले तरी त्यांना चिमटा काढण्याइतपत आपला हात सहज लांबतो.

बाईंनी आणखी एक मजेदार विधान केले आहे. प्राध्यापकाच्या नोकरीच्या संदर्भात त्यांनी म्हटले–' मला भिकाऱ्यांच्या रांगेत उभं राहायचं नाही. एका माणसाच्या पोटाचा असा काय मोठासा प्रश्न आहे ? बोलून चालून मी बाई माणूस ! कुठेही स्वयंपाक करून पोट भरेन. पण ढोंग, असत्य आपल्याला नको बुवा. '

म्हणजे प्राध्यापकाची नोकरी हे भिकारीपण आणि स्वयंपाकिणीची मजुरी ही श्रम प्रतिष्ठा ! या तर्काला तोड नाही ! ! कुठलीही नोकरी करणारांची रांग एकच असते. त्या रांगेला तुम्ही कुठलेही नाव द्या–भिकाऱ्यांची, गुलामांची किंवा प्रतिष्ठितांची. स्वयंपाकीण या रांगेतच असते हे नक्की.

पण बाईंचा राग प्राध्यापक आणि विद्यापीठे यावर अधिक दिसतो. रेकॉइड

स्ट्राऊसवर लिहिताना बाईंनी विद्यापीठातील लोकांवर आपले रागीट मत ठोकून दिले आहे. संशोधनाचं काम विद्यापीठाचं आहे हे कुणी मान्य करीत नाही असं नाही. आता क्लॉईड स्ट्राऊसचंच संशोधन विद्यापीठानं केलं पाहिजे हा त्यांचा आग्रह असेल तर गोष्ट वेगळी. पण बाई लिहितात–' खरं म्हणजे असं हे संशोधनाचं काम विद्यापीठाचं आहे की नाही ? पण विद्यापीठाचं डबकं झालं आहे. पगार नि भत्ते खाण्यापलीकडे विद्येच्या क्षेत्रात तिथे कुणी काही करीत नाही. नि म्हणून मला हे काम अंगावर घ्यावं लागतं. '

विद्यापीठाला स्ट्राऊसवर लिहिण्यापेक्षा वेगळी कामं महत्त्वाची वाटू शकतात. संशोधनक्षेत्रात विषयाच्या निवडीमध्ये Personal factor महत्त्वाचा असतो. स्ट्राऊसमध्ये बाईंना गोडी वाटते तशी सगळ्यांनाच वाटावी हा बाईंचा आग्रह का ? मुंबई विद्यापीठात संस्कृत विभागात डॉ. डांगे यांनी चालविलेले संशोधन जगन्मान्य होत आहे. डेक्कन कॉलेज विषयी तरी बाईंना माहिती असेल अशी अपेक्षा आहे. दिल्ली विद्यापीठात महाभारतकालीन अवशेष शोधण्यासाठी स्वतंत्र विभागच उघडला आहे. स्ट्राऊच्या संशोधनात आणि सिद्धान्तात बाईंना रस असेल तर त्यांनी जरूर ते करावे. पण त्यासाठी विद्यापीठे आणि त्यातील नोकर वर्ग यावर शितोडे उडवण्याची गरज नाही.

हे झाले बाईंच्या सहज बोलण्यातील आक्षेपार्ह बाबींबद्दल. पण बाईंच्या बोलण्यात तर्कसंगतीही आढळत नाही. आता ही गोष्ट खरी की मुक्त–संवादात कधी कधी बोलताना संगती राहत नाही. पण तो मुक्त-संवाद छापायचा नसतो. छापताना संगतीचा विचार अवश्य करावा लागतो.

एकदा बाई म्हणतात–' बुद्ध भिक्षूंची आणि भिक्षुणींची चरित्रं तपासली तर तिथे सगळं स्खलनच दिसलं '...आणि शेवटी बाई म्हणतात–' प्राचीन साहित्यात लैंगिक विषय आणि वर्णनं भरपूर आहेत. कारण त्यावेळी सेक्स अगदी फ्री होतं. '

सेक्स फ्री असेल तर बौद्धकालीन साहित्यांतील स्खलनाचा प्रश्न कुठे येतो ? नीतिनियम कालबद्ध असतात. प्राचीन काळी फ्री सेक्स हीच अवस्था असेल तर स्खलनाचा उल्लेखच अनाठायी ठरतो आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्राचीन काळच्या ' फ्री सेक्सचा सिद्धान्त ' सर्वच समाजशास्त्रज्ञ मान्य करीत नाहीत. किंबहुना अधिक संख्येने विद्वान लोक तो सिद्धान्त चुकीचा मानणारेच आहेत.

बाईंच्या या ' फ्री सेक्स 'च्या कल्पनेतूनच त्यांचे एक विधान निघाले आहे. त्या म्हणतात–' समाजातल्या काही बायका चंचल आहेत म्हणून पतिव्रतेची थोरवी. एरवी पातिव्रत्य ही कल्पना काय आहे ? तशी ती एक Negative Value आहे. '

बाईंचे हे मत अगदी बरोबर आहे. पण याच मापाने सर्वच मूल्ये ' नकारी ' ठरतात. लोक खोटे बोलतात म्हणून सत्याचे मोल, लोक संग्रह करतात म्हणून

अपरिग्रहाचे मोल. लोक रागावतात म्हणून शांततेचे मोल. लोक कामवासनेची पूर्ती करतात म्हणून ब्रह्मचर्याचे मोल. म्हणजे या सर्वच Values Negative ठरतात. तसेच लोक संशोधन करीत नाहीत म्हणून संशोधकाचे महत्त्व. तेही Negative ठरते.

मानवी मूल्ये ही परिणतेची लक्षणे आहेत. त्या मुल्यांना स्वतंत्र अस्तित्व आहे. ती केवळ Negative Value ठरत नाही. प्रगत मानवी मनाचे ते एक लक्षण आणि भूषण आहे.

बाईंच्या मुलाखतीतील आणखीही मुद्दे चर्चिता येतील. पण त्याची आवश्यकता नाही. हे सर्व देखील इतक्यासाठीच लिहिले, की सहजपणे उद्‌गार काढून प्रतिष्ठितांचा अनादर करण्याची प्रवृत्ती आज सारखी वाढत आहे. एकाच्या आत्मचरित्रावर लिहिताना पन्नास वर्षांपूर्वीच्या अमूल गतगोष्टींचे उकीरडे उकरण्याचा प्रकार किंवा कुणी स्वर्गवासी झाल्यावर त्यावर मृत्यूलेख लिहितांना त्याच्या जीवनातील खाजगी गोष्टी उपसण्याचा प्रकारही असाच आहे. सत्तरी उलटल्यावर जग सोडलेल्या प्र. श्री. कोल्हटकरांचा उल्लेख शीर्षकातच 'कोल्हटकरांचा मुलगा' असा व्हावा आणि मग प्रत्यक्ष लेखात त्यांच्या जीवनातील कटु प्रसंगाचा उल्लेख करावा यात औचित्यही नसते आणि स्वारस्यही नसते. प्र. श्री. कोल्हटकरांची आठवण 'शतपावली'कारांना प्र. श्रीं. च्या जिवंतपणी झाली असती आणि त्यांनी तसा लेख लिहिला असता तर प्र. श्री. वर अन्याय तरी झाला नसता. पण त्यांच्या मृत्यु-निमित्त लेख लिहून असा अतिरेक करणे इष्ट ठरत नाही. पण ही प्रवृत्ति वाढत आहे. मृत्युच्या वेळी परमेश्वर देखील माणसाला जीवनातून मुक्त करतो. पण हे मृत्यूलेखक मात्र त्याला गच्च बांधून ठेवण्याचा प्रयत्न करतात. टीका करायला कुणी मनाई करीत नाही पण ज्या मार्गाने ही टीका अशा मुलाखतीद्वारा होते तो मार्ग बरोबर नाही.

श्रीमती दुर्गाबाईंच्या लेखनाबद्दल मला आदर आहे. मराठीतील शैलीदार लेखिका म्हणून त्यांचे नाव मराठी सारस्वतात जरूर राहणार आहे. केन्द्राचे पारितोषक त्यांना प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन मी करतो.

# ( चित्रपट ) तारे ' चमकले !'

गेल्या आठवड्यात मुंबईत खूप धमाल झाली. अगदी सिनेमात घडावे तसे मुंबईत घडले. यावेळी हिरो होते प्राप्तिकर अधिकारी आणि आपले ते नेहमीचे हिरो (म्हणजे सिनेमातले आणि नेहमी फड जिंकणारे ! ) होते व्हिलन !

प्राप्तिकर अधिकाऱ्यांनी लाजवाब अॅक्टींग करून चित्रपट ताऱ्यांच्या डोळ्यांपुढे काजवे चमकवले.

तमाम पब्लिक चित्रपट ताऱ्यांवर बेहद्द खूष असते. पब्लिकचा एखादा आवडता नट वा नटी कुठेतरी आल्याची नुसती अफवा जरी पसरली तरी काहीही करून त्यांचे दर्शन घेण्यासाठी कोण धांदल उडते.

काही वर्षांपूर्वी ' मुगल-ए-आझम ' ह्या भव्य चित्रपटाच्या प्रसिध्दीची प्रचंड जाहिरात झाली आणि महिनाभर आधी अॅडव्हान्स बुकींग सुरू झाले. पब्लिकने तोबा गर्दी केली. मारामाऱ्या काय झाल्या आणि त्यात एक खून पडला. एकूण काय चित्रपट आणि चित्रपट कलावंत यांच्या सद्दीच्या काळात लोक त्यांच्यावर फिदा असतात.

चित्रपट तारेही पब्लिकला हवे ते चित्रपटातून देत असतात. चित्रपटात गरीब, व गरिबांबद्दलचा कनवाळा, देशभक्ती, त्याग यांची ते सुपर्ब अॅक्टिंग करतात आणि लोकांना अक्षरशः रडवतात. चित्रपट रसिकही असे असतात, की या सर्वाला भुलून खिशाला चाट बसली तरी हरकत नाही पण पुन्हा पुन्हा असे चित्रपट पहात असतात आणि पब्लिकच्या पैशावर गब्बर होणारे आणि प्रत्यक्षात अत्यंत सुखासिन आयुष्य भोगणारे हे ' देशभक्त त्यागी कलावंत ' सरळ सरळ प्राप्तिकर चुकवतात, काळा पैसा करतात आणि देशाला बुडवतात.

दर वर्षी प्राप्तिकर बुडवलेल्या लोकांची यादी वर्तमानपत्रांतून ठळकपणे झळकत असते त्यात अनेक चित्रपट कलावंतही असतात. पण एवढे होऊनही त्यांना जनलज्जा आहे कुठे ? पुन्हा पुन्हा यादीत नाव झळकूनही पुन्हा काळा पैसा करायला, कर बुडवायला ते मोकळे असतातच. समाजवादावर ठाम निष्ठा असल्याची अमाप प्रसिध्दी करणारा राजकपूरही कर बुडवतो, काळा पैसा करतो आणि मग धाड पडल्यावर त्याचे समर्थन करतो. १९६७ साली पडलेल्या धाडीत राज, वैजयंती माला, माला सिन्हा भरपूर गाजले. यावेळी दुसरी मंडळी गाजली. जाऊ देत. नावे असूनही प्रसिध्द करता येत नाहीत.

महिना पाच सहाशे रुपये मिळवणाऱ्यांकडून प्राप्तिकर खाते त्यांना नागवून कायद्याप्रमाणे वेळेवर कर वसूल करते आणि निरनिराळ्या क्षेत्रातील बडे कर-

चुकवे बडे म्हणून सहज निसटतात. आपले संरक्षण मंत्री माननीय बाबू जगजीवन-रामजी म्हणे १० वर्षे कर भरायला विसरले होते आणि यावर प्रधानमंत्र्यांनी असा विनोदी खुलासा केला की कार्यबाहुल्यामुळे ते कर भरायला विसरले. कायदेशीर इलाज, दंड वगैरे बाजूलाच राहिला, मंत्रीपदाचा राजीनामा तरी द्यायला लावला का ? छे ! उलट मंत्रीपदाबरोबर काँग्रेसचे अध्यक्षपदही मिळाले. या साऱ्या बड्या करबुडव्यांचे संबंध फार वरपर्यंत पोचलेले असतात. सारेच हित-संबंधी. कोणी कोणाला काय बोलायचे आणि काय कारवाई करायची. सारेच चोरांचे साथीदार.

धाडीचे एक-दोन दिवसांचे सत्र संपल्यावर एक ओळखीचा प्राप्तिकर अधिकारी दुसऱ्याच्या कानात कुजबुजला. 'चार कोटी रुपये धाडीत मिळाल्याच्या बातम्या तुम्ही वर्तमानपत्रवाल्यांनी दिल्या आहेत. पण हे झूट आहे. ही रक्कम १५ लाख रुपये ओलांडून गेली तरी खूप झाले.' प्रत्यक्षात प्राप्तिकर आयुक्तांनी हा आकडा सहा लाख असल्याचे नंतर पत्रकार परिषदेत सांगितले.

. तोच अधिकारी पुढे म्हणाला, 'छाप्याची कुणकुण चित्रपट ताऱ्यांना आधी लागली होती म्हणे..' यावर आपल्याला काही निष्कर्ष काढायला हरकत नाही. म्हणूनच पैशांपेक्षा प्राप्तिकर अधिकाऱ्यांच्या हाती कागदपत्रेच अधिक पडली. याची संभावित कारणे अशी, की ६७ सालच्या धाडीत माला सिन्हाच्या घरातील बाथरूममध्ये लाखो रुपये सापडले आणि सारे चित्रपट कलावंत जागे झाले, शहाणे झाले. आपल्या युक्त्या प्राप्तिकर अधिकाऱ्यांना आता समजू लागल्याचे त्यांच्या ध्यानी आले. त्यांनीही मग काळा पैसा लपवून ठेवण्याच्या नव्या व अधिक संरक्षित जागा शोधून काढल्या. दुसरे कारण म्हणजे अलिकडेच हेमा मालिनीच्या घरी मद्रासमध्ये व तिथल्याच दुसऱ्या वाणिश्री नावाच्या नटीच्या घरावर धाडी पडल्या होत्या आणि तिसरे म्हणजे नुकत्याच दिल्लीत झालेल्या प्राप्तिकर आयुक्तांच्या परिषदेत चित्रपट कलावंतांबाबत कडक धोरण अवलंबण्याचे ठरले. ही बातमी वृत्तपत्रातून प्रसिध्द झाली होती. स्वतः मुंबई विभागाचे प्राप्तिकर आयुक्त श्री. कुरुव्हीला हे धाडी पडल्या त्याच दिवशी म्हणजे ३ मे रोजी पहाटेच्या विमानाने ती परिषद आटोपून मुंबईला परतले. अगोदरच बातमी असल्याने अनेक जण सावध होते.

एका प्रख्यात विनोदी नटाच्या घरावर धाड पडली तेव्हा तो अगदी मजेत होता. त्यानेच स्वतः सारी कपाटे उघडून दाखविली. तेथे तसे काहीच मिळाले नाही. तेव्हा त्याच्या चहात्या तरुणींची त्याला आलेली प्रेमपत्रे आणि फोटोंचे अल्बम्स पाहण्यात प्प्तिकर अधिकाऱ्यांनी वेळ घालविला. दुसऱ्या एका नटाच्या घरी कोणीतरी प्राप्तिकर अधिकाऱ्यांना विचारले 'काय हो, तुम्ही मागच्या आठवड्यात येणार होता ना ! मग उशीर कसा काय झाला ?'

चांगल्या चित्रपटांची निर्मिती करणारा निर्माता 'म्हणून गेली अनेक वर्षे ज्याचे नाव आहे व श्रेष्ठ दर्जाचे कलावन्त घेऊन नुकत्याच तयार केलेल्या, (जो चित्रपट गेल्याच महिन्यात मुंबईत झळकला.) एका चित्रपटाच्या त्या प्रसिद्ध निर्मात्याच्या घरावर धाड पडली. बरेच घबाड हाती आले. बिचारा हताश झाला. त्याचा एक नातेवाईक गुजरातमध्ये कुठेतरी असून केंद्र सरकारचा फार बडा अधिकारी आहे. या महाशयांनी तात्काळ त्याला फोन करून धाड पडल्याची बातमी दिली आणि... 'कुछ भी करो लेकिन मुझे बचावो' म्हणून सांगितले. याच निर्मात्याने गेल्या वर्षी जुहू येथे अमाप पैसा खर्च करून एक आलिशान बंगला बांधला. ही सारी काळ्या पैशाची कृपा.

## गमती जमती

एका अभिनेत्याच्या घरी धाड पडत होती. त्याचवेळी अभिनेते महाशय फोन करून कोणाला तरी त्याची स्वतःची फार मोठी रक्कम दुसऱ्याच्या नावावर ट्रान्सफर करायला सांगत होते.

दुसऱ्या एकाने दारावरची वेल वाजताच तात्काळ कागदपत्रांची व्हिल्लेवाट लावली.

एका कलावंताच्या घरी धाड पडली तरी सारे अगदी मजेत होते. अधिकाऱ्यांनी सारे कोपरे धुंडाळले. हाती काही आले नाही पण देवदेवतांच्यासाठी खास असलेल्या मंदिराप्रमाणे सजवलेल्या एका खोलीजवळ एक अधिकारी जाताच त्यांचे चेहरे पडले. चलाख प्राप्तीकर अधिकाऱ्यांना सर्व काही समजायला ते पुरेसे होते. शेवटी चोर कोण ठरले तर देव. कारण एका देवीची मूर्ती पोकळ होती आणि आत जडजवाहिर लपवलेले होते.

या धाडीच्या निमित्ताने अनेक महत्त्वाची कागदपत्रे मात्र अधिकाऱ्यांच्या हाती आली. नेहमीच्या बाजारभावाने ६० लाखाला विकलेल्या एका प्लॉटची किंमत करारनाम्यात फक्त ४ लाख रुपये दाखविली होती तर एक प्रख्यात चित्रपटगृह ८१ लाखाला विकूनही किंमत ४४ लाख दाखविण्यात आली होती. दुसऱ्या एका प्रख्यात चित्रपटगृहाच्या विक्रीबाबतही असेच आढळले. ७८ लाखाला विकलेल्या त्या चित्रपटगृहाची करारनाम्यात किंमत फक्त ३२ लाख दाखविण्यात आली होती. यावरून किती प्रचंड प्रमाणात काळ्या पैशांचा व्यवहार चालतो ते दिसून येईल. भारतात सुमारे ३० लाख प्राप्तिकर दाते आहेत.

परवाच्या धाडीमुळे चित्रपटव्यवसायात प्रचंड खळबळ माजली आहे. सध्यातरी पैशांचे सर्व व्यवहार थांबणार असल्याने या व्यवसायावर ज्यांचा चरितार्थ अवलंबून आहे, त्यांच्यावर परिणाम होणार आहे. त्यांचे पगार आता थकतील. नव्या चित्रपटांना पैसा मिळणार नाही. चालू चित्रपटांची कामे रेंगाळतील. या व्यवसायापायी चित्रपटनिर्मितीसाठी पैसा पुरवणाऱ्या लोकांना खोऱ्याने पैसा ओढता येतो.

या साऱ्या भांडवलदारांचा चित्रपटव्यवसायाभोवती पक्का विळखा आहे. हेच लोक अधिक करून फार मोठ्या प्रमाणात काळ्या पैशांचे व्यवहार करतात. या साऱ्या गोष्टींवर काही काळ परिणाम होणार आहे.

दिलीपकुमारने आपली व्यथा बोलून दाखविली, की चित्रपट कलावंत मरतो त्यावेळी त्याच्याकडे कवडीसुद्धा नसते, फक्त कीर्तीच त्याला शेवटपर्यंत साथ देते, तेव्हा इतर बड्यांना सोडून चित्रपट-कलावंतांवरच धाडी का ?

## प्रतिक्रिया

फिल्मी दुनियेबाबत लोकांच्याही वेगवेगळ्या प्रतिक्रिया ऐकल्या. अनेक चहात्यांना हा त्यांच्या आवडत्या ताऱ्यांवर सरकारने उगवलेला सूड वाटला. अशा धाडी पडल्यावर या कलावंतांनी विनामूल्य कार्यक्रम करून देशाला निधी का जमवून द्यावा, असा सवाल एकाने केला. दुसऱ्या एका चाहत्याने सरळ सरळ विचारले, ' मंत्री व इतर बडे बडे लोक कर चुकवतात, काळा पैसा करतात त्यांचे काय, त्यांच्यावर धाडी का नाहीत ?' पण एकूण अनेकांना या धाडींमुळे फार बरे वाटले. चित्रपट-कलावंत भारीच पैसा कमावतात, आरामात रहातात, काळ्या पैशांचे व्यवहार करतात, त्यांना हा धडा शिकवणे आवश्यक होते असे अनेकांना वाटते.

धाडीत मिळालेल्या (' प्रचंड ?') घबाडाचे काय होणार ?

धाडीत जप्त झालेले पैसे व जडजवाहिर बेहिशेबी असेल तर ते गेलेच, पण त्यावर प्राप्तिकर चुकवल्याबद्दल कमीत कमी १०० टक्के दंड आकारला जाईल आणि शिवाय फौजदारी खटला भरला जाईल.

गेल्या वेळच्या धाडी पडण्याचे मूळ कारण असे होते, की राजकपूर व वैजयंती-माला यांच्या प्रेमप्रकरणामुळे राजच्या घरातील वातावरण गढूळ झाले आणि त्यातून माहिती फुटली व धाडी पडल्या. त्यावेळच्या धाडींचे हिरो होते श्री. सहस्र-भोजने. यावेळी धाडी पडण्याचे कारण असे झाले. २१ फेब्रुवारीला एका सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शकाला खोटे कागदपत्र दाखवून चार बोगस ' सी. आय. बी. अधि-काऱ्यां 'नी ५० हजारांची रक्कम पळवली. हे प्रकरण क्राइम ब्रँचकडे गेले, पण यात काहीतरी काळेबेरे असल्याचा संशय येऊन पुढील चक्रे वेगाने फिरू लागली.

दरवर्षी सुमारे १४०० कोटी रुपयांची काळ्या पैशांच्या व्यवहारांत उलाढाल होते. अलिशान फ्लॅटस् घेणे किंवा शेतीवर कर नसल्याने फार मोठी जमीन घेणे व चोरट्या व्यापाराच्या उलाढालीसाठी हा पैसा वापरणे, असे काळ्या पैशांचे व्यवहार चालतात. पण यामुळे देशाचे अमाप नुकसान होते. या व्यवहारात सर्वच क्षेत्रांतील लोक सामील असतात. अगदी मंत्री आणि बडे बडे सरकारी अधिकारीही त्यात सामील असतात म्हणे !

या धाडींबाबत एक बोलकी प्रतिक्रिया अशी, की त्या सर्व धाडी जनतेच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी रचलेला एक शो होता. ◘ ◘ ◘

नलिनी अंबाडे

# हरदासाची कथा, मूळ पदावर !

फार फार वर्षापूर्वीची गोष्ट. फार फार म्हणजे किती ? फॉर फार म्हणजे फार फार फार ! अहो, म्हणजे तरी किती ? म्हणजे रामायण महाभारताच्याही आधीची. झाले समाधान ? तर, तेव्हा एक सुरेख नर्तकी होती. तिचं नाव होतं हेमा. फक्त हेमा; हेमामालिनी नव्हे. ती बत्तीस लक्षणी यौवना म्हणजे जणू साक्षात नृत्यकलेचा अवतारच ! ही हेमा भक्ती करावयाची ती पुष्पवनातील सुंदरेश्वराची, म्हणजेच – शंकराची. शंकरास नृत्याची देवता व म्हणूनच 'नटराज' म्हणतात. देहभान विसरून ती तल्लीन व्हायची अन मग तिचा प्रत्येक पदन्यास म्हणजे जणू नवी 'पोझ' ठरायची. रसिकजन मुक्त हस्ताने तिला सुवर्णमुद्रा अर्पण करीत. ते सारे धन ती देवाच्या पायावर ठेवी. एकदा तिला वाटलं, पूजेसाठी शंकराची सोन्याची मूर्ती असावी. पण एवढं सोनं आणायचं कुठून ? तिने निराश होऊन डोळे मिटून घेतले अन कल्पनेतच् तिने सोन्याची मूर्ती डोळयांसमोर आणली, अन् बघता बघता ती विजेप्रमाणे लवलवू लागली.

इतक्यात काय झालं ठाऊक आहे ? कल्पनेने डोळयांसमोर आणलेली ती सोन्याची मूर्ती, निर्जिव पुतळा म्हणाना, तर ती मूर्ती मंदस्मित हास्यवदनी झाली. हेमाला काही समजेनाच, ती नाचतच राहिली आणि इतक्यात त्या मूर्तीचे डोळे विस्फारले अन एकाएकी उजवा हात उंचावून तिने हेमाला आशीर्वाद दिला. नृत्य थांबवून तिने देवाच्या पायावर डोके ठेवले अन डोळे मिटले. म्हणजे डोळे मिटूनच ती स्वप्न पाहात होती पण स्वप्नातही तिने डोळे मिटले...आणि हे सुखद गोड स्वप्न संपताच, डोळे उघडताच तिची निराशा झाली. पुन्हा ते गोड स्वप्न पाहाण्याकरिता म्हणून ती डोळे मिटणार तोच तिचे लक्ष बाजूला गेले. हे काय ?

घरातील ताटेवाटया अन् पातेली, घागरी सारी भांडीकुंडी आता सोन्याची होऊन चमचम करीत होती. अगदी पाटावरवंटा देखील ! बस्स ! तिने सारे सोने

वितळवले अन् मूर्ती करण्यास सांगितले. पुन्हा डोळे मिटून तिने शंकराची मूर्ती मन:चक्षूसमोर आणली अन् मूर्तीकारास ती सूचना देवू लागली. तसतशी मूर्ती घडत गेली. मूर्ती पूर्ण होताच तिला डोळे उघडण्यास सांगितले. तिने मोठ्या उत्साहाने अन् अधिरतेने समोरची मूर्ती पाहिली. स्वप्नातीलच 'ती' मूर्ती, अगदी हुबेहूब जणू तीच, आता तिच्या समोर होती. हेमाला भान राहिले नाही...धावत सुटली ती अन्...अन त्या मूर्तीचं एक चुंबन घेतलं! निर्मळ भक्तीपोटी अन् निष्पाप मनाने घेतलले ते एकच चुंबन इतके उत्कट होते की त्याची कायमची खूण त्या मूर्तीवर उमटली. इतकी कायमची की आजही, अगदी मे-१९७२ मध्येही ती दिसते. कुठे ठाऊक आहे?-मदुरेच्या मीनाक्षी मंदिरात!

ही सारी कथा आजपर्यंत सांगोवांगी का होईना, पण जिवंत का राहिली? कारण मूर्तीच्या रूपाने ती सतत डोळ्यांसमोर होती. मूर्ती म्हणजेच पुतळा. म्हणजे पुतळ्यांचे महत्त्व किती पूर्वीपासून लोकांना समजलेले आहे बघा! समजा, असं झालं नसतं तर ही 'गोड' कथा केव्हाच लोक विसरूनही गेले असते. पुतळ्यांमुळे केवळ इतिहास जिवंत राहातो असे नाही तर जनमनातील देशप्रेमाची ज्योतही सदैव प्रज्वलित रहाते. एकेक पुतळा म्हणजे एकेक स्वतंत्र इतिहास, एकेक पुतळा म्हणजे एकेक अद्भूत कथा!

आता, मदुरेचा विषय अनायासे निघालाच आहे, म्हणून तेथल्या मीनाक्षी मंदिराचीच गोष्ट घ्या! दारातील द्वारपालापासून ते गोपूराच्या अकराव्या मजल्यापर्यंत शिल्पेच शिल्पे. आपल्याकडे देवालयाचा उंच कळस, नेमक्या गाभाऱ्यावर म्हणजे मूर्तीच्या बरोबर शिरावर असतो. दर्शनाला खूप गर्दी असेल तर आपण कळसालाच हात जोडतो. पण दक्षिणेतील उंच गोपूर म्हणजे केवळ देवळाचे प्रवेशद्वार असते. प्रत्यक्ष मूर्ती असणारे देवालय आत असून, गाभाऱ्यावर छोटासा कळस

---


# अग्निपुत्र

वसंत पोतदार

मूल्य : रुपये चौदा
राजहंस प्रकाशन
पुणे ३०

नाममात्र असतो. मदुरा येथील देवालयाच्या चारही दिशांना अशी चार प्रवेशद्वारे म्हणजे उंच गोपूरे आहेत. तटाच्या आत गेल्यावर, दुसरा तट, त्यालाही प्रत्येक दिशेला प्रवेशद्वारे अन गोपूरे, शिवाय देवळातील प्रत्येक दगडी खांबावर, तुळईवर, छताला सर्वत्र शिल्पकला आणि चित्रकला. एकेक चित्र म्हणजे एकेक दीर्घ कथा. एकेक शिल्प म्हणजे नृत्याची एकेक पोझ ! एकेका मूर्तीच्या चेहऱ्यावर हावभाव म्हणजे एकेक जणू शास्त्रीय मुद्राभिनय. केवळ रंगरंगोटीसाठी देवालय लाखो रुपये खर्च करते. होय, चित्रें अन् मूर्तींची संख्याही तितकीच प्रचंड आहे ना. किती असावी ? अंदाज करा बरे ! फक्त सव्वा तीन कोटी. नृत्यशास्त्राचा जिवंत अमरकोश म्हणजेच मदुरा देवालय ! तुंदीलतनू अशा गणपतीस नृत्य करताना, कुठल्याही मंदिरात कधीतरी कुणी पाह्यलंय ? शक्यच नाही, कारण तशी मूर्ती आहे फक्त मदुरा येथें !

अशा ह्या प्रचंड संख्येच्या मूर्तींच्या मंदीरात, आज म्हणजे २० मे १९७२ रोजी आणखी एकाची भर पडत आहे. पंतप्रधान समक्ष उद्घाटन करणार आहेत. देवळाच्या आत एक पुतळा आज नव्याने बसविला जात आहे. दक्षिणेंत पूर्वी चौल आणि पांडय ह्या घराण्यांची साम्राज्ये होती. पांडय शब्दाचे तमीळ रूप पांडियन. ह्यांची राजधानी होती मदुरा. त्यांच्यातील पराक्रमी राजा नेडुंजेडियन याचा पुतळा मीनाक्षी मंदिरात आणि राजा तिरुमल नाईक यांचा पुतळा तिरुमल राजमहालात बसविला जात आहे. म्हणजे आपण हे वाचता आहात तोवर पंतप्रधानांनी उद्घाटन संपविलेही आहे. चौल घराण्याचा पराक्रमी राजा, राज राज चोळन यास तंजावूरला त्याचे वास्तुचे बाहेर उभे रहावे लागले, त्यामानाने हे दोघे नशीबवान ! नशीबवान अशासाठी की, मीनाक्षी मंदीर व महाल राजवाडा ह्या दोन्ही वास्तू केंद्रिय सरकारच्या पुराणवस्तु संशोधन खात्याकडे नाहीत.

एप्रिलच्या पंधरा तारखेस, मुख्यमंत्र्यांनी मदूरा येथील अल्बर्ट व्हिक्टर पुलाच्या टोकाशी, कै. अण्णादुराई यांच्या पुतळ्याचे उद्घाटन केले. त्यावेळी ते म्हणालें, ‘ सुप्रसिद्ध, विद्वान, पराक्रमी राजे यांचा आदर करण्याचे धोरण आमच्या सरकारचे आहे. ’ त्याप्रमाणे मदुरा शहराचे मेयर साहेब श्री. मुथ्थू यांनी करुणानिधींचा होकार वरील दोन पुतळे बसविण्याकरिता मिळविला. येथवर हे सारे ठीक होतें, पण परवानगी मिळाली हे वार्ताहरांना सांगताना ते म्हणाले की ह्या दोन्ही वास्तू केंद्रसरकारच्या ताब्यात नाहीत हे आपलें भाग्य ! आता प्रश्न असा मनात डोकावतो की, मदूरेला उभारलेले हे पुतळे सरकारी धोरणापोटी की, तंजावूरचा बदला घेण्यासाठी ?

अरे, चुकलंच ! वास्तविक मनात डोकावलेलं, कागदावर डोकावण्यास नको होतं. आमचे पुतळे-प्रेम आधीच तुमचा थट्टेचा विषय आहे. आता तुम्ही म्हणणार तर...हरदासाची कथा, मूळ पदावर !

□ □ □

## चंबळच्या खोऱ्यात

# अगा नवल वर्तले

प्रा. पां. शं. माईणकर

चंबळ नदीचे खोरे–मध्यप्रदेशातील उत्तरेकडचे काही जिल्हे, राजस्थानचा दक्षिणेकडील थोडासा भाग–आणि उत्तर प्रदेशातील काही जिल्हे यांनी मिळून बनलेला हा भाग गेल्या काही वर्षांपासून प्रसिद्धीच्या झगमगाटात होते. तेथील जंगली प्रदेशात आणि लहान मोठ्या खेड्यांच्या आसऱ्याने रहाणारे अनेक डाकू (डाकुंना या प्रदेशात बागी म्हणून संबोधले जाते) आणि या डाकुंच्या नावाभोवती निर्माण झालेले तेजोवलय यामुळे जवळपासच्या भागातील जनताही डाकुंकडे भयमिश्रित आदराने आणि कुतुहलाने पहात होती. डाकुंचा हा कुप्रसिद्ध अड्डा खणून काढण्यासाठी राज्य सरकारांनी आणि मध्यवर्ती सरकारने जंगजग पछाडले. रूस्तुमजी सारख्या वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे हे काम काही काळ सोपविण्यात आले, पण शासनाच्या नाकावर टिच्चून दरोडेखोर आपले काम करीतच राहिले. पोलिसांनी, त्यांच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी, राज्य सरकारांनी, इतकेच नव्हे तर मध्यवर्ती सरकारनेही त्यांच्यापुढे हात टेकले. एखादे घर किंवा खेडे लुटणे, एखाद्याचा खून करणे, एखाद्याला पळविणे ही कामे नेहमीचीच झाली आणि भारताचे घटनात्मक सरकार याकडे मख्खपणे पहाण्यापेक्षा दुसरे काही करू शकले नाही. शासनाचे सर्वांत महत्त्वाचे कार्य म्हणजे जनतेला संरक्षण देणे, तेच करण्यास सरकार असमर्थ ठरले आणि एवढ्यात एक नवल वर्तले.

या सर्व डाकुंना भराभर उपरती होऊ लागली. आपण आतापर्यंत अनेक

चुका केल्या अशी साक्ष त्यांचे मन त्यांना देऊ लागले. पश्चातापाने ते पोळले गेले. आणि अशाच अवस्थेत त्याचा एक प्रतिनिधी विनोबांकडे गेला. त्यांना त्याने आपले हृदय उघडून दाखविले. विनोबांना आनंद झाला. पण वयोमानपरत्वे जास्त जबाबदारी अंगावर घेणे अशक्य असल्यामुळे त्यांनी या प्रतिनिधीला आपल्या वारसाकडे म्हणजे जयप्रकाश नारायण यांच्याकडे पाठविले. जयप्रकाश यांनी त्याचे म्हणणे ऐकले. आनंदाने ते चंबळ खोऱ्यात आले. शासनाशी त्यांनी बोलणे केले. शासनाकडून काही बाबतीत स्पष्टीकरण घेतले आणि नंतर आपल्या सर्वोदयी लवाजम्यासह दरोडेखोरांच्या मनपरिवर्तनासाठी ते आखाड्यात उतरले. निवेदने काढण्यात येऊ लागली. ती दरोडेखोरांपर्यंत पोचतील अशी व्यवस्था केली गेली. दरोडेखोरांवर आश्वासनांची खैरात सुरू झाली.

आणि भराभर दरोडेखोर येऊन जयप्रकाशांची भेट घेऊ लागले. लाख लाख, दोन दोन लाख रुपयांची बक्षिसे ज्यांना पकडून देण्यासाठी सरकारने लावली असे मोहोरसिंग, माधोसिंग या सारखे दरोडेखोर त्यात होते.

सुरुवातीलाच मिळालेल्या यशाने जयप्रकाश आनंदीत झाले. आणि हे शरणागतीचे कार्य पूर्ण होण्यासाठी या भागातील सर्व पोलीस तुकड्या काही काळाकरिता काढून घेतल्या जाव्यात अशी त्यांनी शासनाला विनंती केली. विनंती लगोलग मान्य झाली. पोलीस काढून घेण्यात आले. आता दरोडेखोर खुले वावरू लागले. दिवसाढवळ्याही ते खेड्यापाड्यात रस्त्यावर हिंडताना, गावकऱ्यांशी मोकळेपणाने गप्पा करताना दिसू लागले.

## अभूतपूर्व सोहळा

शरणागती हप्त्याहप्त्याने होऊ लागली. पहिला हप्ता, दुसरा, तिसरा, चवथा. २०० पेक्षा जास्त दरोडेखोर याप्रमाणे शरण आले. शरणागतीच्या समारंभांना जनतेने ही गर्दी केली. एकेक डाकू येत होता. गांधींच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होऊन आपले शस्त्र खाली ठेवीत होता आणि स्वतः होऊन पोलीसांच्या स्वाधीन होत होता. जगावेगळेच सारे दृश्य, कधी न ऐकलेले, कधी न पाहिलेले, आपले आतापर्यंतचे जीवन संपवून जीवनाचा नवीन अभ्यास सुरू करण्यासाठी शिक्षा भोगण्यास स्वतः होऊन तयार होणारे दरोडेखोर, मनपरिवर्तन झालेले, सदसद्विवेक बुद्धीचा वापर करणारे, महात्मा गांधी जय म्हणणारे, इंदिरा गांधींचा उदो उदो करणारे, भवानीमातेचा जयजयकार करणारे आणि समाजवादावर आपली अव्यभिचारी निष्ठा प्रगट करणारे. त्यांचा तो शरणागतीचा अभूतपूर्व सोहळा न भुतो न भविष्यति असा. पाहणाऱ्यांनीही भारावून जावे असा.

जयप्रकाशांनी आनंदून जावे असे नेत्रदिपक यश त्यांना या मोहिमेत मिळाले. वास्तविक असा प्रयत्न काही पहिलाच नव्हता. बारा वर्षापूर्वी १९६० साली विनोबा भावे पदयात्रेनिमित्त या भागात फिरत असताना त्यांनी डाकूंना शरण

येण्याची विनंती केली होती आणि त्याप्रमाणे त्या वेळेस १९ डाकू शरणही आले होते. मानसिंग, तहसिलदार सिंगासारखे अग्रेसर डाकू त्यात होते. पण या संख्येच्या कित्येकपट जास्त दरोडेखोर आज शरण आलेले होते. विनोबांपेक्षा जास्त यश जयप्रकाश घेऊन बसले होते.

पण परिस्थितीचाही या संदर्भात विचार करणे आवश्यकआहे. जयप्रकाश यांनी मागितलेल्या एकूण एक सवलती या वेळेस त्वरित देण्यात आल्या. त्यांना आवश्यक तो नोकरवर्ग देण्यात आला. त्यांच्यासाठी वाहनांची व्यवस्था करण्यात आली. ठिकठिकाणचे डाक बंगले त्यांच्यासाठी रिकामे होऊ लागले. एवढेच नव्हे तर शरण आलेल्या कोणत्याही दरोडेखोराला कोणत्याही परिस्थितीत फाशीची शिक्षा होणार नाही असे स्पष्ट आश्वासन निःसंदिग्ध शब्दात जयप्रकाश यांनी दरोडेखोरांना दिले. आणि या सर्वावर कडी म्हणून की काय या दरोडेखोरांना पकडून देण्यासाठी सरकारने जाहीर केलेली लक्षावधी रुपयांची बक्षिसाची रक्कम जयप्रकाश नारायण यांच्या सर्वोदय कार्याकरिता देण्यात येईल असेही आश्वासन त्यांनी सरकारकडून मिळविले. दरोडेखोरांच्या कुटुंबियांना कोणताही त्रास होणार नाही, एवढेच नव्हे तर शासनाकडून त्यांना आवश्यक ते संरक्षण दिले जाईल व त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाची खास काळजी घेतली जाईल असेही आश्वासन त्यांनी मिळविले.

## वस्तुस्थितीचा विचार

परंतु – आज खरी आवश्यकता आहे ती या सर्व प्रकरणांतील अद्भुत रम्यतेचा वरचा पातळ पापुद्रा काढून टाकून वस्तुस्थितीकडे उघडया डोळयांनी जाणीवपूर्वक पहाण्याची. ज्या पद्धतीने या दरोडेखोरांच्या शरणागतीचे चित्र रंगविण्यात आले आहे – येत आहे, त्या पद्धतीबद्दल सर्वजण स्तिमीत होऊन गेले आहेत असे वाटू लागते. पण असे होण्यापूर्वी काही गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे.

गेल्या दहा बारा वर्षात दरोडेखोरांनी या तेरा-चौदा जिल्ह्यांत शेकडो दरोडे घातले हे निर्विवाद. या दरोडयांत त्यांनी अक्षरशः लाखो रुपये, सोने नाणे वगैरे लुटले असेल हेही निर्विवाद. शरणागतीच्या वेळेस दरोडेखोरांनी फक्त आपली शस्त्रे खाली ठेवली. लुटीच्या संपत्तीबद्दल कोणीच कोठे काही बोलले नाही, आणि आश्चर्य असे की कोणीच काही विचारलेलेही नाही. त्यांच्याजवळ काहीच संपत्ती शिल्लक राहिलेली नाही असे म्हणणे बरोबर होणार नाही. आणि संपत्ती असताना ती दडवून ठेवून फक्त शस्त्रास्त्रांनिशी शरण आलेले दरोडेखोर हृदय परिवर्तन होऊन शरण आले आहेत, असे म्हणणे म्हणजे स्वतःची फसवणूक करणे होईल. जोपर्यंत या संपत्तीच्या बाबतीत योग्य असे निवेदन दरोडेखोरांकडून बाहेर येत नाही तोपर्यंत त्यांच्या तथाकथित हृदयपरिवर्तनावर विश्वास ठेवणे चुकीचे होईल. तहसिलदारसिंग वगैरे डाकू विनोबांना शरण आले होते. नंतर त्यांना शिक्षा झाली होती. आणि शिक्षा भोगून ते आता सर्वसाधारण माणसाप्रमाणे जीवन व्यतित करीत आहेत.

त्यांच्याप्रमाणेच आपणही काही काळ शिक्षा भोगून बाहेर यावे, व नंतर लुटलेल्या संपत्तीचा राजरोसपणे आपल्या कुटुंबियांबरोबर उपभोग घ्यावा, अशी इच्छा धरून शरण आलेल्या दरोडेखोरांचे हृदयपरिवर्तन झाले आहे असे आम्ही म्हणणार आहोत काय ? आणि जर म्हणणार असू तर लुटलेल्या संपत्तीबद्दल दुसरा कोणता तर्कशुद्ध युक्तिवाद आमच्याजवळ आहे ?

दुसरा एक मुद्दा या बाबतीत पुढे येतो आणि तो तर जास्तच महत्त्वाचा आहे. सर्व दरोडेखोरांना कायद्याप्रमाणे योग्य ती शिक्षा होईल असे जरी सांगण्यात येत असले तरी कोणत्याही दरोडेखोरास फाशीची शिक्षा होणार नाही असे आश्वासन मला सरकारकडून मिळालेले आहे, असे निःसंदिग्ध शब्दात मुख्य मंत्री सेठींच्या समोर जयप्रकाश यांनी सांगितले आहे, इकडे दुर्लक्ष करता येत नाही. न्यायदानाच्या कार्यात हा सरळ सरळ हस्तक्षेप नाही काय ? आणि असे असताना आमच्या न्यायविभागाच्या स्वातंत्र्याचे आणि न्यायदेवतेच्या पावित्र्यांचे गोडवे आम्ही कोणत्या तोंडाने यापुढे गावे ?

आणि असेही का म्हणता येऊ नये, की यापुढे चुकून माकून एखादा खून झाला तर फाशीची शिक्षा होऊ शकेल पण अनेक खून केले तर मात्र हृदय परिवर्तनाचा आडोसा घेऊन त्याला फाशी सहज टाळता येईल. रावणाला महात्मा ठरविण्याचा हा आटापिटा कसासाठी ? एखाद्या दरोडेखोराचे खरोखरच मनपरिवर्तन झाले आहे असे न्यायविभागाला वाटल्यास त्याला अपवाद म्हणून न्यायविभागातर्फे शिक्षेत सूट दिली जाणे निराळे आणि अपवाद म्हणून वापरावयाच्या या मार्गाचा सरसहा सर्वच दरोडेखोरांचे बाबतीत उपयोग करणे निराळे.

विनोबा, जयप्रकाशांची गोष्ट निराळी. सर्वसाधारण माणसाला स्वसंरक्षणासाठी आज पोलिसांची आवश्यकता भासतेच आणि म्हणून पोलिसांचे कार्य पोलिसांकडेच सोपवून त्यांच्या कार्यात त्यांना यश येईल यासाठी प्रयत्न करणे हेच चांगले नाही काय ? निदान आपल्या कोणत्याही कृतीमुळे पोलिसांच्या कार्यात विघ्न येणार नाही व त्यांच्या प्रतिमेला धक्का पोचणार नाही, हे पाहणे तरी जरुरीचे आहे. आज जे होत आहे ते या दृष्टीने कितपत संयुक्तिक आहे ?

## हे सर्व कशासाठी ?

वर दरोडेखोरांची जी शस्त्रे सरकारजमा होत आहेत ती तर सारी अत्याधुनिक आहेत. एक तर ती पाकिस्तानांतून आणली गेली असतील आणि नाही तर प्रत्यक्ष आपल्या सैन्यांतून भल्याबुऱ्या मार्गाने ती मिळविण्यात आली असतील, यापेक्षा तिसरा पर्याय संभवू शकत नाही. आणि असेही बोलले जाते, सांगितले जाते, ऐकले जाते, की हे सारे दरोडेखोर कमालीचे धर्मभिरू आहेत. रोज रामायणाचा पाठ केल्याशिवाय ते तोंडात पाणीही घेत नाहीत. भवानीदेवीचे दर्शन घडल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही; आणि म्हणूनच की काय, प्रत्येकाने आपल्या शस्त्रास्त्रांना

देवीची सोन्याच्या पत्र्याची प्रतिमा लावलेली असते. मग याच दरोडेखोरांनी आता-पर्यंत शेकडो खून केले आहेत, हे या धर्मभिरुतेचेच लक्षण काय? आणि म्हणून पुन्हा असे विचारावेसे वाटते, की धार्मिकतेच्या बुरख्याआडून रावणाला राम ठरविण्याचा हा सारा आटापिटा का ? कशासाठी ?

वास्तविक दरोडेखोर शरण येत आहेत ते त्यांचे हृदयपरिवर्तन झाले म्हणून नव्हे तर या संकटमय आयुष्याला ते कंटाळले म्हणून. शिवाय या भागात फिरून आलेले सर्वोदयी कार्यकर्ते सांगत आहेत, की या दरोडेखोरांचा संबंध पोलिसांशी मागच्या दाराने सदैव असे. एवढेच नव्हे तर अनेक पोलीस अधिकाऱ्यांना त्यांच्या-कडून ठराविक हप्तेही बांधलेले असत. या हप्त्यांच्या मोबदल्यात दरोडेखोरांना लुटालूट, खून वगैरे करण्याची मोकळीक असे. पोलीस अधिकारीच कशाला, काही मंत्र्यांनीही दरोडेखोरांशी जमवून स्वतःच्या घरावर सोन्याची कौले चढविण्याचा उद्योग केल्याचे आज राजरोसपणे सांगितले जात आहे. आणि म्हणूनच न जाणो, कदाचित चौकशी झालीच आणि त्यात आपले पितळ उघडे पडण्याचा प्रसंग आला तर ? असे होऊ नये म्हणून व परस्पर दरोडेखोरांचा काटाही काढला जावा या दुहेरी हेतूने तर हे होत नसेल ना, अशी शंका यायला दाट जागा आहे.

बरे, या शरणागतीमुळे सारे डाकू नाहीसे होतील असे तरी म्हणता येईल का ? तसेही नाही. अद्याप अनेक डाकू बाहेर आहेतच. म्हणजेच दरोडे यापुढेही पडणार, खून होणार. आहे त्या परिस्थितीत काहीच बदल होणार नाही. हे जर खरे आहे तर पोलिसांचीच जास्त कुमक या भागात ठेवून आणि त्यातील भ्रष्टाचारी अधि-काऱ्यांना योग्य ते शासन आणि कर्तबगार व निःपक्षपाती अधिकाऱ्यांना योग्य ते बक्षीस देऊन त्यांच्याच मार्फत दरोडेखोरांचा निःपात करणे योग्य झाले नसते का ? सध्याच्या या शरणागतीच्या देखाव्यामुळे पोलीस खात्याच्या अब्रूची लक्तरे चव्हाट्यावर मांडण्यात आली आहेत—हे खरे नाही काय ?



# ॥ स्नेहयात्रा ॥

॥ ॥ सौ. निर्मला पुरंदरे ॥ ॥

॥ ॥ पाच ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

नाताळ म्हणजे फ्रान्समध्ये दिवाळीच. अर्थातच सर्वच ख्रिश्चन धर्मीय राष्ट्रांमध्य हा सण धूमधडाक्यानं साजरा होतो. ख्रिस्त जन्माचा हा सोहळा खेड्यामध्य त्यातल्या त्यात पारंपारिक पद्धतीनं साजरा होतो. शहरांमध्ये सुट्या, खरेदी, प्रवास वगैरेंनाच महत्त्व असते. माझ्या कार्यक्रमात मी या सणासाठी बिअेरने या खेड्यात जाणार होते. श्री. गी. पॉतव्हँ हे कॅथॉलिक भिक्षु आहेत. तेही त्यांच्या आई वडिलां-

कडे या खेड्यात नाताळच्या सुटीत राहणार होते. तुझी अजून त्यांच्याशी मी ओळख करून दिली नाही का? १९६७ आणि ६९ मध्ये ते पुणे मित्र-मंडळातर्फे पुण्याला येऊन गेले. सामाजिक कामांकडे त्यांचा ओढा आहे. स्वातंत्र्या-नंतर भारतात होत असलेल्या प्रगतीचं, तरुणांच्या चळवळीचं, विधायक कामांचं त्यांना कुतुहल आहे. हिंदुधर्माबद्दलही याच मुक्कामात त्यांचं अनेकांशी बोलणं झालं. वर्ष दोन वर्षांसाठी भारतात यायचा त्यांचा विचार आहे. हिंदुधर्मातील प्रतीके (Symbolism of the hindu Religion) या विषयावर त्यांना अभ्यास करा-येचा आहे. सध्या मराठी व संस्कृत शिकणं चालू आहे. त्यांचं धार्मिक शिक्षण रोमला झालं. इंग्रजीचा संपर्क रहावा म्हणून तीन महिने ते लंडनला होते. भारतात येण्यासाठी अत्यंत उत्सुक आहेत. स्वभावानं शिस्तशीर व गंभीर आहेत. धर्माच्या बाबतीत तरुण पिढीत जे विचारमंथन चाललं आहे त्यात बहुतांशी ते सहमत आहेत. कालानुरूप निश्चितपणे धर्मात बदल व्हायला पाहिजे असं त्यांचं मत आहे. फ्रान्समध्ये भिक्षूंची म्हणजे खेड्यापाड्यातील सर्वसाधारण भिक्षूंची आर्थिक परि-स्थिती समाधानकारक नाही. नवीन भरतीसाठी दिवसेंदिवस कमी प्रतिसाद मिळतो आहे. तेव्हा आता भिक्षूंनी केवळ चर्चतर्फे मिळणाऱ्या वेतनावर अवलंबून न राहता आवडीच्या इतर व्यवसायाचं शिक्षण घ्यावं व अर्थार्जन करावं असे प्रयत्न चालू आहेत.

नाताळसाठी मी ज्यांच्या घरी राहणार होते ती गींची बहिण. सौ. आनिक नूशे. यजमान श्री. रोबेर नूशे. यांना चार मुलं. दोघंही साधे भोळे. आनिक खूप प्रेमळ तर रोबेर मिस्किल, लाघवी, बाटावेत. टेलिव्हिजनपासून सर्व अद्ययावत सुख-सोयी घरात आहेत. परंतु आपल्याला खूप शिक्षण मिळालं नाही याची रुखरुख दोघांना विशेषत: रोबेरला वाटते. दिवसभर शेतीचं काम करायचं. आनिकनं घरातलं सर्व काम संभाळून गायींची धार काढण्यापर्यंत कुठलंही काम करायचं. मोठी मुलगी मारीआनिक वय वर्षे १३, गुणी आहे, हौशी आहे पण हट्टी आहे. तसंच फिलीप-व्हँसा या दोन मुलांमधील फिलीप हा विलक्षण मनस्वी आहे. वळलं तर सूत...अशातली गत. दिसायला दोघंही मुलं व धाकटी चिमखडी मारी ख्रिस्तीन सुरेखच आहेत.

एके दिवशी रोबेर मला विचारतात, 'तू एवढी वर्षभर इकडे आलीस. तुला नाही का तुझ्या मुलांची काळजी वाटत?' त्यांना खरंच मुलांची काळजी होती. एकदा आम्ही सगळेजण कुठंसं चाललो होतो. फिलीप-व्हँसा जोडीला रोबेरचं रागावणं चाललं होतं. रोबेरनं फिलिपला विचारलं, 'तुमच्या वर्गात कोणी आदर्श असा मुलगाच नाही का की तुम्ही त्याचं वागणं डोळ्यांसमोर ठेवावं?' फिलीप धुसफुसत म्हणतो, 'आमच्या वर्गात असा कोणी नाही.'

मला वाटतं नवीन विचार, शिक्षण पद्धती, मागच्या पिढीनं केलेली हुकूमशाही

म्हणजे हम करेसो कायदा या प्रवृत्तीनं उफाळून आलेला तरुण पिढीचा संताप यामुळे तिकडे दोन पिढ्यामधील अंतर झपाट्यानं वाढतं आहे. तसंच तरुणांच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या अवास्तव कल्पना व बेजबाबदारपणा आता कशालाच न जुमानण्याकडे वळतो की काय अशी भीती वाटते. १९६८ मधील विद्यार्थ्यांच्या चळवळीचा उद्रेक तू अभ्यासला असशील.

एक प्रसंग सांगते. एका निदर्शनाच्या गर्दीत एका पोलिसानं जिल नावाच्या सतरा वर्षांच्या मुलाच्या श्रीमुखात मारली. बोलाचाली वाढली. त्या मुलाला पकडलं गेलं. कोर्टानं त्याला आठ दिवस कोठडीत ठेवण्याचा हुकूम दिला. झालं. तमाम विद्यार्थीवर्गाला हा अन्याय झाला असे वाटले व लगेच सर्व शाळा बंद. पॅरिसच्या सँ. जेरमँ (St-Germin) व सँ-मिशेल (St-michel) या प्रशस्त रस्त्यांवर हजारों विद्यार्थी बसून राहिले. शेकडो शिरस्त्राणधारी पोलिसांची वर्दळ चालू होती. सांगायचं कारण आठ दिवसांची शिक्षा झालेला विद्यार्थी सायंकाळी सुटला. माझ्या मनाला भ्रम पडला बघ. समजेचना की शिरस्त्राणधारी पोलीस दहशतवादी की शिक्षण क्षेत्रातील दैनंदिन यंत्रणा पार बंद पाडून रस्त्यांवर जेठा मारून बसलेले विद्यार्थी दहशतवादी? कायदा अन्याय करू शकतो का? आणि तो कायदा रस्त्यावर येऊन बदलला जाऊ शकतो का? रात्री या प्रश्नावर घरी बोलत असताना मी मारीवोनला म्हटलं, विद्यार्थ्यांना कितीही समजावून घेण्याचा प्रयत्न केला तरीही तरुण, मला म्हणायचंय पंचविशीच्या आतले तरुण फार लाडावलेत, असं नाही तुला वाटत?' मारीवोन तर प्रोफेसर आहे. वयानं तिशीच्या आसपास. म्हणजे मागची पिढी नव्हे, नाही का? तीही म्हणते की झालंय खरं असं. कुठलीही विधायक गोष्ट त्यांनी सांगितली तर ती ऐकलीच जात नाही असं होत नाही. प्रस्थापित गोष्टी बदलायला नेहमीच वेळ लागतो. पण त्या बदलल्या जाऊ शकतात. धीर हवा थोडा. तरुणांची शक्ती जागृत झाली हे चांगलंच आहे पण ती वापरण्याचा विवेक आहेच असं सांगता येत नाही. तुला सांगते की पंचविशीनंतरचा तरुण हा स्वाभाविकपणे जास्त विचारी, कमी विध्वंसक प्रवृत्तीचा, विधायक कार्यात भाग घेणारा वाटला. माझ्या परिचयातले असे तरुण व तरुणी अशा कामामध्ये किती गुंतलेले होते म्हणून सांगू?

ती मारीवोन, परकीय मजूर-कामगारांसाठी साक्षरतेचे वर्ग घेत असे, तो आँत्वान, झोपडपट्टीतील अनेक अडचणीसाठी आपल्या मित्रांबरोबर काम करत असे. क्लोदिन, फ्रॉन्स्वॉज, एलिझाबेथचा भाऊ आणखी कोणी कोणी समाजातल्या कुठल्यातरी प्रश्नावर काम करत असतात. कुठल्याही समाजामधील ही शक्ती त्यांची आशा असते नाही का?

हे असं होतं. विषय निघाला नूशे कुटुंबात रोबेर-आनिकला वाटलेल्या मुलांच्या काळजीबद्दल. खूप मोठा आहे हा विषय. अनेक ठिकाणी चर्चा होत असत. पुढे मी

जर्मनीत गेले तेव्हाही काही मुलां-मुलींशी बोलले. तरुण पिढीचा असंतोष, संताप हा मागच्या पिढीतल्या वसाहतवाद, धार्मिक बाबतीतला आडमुठेपणा, मानवावरील अन्याय, आर्थिक उन्नतीच्या अतिरेकात हरवली जाणारी जीवनातील सहजता अशा अनेक गोष्टींविरुद्ध आहे. मी जर्मनीत होते तेव्हा अंजेला डेव्हीस या अमेरिकन निग्रो कार्यकर्तीला अमेरिकन सरकारनं तुरुंगात टाकल्याविरुद्ध सर्वत्र तरुणांची निदर्शनं चालली होती. जगात उदयास येणारी ही नवीन सहानुभूती, जागरुकता फार महत्त्वाची वाटते. ही निःस्वार्थी आहे. निरोगी आहे असं मला वाटत !

नाताळच्या सणासाठी पॉतव्हॅंचं संपूर्ण कुटुंब एकत्र जमलं होतं. बहिणी, भाऊ, जावा, पुतण्या, पुतणे, आजी–आजोबा, पणजी-पणजोबा या सर्वांचं हे हृद्य संमेलन. रोज आळीपाळीनं सर्वांच्या घरी हेच टोळकं जेवायला जात असे. गींचे सर्व नातलग या पंचक्रोशीत आहेत. घरातलं अशा वेळचं वातावरण अगदी खेळीमेळीचं, प्रसन्न, गडबड धावपळीचं असायचं.

दसऱ्याला आपटीच्या सोन्याला जसा भाव येतो ना तसं नाताळसाठी सापँ (Sapin) च्या झाडाला भाव. एकेक फांदी आणायची म्हटलीं तरी महागच. आनिक गाडीवर एक भली मोठी फांदी घेऊन आली. एका मोठ्या खोलीत ती छानपैकी कोपऱ्यात उभी केली. एकमेकांसाठी आणलेल्या भेटीची सुरेख सुरेख पाकिटं त्या फांदीवर लटकवायची. घरातल्या मुलांची लगबग अगदी काही विचारू नकोस. वडबडया मारी-ख्रिस्तीननं निर्मलासाठी केवढ्या कौतुकानं स्वतः तयार केलेली भेट ठेवली होती म्हणून सांगू ? पाच-पन्नास भेटींनी भारावलेलं, लगडलेले ते झाड नाताळच्या मध्यरात्रीची वाट पाहत कसं-बसं उभं राहिलं होतं. आनिकही मुलांच्या बरोबरीनं पळापळ करत होती. मी त्या फांदीभोवती रांगोळी काढली. उदबत्त्या लावल्या.

रात्री ११॥ ला सर्वजण नवे कपडे घालून चर्चमध्ये गेलो. प्रार्थना व इतर विधि गीच सांगणार होते. खेड्यातले सर्व लोक आले होते. रिवाजाप्रमाणे प्रार्थना, व गाणी झाली. येशूचा प्रसाद वाटला गेला. लोक घरोघरी गेले. थंडी मी म्हणत होती. बर्फाचा मात्र अद्याप पत्ता नव्हता.

गेले चार-पाच दिवस ज्या क्षणाची उत्सुकतेनं वाट पहाणं चाललं तो मुलांचा आनंदाचा क्षण आला. रात्रीचा एक वाजला होता. २४ डिसेंबरची पहाट आळोखे पिळोखे देत डोळे किलकिले करत असावी.

मी सन्माननीय पाहुणी नाही का या घरात आज ? त्यामुळे छोट्या मारी-ख्रिस्तीननं माझ्या गळ्यात हार घालून भेटी झाडावरून सोडवण्याच्या कार्यक्रमाचं उद्घाटन केलं. कोणाच्या नावे कुठलं न कुठलं सुरेख पाकिट मिळत होतं. त्याच्या-भोवती सर्वजण जमा होत होते. पाकिट उघडून पाहिलं जाई. हशा, कौतुक, आनंदाची लाट पसरत असे. मी तर मारी-ख्रिस्तीनला कल्पना साडीची (लहान

मुलींसाठी तयार शिवलेली साडी) छोटी पेटी खालच्या फांदीला अडकवली होती. सर्वांत शेवटी ती सोडवली गेली व अत्युच्च नाविन्याचा तो क्षण ठरला. नंतरचे दोन दिवस देवीजी साडी झोपेतसुद्धा बाजूला करायला तयार नव्हत्या न् काय. साडी नेसून दिसतही होती अशी सुरेख म्हणतोस. डाव्या हातानं पदर सावरण्याची धांदल मला आजही आठवते.

नाताळनंतर थोड्याच दिवसात फ्रान्सच्या पश्चिमेकडील गावांचा मुक्काम संपवून पुन्हा पूर्वेकडे लियो व नंतर थोडं दक्षिणेकडे रोमाँ येथे राहिले होते. मी तुला येथून कधी पत्र लिहिलं होतं का ते आठवत नाही. येथे मी आले तेव्हा माझे अभ्यासक्रम संपले होते. पुन्हा काही संस्था पाहणे व फ्रेंचचा अभ्यास चालू ठेवणे नवीन ओळखी, चर्चांचे कार्यक्रम असा भरपूर वेळापत्रकाचा तक्ता माझ्या हाती मारी-फ्रान्स्वाँजनं दिला. मागील पानावरून पुढे चालू म्हणेनास का ?

लियों (Lyon) हे शहर मला वाटतं फ्रान्समधील दुसऱ्या क्रमांकाचं, मोठ्या लोकवस्तीचं गाव. उद्योग-धंद्यात फार महत्त्वाचं स्थान या शहराला आहे. सहज आठवलं बघ. जगात कुठंही जा मनुष्य स्वभाव एकच असावा. या लियों शहराबद्दल एक दंतकथा सांगतात म्हणे. ह्या शहरात बांधकामं उभीच रहात नसत. गावच्या लोकांनी नवस केला, 'जर गावाची उभारणी झाली तर मेरीचा (ख्रिस्ताची माता)पुतळा उभा करू व दिवे लावू.' शहर उभं राहिलं. मेरीचा पुतळा उभारला गेला. दरवर्षी ८ डिसेंबरला दीपोत्सव केला जातो. ऐकून माझ्या मनात आलं, 'पळसाला पानं तीनच.'

तुला माहीत आहे का की सर्व फ्रान्सभर तरुणांसाठी अत्यंत अद्ययावत व सर्व सुखसोयींनी युक्त अशी मोठमोठाली सांस्कृतिक केंद्रं आहेत म्हणून ? येथे काय नाही म्हणून सांगू ? रेस्टॉरंट, चित्रपटगृह, नाट्यगृह, ध्वनिमुद्रिकांचा संग्रह, वाचनालयं, चित्रकला प्रदर्शनासाठी स्वतंत्र हॉल ह्या सर्व सोयी एकाच मोठ्या इमारतीत. मी रेन्न येथे होते तेव्हा वर्गातला अॅलँ, निकोल म्हणतात, 'आमचे डोळे दिपवण्यासाठी ह्या सुखसोयी आहेत. पण एवढा मोठा थाट केला आहे की साधा गिरणी कामगार त्यात प्रवेश करायला बिचकावाच. म्हणून आम्हाला या सुखसोयींचा उपभोग घ्यायला संकोच वाटतो."

मी मागेच तुला म्हटलंय की तरुण वर्गात ही एक फार महत्त्वाची जाणीव होत आहे. आणखी एक उदाहरण सांगू ? मी ग्रनोब्ल येथे गेले होते. जेनव्हिएव्ह, मारी-फ्रॉन्स्वाँज, जोझेत् यांचेबरोबर घाईघाईत जेवण केलं अन् एका नाटकाला गेलो.नाटकाचं नाव जॉव कारदोसो. तुला माहितच आहे, की युरोपमध्ये अविकसित राष्ट्रांमधून परकीय मजूर, कामगार फार मोठ्या प्रमाणावर येत असतात. फ्रान्समध्येही हा आकडा तीन लाखांच्या घरात आहे. या लोकांची परिस्थिती कशी दयनीय आहे हे या नाटकात दाखवले आहे. हा मजूर जास्त पगाराच्या अपेक्षेनं येतो. शहरातील

मौज-मजेच्या, कपडचालत्यांच्या मोहात पडतो, आपल्या घरादारापासून दूर, आपल्या माणसांपासून दूर रहातो आणि शहरी महागाईचं भक्ष्य बनतो. जाहिरात-बाजीचा त्याच्या साध्याभोळ्या मनावर होणारा परिणाम मन खिन्न करून टाकणारा आहे बघ. त्याचा अशिक्षितपणा, अडाणीपणाचा फायदा कुणाच्या तरी आर्थिक संपन्नतेसाठी करून घेतला जातो हे या नाटकात नाना तऱ्हांनी दाखवलं आहे.

नेपथ्याचा नोकझोक, वेषभूषेचा थाटमाट मुळीच नसतानाही एका स्वीस नाटच-मंडळाने नाटक अत्यंत प्रभावीपणाने सादर केलं. प्रेक्षक वर्गही बहुसंख्य तरुणवर्ग. नाटक पहाताना 'माणूस' मधून येणारी पुणे ते पूर्णिया ही श्री. अनिल अवचट यांची लेखमाला आठवून मन आपल्याच घरच्या दुःखानं कासावीस होत होतं. जमिनदारीच्या काचानं गळ्यापर्यंत रुतलेला कुठल्याही प्रांतातला भारतीय आम्हाला शोभा देत नाही. कोकणातून 'नशीब काढायला मुंबईच्या मोहनगरीत' आलेला व ना तळ्यात ना मळ्यात अशी अवस्था करून घेतलेला एखादा रामा बाळू




आपल्याला नवीन का आहे ? त्याचीच ही युरोपमधील आवृत्ती. मारीवोन बरोबर एकदा कुठंतरी चालले होते. रस्त्यात इमारतीचं बांधकाम चाललं होतं. मारीवोन गाडीचा वेग किंचित मंदावून म्हणते, ' बघ जरा उजवीकडे. एक तरी फ्रेंच माणूस या कामावर दिसतोय का तरी ? या परदेशीयांच्या जीवावर आमच्या गमजा चालतात. आणि त्यांना जगण्यासाठी आवश्यक त्या गोष्टीही आम्ही सुखासुखी मिळून देत नाही. '

तुझ्या लक्षात आलं असेल, की नव्या पिढीला ही फार मोठी तिडिक आहे. मारीवोन याच परकीय मजुरांसाठी साक्षरतेचे वर्ग घेते. चक्क फ्रेंच भाषेच्या श्री ग पासून, विद्यार्थ्यांची वयं बारापासून सत्तरपर्यंत. मी तिच्याबरोबर या वर्गाला गेले होते. आपल्या देशात हे सर्व किती पटीनं मोठं आहे. खेडोपाडी होणारे अन्याय व त्यावरील उपाययोजनांचा विचार मनात आला की खेद होतो.

श्री. पोल व सौ. मारीनोएल देक्ले यांच्या घरी आठ दहा दिवसांचा मुक्काम ठरला होता. बरं का या गावात माझं कुणीही ओळखीचं नाही. हे कुटुंबही नाहीच. आमच्या फ्रान्स मित्रमंडळाचा किंवा पुणे मित्रमंडळाचा येथे काहीही परिचय नव्हता. पण तसं म्हणायला आतापर्यंतच्या गावामध्ये तरी विशेष ओळखीचं कोण होतं म्हणा ? तुला अभिमान वाटेल की एक भारतीय स्त्री संस्थेच्या योजनेमार्फत आली आणि घरातली नातलग-स्नेही म्हणून गेली असंच नेहमी घडत आलं. तेव्हा पोल मारीनोएल ओळखीचे नाहीत याचा काही बाऊ नव्हता मनात. हातात बॅग घेऊन गाडीतून उतरले. तिकीट तपासनीसाला तिकीट दाखवलं व इकडे तिकडे पहात होते तेवढ्यात एका छोट्या मुलीचं बोट हातात धरून एक हंसतमुख उमदे गृहस्थ पुढे आले व म्हणाले, " मी पोल देक्ले. माझी आशा आहे, की आपणच मादाम पुरंदरे. " संपला परकेपणा.

घरी गेल्यावर मारीनोएलशी परिचय झाला. श्री. पोल हे एका चर्मकार विद्यालयात प्रोफेसर आहेत. चामडं कमवण्यापासून बूट शिवण्यापर्यंतच शिक्षण येथे दिलं जातं. उन्हाळी, पावसाळी व थंडीसाठी घालावयाच्या पादत्राणांचे आवश्यकते-प्रमाणे संशोधन व शिक्षण या विद्यालयांत मिळतं. शिक्षणासाठी निरनिराळ्या ठिकाणाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांची रहाण्याची उत्तम सोय येथे आहे. टापटीप व स्वच्छता तर सर्वत्रच आढळते.

मारीनोएल ही प्रेमळ व साधीभोळी आहे हं अगदी. दोन मुलींचं व घरातलं संभाळून फावल्या वेळात भगिनीमंडळात जाते. परकीय कामगार स्त्री-पुरुषांसाठी एक करमणूक केंद्र चालवतात, त्यात काम करते. पोल व मारीनोएल या दोघांचे आईवडील याच गावात रहातात. सर्वांचं जाणं येणं असतं व वातावरण खेळीमेळीचं आहे.

आज भगिनीमंडळात एक लघुपट व त्यावर मानसशास्त्रज्ञांच्या उपस्थितीत

चर्चेचा कार्यक्रम होता. मी गेले होते. पाश्चात्य देशांमध्ये नेहमीच नवीन विचारांवर आधारित प्रयोग चालू असतात. या लघुपटाचा विषय होता 'प्रसूतीच्या वेळी पत्नीच्या सान्निध्यात पतीची उपस्थिती.'

सुमारे शंभर स्त्रिया हजर होत्या. लघुपट संपला. प्रत्यक्ष प्रसूती, स्त्रीच्या वेदना, डॉक्टरांची सहानुभूती व आत्मविश्वास, पतीची कासाविशी व असहायता यांचं इतकं सुरेख चित्रण दाखवलंय बघ. इतक्या वेदनांनंतरची प्रसूती, बाळाचं टँहँ व पतीच्या डोळ्यांमधून घळाघळा वहाणारे अश्रु, पत्नीच्या चेहऱ्यावरचं समाधान. हे सर्व पाहून पतिपत्नींची इच्छा असेल तर पतीची उपस्थिती असावी असंच मी म्हणेन.

हॉलमध्ये तरुण प्रौढ स्त्रिया होत्या. मानसशास्त्रज्ञ एक स्त्री डॉक्टर होत्याच. लघुपट संपल्यावर मोकळेपणानं प्रश्न विचारले गेले. स्त्रियांनी आपापले अनुभव सांगितले. अडचणी विचारल्या. मतं अजमवण्यासाठी एक प्रश्नावली वाटली गेली. माझ्या जवळच्या इतक्या कागदपत्रांच्या, कात्रणाच्या पसाऱ्यात ती सापडायची पंचाइतच आहे हं. या वातारणात मोकळेपणा होता. शास्त्रज्ञांच्या प्रयोगशीलतेला मिळणारा हा प्रतिसादच नाही का ?

संध्याकाळी घरी आलो तर एका केशकर्तनालयाचे मालक, एक इटालियन गृहस्थ भेटण्यासाठी येऊन गेल्याचं कळलं. रात्री परत येणार होते. माझ्या प्रश्नांकित चेहऱ्याकडे पहात मारीनोएलनं या गृहस्थांच्या पश्चात त्यांचा परिचय करून दिला. मोठी गंमतीदार कथा. ऐक तरी. विचार करत बसशील.

नीनो दांपत्याला मूलबाळ नाही. बाजापेठेत दोघांचं केशकर्तनालय प्रसिद्ध आहे. बाई अतिशय बोलक्या. धंदा उत्तम चालतोय. या बाईंनी एक अनाथ भारतीय मुलगी अगदी तान्ही असताना दत्तक घेतली आहे. दिल्लीत Frere des Hommes (मानवाचे भाऊ) नावाची एक संघटना काम करते. युरोपमधल्या संघटनेची शाखा. अनाथ मुलांचा सांभाळ करायचा व दत्तक घेण्याची इच्छा असलेल्यांना दत्तक द्यायचे हे या संघटनेचं काम. सध्या सात आठ वर्षांची असलेली फ्रेडरिक दिल्लीत वर्तमानपत्राच्या कागदात गुंडाळून कुठंतरी रस्त्याच्या कडेला 'काळजी-पूर्वक' ठेवली होती. ना नाव, ना गाव, ना धर्म, ना काही. या संघटनेतर्फे तिची पुढील व्यवस्था झाली. पत्रापत्री होऊन ती मुलगी श्री. नीनोंच्या घरी आली. अस्सल भारतीय सावळा रंग ल्यालेली ही किडकिडीत मुलगी आज त्या श्रीमंत घरात लाडाकोडांत वाढते आहे. त्या उभयतांची ती जीव की प्राण आहे.

जन्मानं फ्रेडरिक भारतीय आहे या व्यतिरिक्त कुणालाच भारताबद्दल काही माहिती नाही. उत्सुकता आहे कळून घ्यायची. गावामध्ये भारतीय स्त्री आलीय हे कळताच या उभयतांनी आमच्या घरी संपर्क साधला. रात्री मोठ्या कौतुकानं फ्रेडरिकला घेऊन आले. रस्त्याच्या कडेला कागदात गुंडाळून पडलेली इवलीशी

फ्रेडरिक आणि सहावार साडी नेसलेली मी यांच्यातील फरक पाहून मनोमन ते संभ्रमात पडले. भारत असाही आहे तर! असाच प्रश्न त्यांना पडला असावा. 'पाहिलंस, तुझ्या देशातल्या बाई किती सुरेख आहेत. त्यांचा सुंदर पोषाख, वर्ण, केस, दात पहा तरी' तेच फ्रेडरिकला सांगत होते. तिनं माझ्याजवळ बसावं, माझ्याशी बोलावं असं त्यांना वाटत होतं. ती बिचारी बुजली होती. आईची बडबड सतत चालू होती. बराच वेळ गप्पागोष्टी झाल्या तरी फ्रेंडरिक काही खुलेनाच. सौ. नीनो माझ्याजवळ आल्या. माझे केस हातात घेऊन म्हणाल्या, 'उद्या दुपारी तुम्ही आमच्या घरी जेवायला याल का? आमच्या दुकानात मी तुमचे केस धुवून देईन. सुरेखसा अंबाडा घालून देईन. याल का? फ्रेडरिकही तोपर्यंत मोकळी वागेल जरा' इतक्या लाघवी निमंत्रणाला नाही म्हणणं कसं शक्य होतं?

रात्री सारखा माझ्या डोळ्यांसमोर कागदात गुंडाळलेला, इवलेसे हातपाय हालवणारा जीव नाचत होता. अशा अर्भकांची वाली एक ख्रिश्चन संघटना असावी. शिरा ताणताणून स्टेजवर भाषणं ठोकणाऱ्या कोणाही हरिच्या लालाला हे जीव दिसू नयेत. हक्कांसाठी सतत आक्रोश करणाऱ्या देशी संघटनांना येथे काही काम करायचंय ही भावना असू नये. आणि मग एकाद्या फ्रेडरिकला तिच्या हातून झालेल्या चुकीबद्दल, तिच्या वैगुण्यावर तिला माहित नसलेल्या देशावरून, नावं ठेवून घ्यावी लागतात, घालून पाडून बोलणं ऐकावं लागतं. काय संबंध आहे तिला भारतावरून उणंदुणं बोलायचा? भारतानं तिला जीवन असह्य केलं. मृत्यूच्या द्वारात टाकलं. मूर्तिमंत विषमता जेथे उजळ माथ्यानं नांदते तेथील अनितीचं जीवन कंठणारी जनता तिचं भविष्य कोणाच्याही हाती देऊ शकते.

या फ्रेडरिकच्या समोरचं माझं अस्तित्व मला अपराध्यासारख वाटत होतं. रात्रभर विचार केल्यानंतर दुसरे दिवशी त्यांच्याकडे जाईन तेव्हा ही प्रामाणिक कबुली मी त्यांना देणार होते. आता जगते का मरते अशा परिस्थितीतली फ्रेडरिक आता आर्थिक संपन्नतेत मला तीन वेळा विकून खाईल इतक्या वर आहे, पण ती फ्रेंच व मी भारतीय या नात्यानं. दोघी भारतीय म्हणून नव्हे. या तालुक्यात अशी आठ भारतीय मुलं दत्तक म्हणून घेतली गेलीत. पैकी सात मुली व एक मुलगा आहे. सुखात नांदताहेत बिचारी.

फ्रेडरिक वडलांबरोबर न्यायला आली. घरी गेले. सुंदर घर. फ्रेडरिकच्या खोलीत पुस्तकं, खेळणी, कपडे वगैरेंची कमतरता नाही. सौ. नीनो यांच्या खोलीत भारताची माहिती देणारी कितीतरी पुस्तकं होती. नकाशे होते. त्या नकाशावरचं दिल्लीचं स्थान फक्त त्यांनी पाठ करून ठेवललंय. त्यांना एकदा यायचंय दिल्ली पहायला. विषयावरून विषय निघत होते. मी त्यांना म्हटलं, 'फ्रेडरिकचं राष्ट्रीयत्व आता फ्रेंच आहे, तिच्या इवल्याशा मनाला भारत की फ्रान्स असा संभ्रम न पेलणारा आहे. तिचं लालनपालन तुम्ही करताहात. तेव्हा आता तिला फ्रेंच म्हणूनच सुखानं,

निर्धास्तपणे जगू, वाढू द्या.'

दिवसभर जवळजवळ त्यांचे घरी राहिले. दुपारी जेवणानंतर दुकानात गेलो. जेवणाच्या वेळातसुद्धा घरात सारखा फोन खणखणतच होता. सौ. नीनो या केश-कर्तनकार म्हणून या भागात खूप प्रसिद्ध आहेत. आज प्रथमच त्यांच्या दुकानात एक भारतीय स्त्री झाली होती. माझे केस पद्धतशीर धुण्याचा, सुकवण्याचा कार्यक्रम झाला. संपूर्ण दिवस त्यांच्या घरी घालवला म्हणेनास. सायंकाळी फ्रेडरिक मला आमच्या घरापर्यंत पोहचवायला आली.

समाजशास्त्राचा एका आठवड्याचा एक कोर्स माझ्याशाठी ठरवला असल्याची गींची पॅरिसहून तार आली. अचानकच देवले कुटुंबातून निघावं लागत होतं. घरातले सर्वचजण स्टेशनवर पोचवायला आले. कल्पना नसताना या अनोळखी छोट्याशा गावात, अनोळखी लोकांच्या सहवासात आठवडा छान गेला.

पॅरिसमधला अभ्यासक्रम सुरू झाला. अविकसित राष्ट्रांमधील सामाजिक समस्या, त्यावरील उपाय, संशोधन, शेतीव्यवस्था, कुटुंबव्यवस्था, खेड्यांतील परिस्थिती वगैरे गोष्टींचा विचार होणार होता. माझ्या वर्गात जवळ जवळ अठरा विद्यार्थी, आफ्रिकेतील ट्युनिशिया, दाहोमे, मोरोक्को, मादागास्कर, अल्जिरिया, नायजेरिया, केनया आदि राज्यामधील स्त्री-पुरुष. वसाहतवादानं पोखरली गेलेली ही आफ्रिकन राष्ट्रं. वसाहतीमधून त्यांची सुटका झाली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या समस्यांना तोंड देण्यासाठी जे प्रयत्न व्हायचे आहेत, होत आहेत त्यांना शास्त्रशुद्ध माहितीचा आधार मिळावा म्हणून पूर्वीचे राज्यकर्तेच त्यांना आता आपल्या ज्ञानाचा फायदा देत आहेत हे पाहून मला गंमत वाटली. हे विद्यालय फ्रेंच सरकारनं चालवलं आहे. शिक्षक, प्राचार्य सर्व फ्रेंचच. मनापासून व तळतळीनं शिकवण्याचा प्रयत्न चालतो. तुला सांगू? एक विशेष मला आढळला की या स्त्रीपुरुष विद्यार्थ्यांची वृत्ती मला एकदम आक्रमक वाटली. 'आता आम्हाला शिकवताहेत पण यांनीच आम्हाला पिढ्यान-पिढ्या पारतंत्र्यात ठेवलं, आमच्यावर अन्याय केले' जणू काही त्यांच्या वागण्याबोलण्यात हा भाव प्रकट होत असे. प्रश्न, शंका विचारताना एकदम चढा स्वर असे त्यांचा. याबाबतीत मी आमच्या प्रोफेसरांशी बोलले. ते म्हणाले 'आहे खरं तसं. त्यांचा राग आम्ही समजू शकतो म्हणूनच आमचं त्यांच्याशी वागणं नरमाईचं असतं.'

अविकसित राष्ट्रांचे शेतीविकास, लोकसंख्या वाढ, निरक्षरता आदि प्रश्न जगभर सारखेच आहेत. धार्मिक अंधश्रद्धांचा पगडा समाजाला केवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रगतीच्या मार्गात अडथळा करतो, शास्त्रशुद्ध विचारसरणी पचवायला अशा समाजाला किती मोठा काळ लागतो याची जाणीव आपल्याला आहेच. समाजशास्त्राच्या एका तज्ज्ञ आफ्रिकन गृहस्थांनी आमच्या या अभ्यासक्रमात एक रंगीत लघुपट दाखवला, अजून खेड्यापाड्यामध्ये आजारपणावर उपाय म्हणून नवसाचा

आधार घेतला जातो. डॉक्टरांचा या जगात अद्याप प्रवेशच नाही. त्याचं उदाहरण या लघुपटात पाहून अंगावर काटा आला.

आफ्रिकेतील कुठलातरी एक भाग. जिथं लोक अजून टोळ्या करून रहातात. जिथल्या गुन्हेगारांना शिक्षा तेथील पंचच देतात. झाडाला बांधून मरेस्तोवर मारण वगैरे. अशा एका खेड्यात एक बाई हिस्टेरियानं (हे आपण म्हणायचं. त्यांच्या मते दैवी आपत्ती) आजारी. छा छूं प्रकार होऊनही बरं वाटत नाही. गाईच्या रक्तानं आंघोळ घालण्याचा नवस बोलला जातो. तिच्या व गायीच्या भोवती ढोल, ताशांचा कर्कश आवाज. ही आपली स्तब्धच. गायीला हिच्याजवळ झोपवून ठेवतात. नंतर तीक्ष्ण शस्त्रानं तिच्या मानेलाच फक्त चिरतात. रक्ताची धार लागते. खाली बादली धरून रक्त साठवलं जातं, तिची हातपाय झाडून तडफड पहावत नाही बाबा. समोरचा प्रकार पहात असताना काळजाचा ठोका थांबतो की काय इतकं भय वाटतं. गाय निष्प्राण होते. या बाईला त्या रक्तानं माखून आंघोळ घातली जाते. गायीची आतडी दोराप्रमाणे तिच्या अंगभर गुंडाळली जाते. बाई नेहमीच स्तब्ध. आजूबाजूच्या गर्दीचे भाव अगदीं श्रद्धेचे. हूं नाही की चूं नाही. केव्हा संपतो हा प्रकार ते मला आठवत नाही. पण चित्रपटाच्या शेवटी ही बाई रोगमुक्त झालेली दाखवली आहे. एक परदेशी मानसशास्त्रज्ञ तिची मुलाखत घेतो आहे, 'तुमच्या प्रकृतीवर जी उपाययोजना झाली त्यानंच तुमची प्रकृती सुधारली नाही का?' अत्यंत समाधानी चेहऱ्यानं, लाजत, संकोचत ती म्हणते, 'होय. मी आता पूर्ण बरी आहे.'

कोंबडी मारणं, बकरी मारणं हे आपल्याला ऐकायला तरी नवीन नाही. अंगारे, धुपारे, मंत्र, तंत्र, लिंबू, उदबत्त्या, गुलालाचा यासंबंधातला वापरही ऐकतो. समोरील अघोरी प्रकार पहात असताना याही गोष्टी मनात येत होत्या. तो परदेशी तज्ज्ञ जसा त्या बाईच्या उत्तरानं हतबुद्ध झाला तीच फक्त भावना शेवटी उरते, नाही का?

पॅरिसमध्ये या मुक्कामात आतापर्यंत दोन चार वेळा येऊन गेले असले तरी या जगप्रसिद्ध नगरीची तशी ओळखच झाली नव्हती. यापुढचा काळ तेथील प्रेक्षणीय ठिकाणं पहाणं व काही सांस्कृतिक कार्यक्रमांची ओळख करून घेण्यात गेला. भारतात परतायचे दिवस जवळ येत होते.

(क्रमशः)

# जीवन है अगर जहर तो पीना ही पडेगा...

‘ एक दिवस मी बाहेर पडेन
आणि इथे जे जे अनुभवले
ते ते जगजाहीर करीन.’
या एकाच तंतूवर ज्याने
स्वत:चे आयुष्य धडपडत टांगते ठेवले
त्या अनातोली मार्चेन्कोवच्या
‘ सिक्स इयर्स इन रशियन स्लेव्ह कँप ’
या पुस्तकाची धावती ओळख.

---

## अरुण इनामदार : पूर्वार्ध

---

स्वतंत्रतेचा आणि अर्थातच जगण्याचा ध्यास घेतलेल्या माणसांनाच तेवढे हाल-अपेष्टा, अज्ञातवास, वेडाच्यापलीकडे नेऊन पोचविणाऱ्या मानसिक यातना, यांचा कर्मभोग भोगावा लागतो असे नव्हे, तर स्वातंत्र्याचे हुंकार श्वासा-श्वासांतून भरून राहिलेल्या शब्दांच्याही कपाळी तेच लिहिलेले असते की काय, नकळे !

‘ सिक्स इयर्स इन रशियन स्लेव्ह कॅम्प ’ या पुस्तकासंबंधी लिहिताना मला त्या अक्षरांच्या प्रवासाकडे आश्चर्याने बोट दाखवायचे आहे. खुद्द रशियामध्ये ते लिहिले गेले. आता इथे, मला श्रीकृष्णाच्या जन्माची वा येशू ख्रिस्ताच्या जन्माची, तसेच कर्णाच्या विलक्षण बाल्याची आठवण होणे स्वाभाविकच होय—तर तसाच या पुस्तकाचा श्रीगणेशा अदृश्य कारागारामध्ये झाला. त्याचा प्रवास त्याबरोबरच सुरू झाला, भूमिगत होऊन. या पुस्तकाच्या प्रती (अर्थात हस्तलिखित) रशियाभर पसरल्या. परंतु त्यांचा अधिक प्रसार होण्यासाठी प्रकाशनाची जरुरी होती आणि ते तर शक्यच नव्हते !

अखेर त्या शब्दांनी रूप पालटले, बालरूप घेतले.



यमुना तर दुथडी भरून भोवताली रोंरावत होती.

.. शब्द मायक्रोफिल्मवर रूप पालटून बसले आणि अखेर लंडनमध्ये या पुस्तकाने आपल्या अस्तित्वाचा जाहीर पुकारा केला !

सहा वर्षे ! रशियाच्या छळ-तुरुंगातील सहा वर्षे !

हा प्रत्यक्ष अनुभव आहे. काल्पनिका कितीही भयपूर्ण असली, तरी वाचणाराला आपल्या सुरक्षिततेच्या जाणिवेचे एक कवच सतत जाणवत असते. परंतु या पुस्तकामध्ये मात्र, त्याचा लेखक आरंभीच सांगतो, 'मी काही कोणी लेखक नव्हे; जे जगलो, ते लिहिले. नव्हे, लिहिण्यासाठीच जगलो, जगत राहिलो–

व्लादिमिरच्या तुरुंगात असताना मी अनेकदा नैराश्याने झपाटला जायचो.

माझे अनेक सहकारी कैदी करीत, तेच मी केले असते. सरळ माझ्या जेलरवर उडी घेण्याचा मोह होई : सुटकेसाठी नव्हे, मरण मिळवण्यासाठी. मरता यावे, म्हणून !

परंतु मी जगलो. जगत राहिलो–

—एक दिवस बाहेर पडेन आणि इथे अनुभवले, ते जगजाहीर करीन; अशा एकाच तंतूवर माझे आयुष्य मी धडपडत टांगते ठेवले—

आणि म्हणून ही 'कैफियत' मांडण्याची परवानगी मागतो.

इथे लेखक आपल्या पूर्वायुष्याची वाट पुन्हा चालू लागतो आणि प्रकाशाला, मुक्त हवेला, दिपणाऱ्या; शरीराची अजूनही जखडल्यासारखीच सीमित हालचाल करणाऱ्या; त्या माणसाच्या तोंडून अडखळत्या शब्दांनी कथा सुरू होते.

"जा, तोलिया, जा...उशीर होईल पोरा, गाडी जाईल रे..."

मला माझ्या सहकाऱ्यांच्या हातांचा स्पर्श जाणवला. हात. सालटी निघालेले. क्वचित पांढऱ्याफेक फक्कीच्या रेघांसारख्या रेघांमधून तळहातावर रक्ताच्या रेषा अस्पष्ट उमटलेले हात. घट्ट, कणखर. बधीर बनलेले हात. खडबडीत—कपारींसारखे, खडकाळ हात—

—नाही, मला नाही काही सुचत. सगळा आनंद कोठच्या कोठे गेला आणि माझ्या नरड्यात कसेतरीच झाले. मग मात्र मी वळालोच नाही. पुढे चालत निघालो. पाय आतून ओढल्या—ताणल्यासारखे वाटत होते. एकदा चांगलीच ठोकर लागली. नकळत मागे नजर गेली—सगळेजण अजून तिथेच होते. 'जपून!' एकजण ओरडला. सणक पार मेंदूपर्यंत गेली होती, परंतु मी हसलो... 'काळजी करू नका!' मी हात हलविला व चालू लागलो.

आता मी कॅम्पचा टप्पा ओलांडला.

निर्मनुष्य 'झोन'—नो मॅन—लॅन्डची किनार.

हेडक्वार्टर्स दिसू लागल्या आहेत—बसक्या, कठोर, रुक्ष तोंडांच्या.

आणि त्यांच्यापलीकडे मोकळे, मुक्त हवेचे आभाळ.

एक पक्षी तेथून रिंगण घेऊन उडाला आणि मला जाग आल्यासारखे काहीतरी वाटले.

मी अनातोली मार्चेन्कोव. माझे वडील रेल्वे-कामगार होते. आई झाडकाम करायची आणि आठ वर्षे शाळेत घालवल्यावर आम्हीही बांधकामांवर मजुरी करायला सुरुवात केली. थोडक्यात, आमचे उभे कुटुंब खरेखुरे 'श्रमिक' होते.

समाजवादी सोव्हिएट सरकारच्या न्यायाचा पहिला दणका आम्हाला बसला, तो कझाकस्तानमध्ये असताना. म्हणजे झाले काय, की तेथील कारागन्दा या गावी नवे हायड्रो-इलेक्ट्रिक स्टेशन उभारले जायचे होते. आमच्या कामगारांच्या खोपट—गल्लीत एके दिवशी रात्री झाली दणका-दणकी. मिलिट्रीवाले आले आणि तिथे जे सापडले, त्यांना सगळ्यांना धरून घेऊन गेले. खरे तर 'तयार मंडळी' कधीच पसार झाली होती, आमच्यासारखी नवखी कोकरे सापडली त्यांना. पण त्याचे त्यांना काय हो? नगाला नग दाखवला, म्हणजे भागले.

आम्हा सगळ्यांचा फैसला एका दिवसात करण्यात आला. आम्ही गुन्हेगार ठरलो

आणि सगळयांना सक्तमजुरी फर्मावण्यात आली. आठ वर्षे खडी फोडून मी बाहेर पडलो, तेव्हा खोपडीत एकच निश्चय जाम बसला होता,

इथे राहायचेच नाही! ही रशियाची उलटी चाल नकोच आपल्याला! पोट काय, कुठेही चार टोपल्या टाकून भरता येईल. पण इथून निसटले पाहिजे!...या कामात मला एक साथीदार सापडला–अनातोली बुद्रोव्स्की. एक से भले दो! १९६० च्या ऑक्टोबरमध्ये आम्ही इराणियन बॉर्डर ओलांडायचा प्रयत्न केला आणि–हे:, सोव्हिएट गार्डस्‌नी आम्हाला आडवे केले. बॉर्डरपासून अवघ्या ५० मीटर्सवर आमच्या कॉलर्स मागे खेचण्यात आल्या.

पाच महिने आमच्याकडून कबुली मिळवण्याचे सख्त प्रयत्न त्यांनी केले. रोज–दररोज.

"आम्ही देशद्रोही आहोत, आहोत, आहोत!" बस. एवढेच आम्ही म्हणावयास हवे होते.

अखेर आमचे बुद्रोव्स्की कोसळले. तुर्कमेन सुप्रीम कोर्टापुढे त्याने हवा तसा कबुलीजवाब दिला आणि तो माफीचा साक्षीदार बनला. मी हटलो नाही. छे:. त्याला दोन वर्षे आणि आमच्या कागदावर सहा वर्षे फर्मावली गेली. मी भडकून विचारले, "पण एक सांगा, माझ्या बाजूचा एकही साक्षीदार तुम्ही पहात नाही–विरुद्ध तेवढे खरे–मी खोटा! ही काय गडबड!"

"कोणते साक्षीदार पहावेत, ते कोर्ट ठरविते–तू नाही!" मला पुढे रेटीत गार्ड म्हणाला.

ताश्कंद, आल्मा, आता नोवोसिबर्स्क. तीन महिने मी बोटींवर काढले. दहा कैद्यांसाठी असलेल्या जागेमध्ये तीस कैदी, अशा त्या प्रवासात आमच्यापैकी एखादा मेला असता, तरी तो खाली पडला नसता, इतक्या व्यवस्थितपणाने आम्हाला कोंबण्यात आले होते. मेच्या अखेरी-अखेरीस आम्ही पोटमा या ठिकाणी येऊन पोचलो. मॉर्डोव्हियन कॅम्प. मॉस्कोच्या आग्नेयेस ५०० किलोमीटर्सवर हे ठिकाण आहे.

मी या परिसरावर भिरभिरती नजर टाकली. सर्वत्र तारांचे जाळे पसरले होते आणि सारख्या अंतरावर वॉच-टॉवर्स उभारलेले होते. सर्च-लाइटसचे झोत रोखलेले होतें व गार्डस्‌च्या आरोळयांबरोबरच त्यांच्याबरोबर असलेल्या पोलिसी कुत्र्यांच्या अधूनमधून भुंकण्याचे आवाज लांबवर ऐकू येत होते.

या प्रदेशात लोकांपेक्षा पोलीसच जास्त होते आणि कुत्री तर कॉकेशसच्या मेंढपाळ लोकांजवळ होती, त्याहूनही जास्त होती. सगळ्या देशातून येणारी लहानगी पोरे फार दिसायची–युक्रेनियन्, लटाव्हियन्स्–सगळी.

–मॉर्डोव्हियन्–कॅम्पमधील आपल्या पपांना, मॉम्‌ला भेटायला आलेली.

आता माझी भेट मी कॅम्पला अर्पण करायची होती–माझ्या रक्ताची, माझ्या मांसाची.

कॅम्प नं. १० मला माझी 'प्रॉपर्टी' देण्यात आली. विन नाडीची पॅन्ट, शर्ट, बुरशी चढलेला कोट, जॅकेट, टोपी, बूट. अन्डरवेअर्सच्या दोन जोड्या मिळाल्या, हा सर्व कामाचा गणवेष होता. खेरीज बिछान्यादाखल एक चटई मिळाली. एक उसे आणि पांघरायला एक वास मारणारे ब्लँकेट. पुष्कळ झाले...मेस-हॉलमध्ये एकमेकास खेटून खडबडीत टेबले भरली होती व त्यांच्या दोन्ही बाजूस बाके मांडली होती. रांगेतून माझा नंबर लागला, तेव्हा मला एक वाडगाभर 'श्ची' मिळाली. (श्ची म्हणजे कोबीचे सूप.) सबंध देशभर प्रसिद्ध असलेल्या 'श्ची' हे सूप म्हणजे केवळ थट्टा होती. दुसऱ्या फेरीमध्ये ग्रुएल (आपल्याकडील पेजेसारखा पदार्थ) आले तीन चमचे भरून !

याखेरीज दिवसाच्या रेशनमध्ये पाव ७०० ग्रॅम्स होता आणि मांस ५० ग्रॅम्स मिळे. (गार्डवरील पोलिसी कुत्र्यांना मांस ४५० ग्रॅम्स असायचे.) लवकरच मला समजले, की हा आहार वैद्यक शास्त्राने मंजूर केला होता. २४०० कॅलरीज एवढी शक्ती आम्हाला रोज मिळावी अशा हिशोबाने. कष्टाचे काम करणाऱ्याला हे अन्न म्हणजे भयानक क्रूरपणा होता आणि ते सोडून दिले, तरी त्यातील प्रत्यक्ष पदरात पडायचे ते अगदीच मुंग्यांना अन्न घालावे, तेवढे. परंतु आम्हाला जिवंत राखण्यास त्यांच्या मताने ते पुरेसे होते.

मला नियमावली ऐकविण्यात आली. कैद्याने दर गुरुवारच्या राजकीय पाठांना उपस्थित राहिले पाहिजे. कामाला गणवेषात आले पाहिजे. 'पाहिजे, पाहिजे, पाहिजे...' नियमांचा भंग म्हणजे बाहेरून येणाऱ्या वा जाणाऱ्या पत्रांमध्ये कपात, अन्नामध्ये कपात, वर्षातून एकदा घडणाऱ्या कुटुंबियांच्या भेटीमध्ये कपात. 'गंभीर' गुन्ह्यांबद्दल मला एकांतवासही भोगावा लागणार होता. 'ठीक. चालायला लाग.' नियमांचे कागद गुंडाळून आमच्या काम्पाऊंडचा कॉम्रेड कमांडर गरजला, 'उद्यापासून तुझी हजेरी कामावर !'

बरॅक्समध्ये माझ्या भोवती सगळ्यांचे कोंडाळे जमले. 'सहा वर्षे !' आमचा 'प्लॅटून कमांडर' तो आमच्यापैकीच 'सीनियर' बंदी होता. दांत विचकून म्हणाला, 'पोरखेळ आहे झाले !' बाकीचेही हसले. त्यांच्या दृष्टीने ६ वर्षांची शिक्षा म्हणजे काहीच नव्हते. माझ्यासारखेच त्यांचेही खटले बंद दारांमागे चालवण्यात आले होते. 'पण काही खटले तर जाहीरपणें चाललेले मी पाहिले आहेत !' मी मध्येच म्हणालो. 'ते साधे गुन्हेगार असतील !' एकजण म्हणाला, 'साधे घरफोडीवाले, नाहीतर दरोडेखोर !'

मी मुंडी हलवली. आम्ही त्यांच्यापेक्षा भयंकर होतो 'देशाचे गुन्हेगार !'

लांबलचक लोखंडी रुळावर गार्डने दणदण दहा टोल मारले. कर्फ्यू टोल. रात्रीचे दहा. मी ऐकत होतो. टोलांचा आवाज लांबवर पसरत गेला.

दुसऱ्या कॉम्पाऊंडमधील दहा टोल ऐकू आले. तिसऱ्या दहाव्या. आज मी

पहिल्यानेच हे टोल ऐकले. आता मला त्यांची सवय होईल. श्वास रोखून मी अंधारात डोळे फाडून पहात होतो. माझ्या सहकाऱ्यांचे गरम श्वास त्यांच्या तोंडाच्या वासासह माझ्या अंगावर येत होते.

मॉस्कोच्या लाल चौकातील स्पास्की मनोऱ्यावरील घड्याळ आता दहाचे टोल देत असेल. माझ्या मनात आले, या कर्फ्यूच्या टोलानेच प्रतिध्वनी त्या घड्याळातून येत असतील का? जसे काही सबंध देशभर कर्फ्यू टोलच या वेळी वाजत आहेत!

कोबी, टोमॅटोज, गाजरे, बटाटे वगैरेच्या लागवडीला मला जुंपण्यात आले होते. लवकरच माझ्या लक्षात आले, की क्षणाचीही उसंत न घेता दिवसभर मरणारा कैदीही, त्याचा कामाचा नेमलेला 'कोटा' काही पुरा करू शकत नाही. बाहेरच्या मजुराला मिळे तीच ७० ते ७५ रूबल्स एवढी मजुरी आम्हाला मंजूर होत असे. फक्त फरक एवढाच, की बाहेरच्या मजुरीतून फक्त कर वजा व्हावयाचे, तर इथे करांखेरीज निम्मी रक्कम 'कॅम्प देखभाली'साठी जायची, युनिफॉर्मचा खर्च त्यांतूनच यायचा आणि १३ रूबल्स जेवणासाठी वजा होत असत. बाहेर माझा जेवणासाठी ५० रूबल्स खर्च होई आणि तोही कसेबसे कोरडे ओले मिळावे, एवढेच. इथल्या १३ रूबल्सचे जेवण त्याबद्दल बोलू नये, हेच चांगले!... आणि कॅम्पभर सगळीकडे सरकारी पत्रके चिकटवलेली होती–बाहेर असायची, तशीच 'पैसे वाचवा व मोटरकार कमवा!'

मी संतापलो होतो. वाटे, की उडत गेले हे काम! नाही होत म्हणून द्यावे सांगून. एकांतवासात टाकतील झाले.

परंतु फार पूर्वी मी निश्चयच केला होता–तेथे बसणे होणार नाही! इथूनच मी एक दिवस पळालो नाही, तर नाव सांगायचा नाही!

त्या दृष्टीने मी कोणीतरी भाईबंद हुडकीत होतो. तो मला मिळाला. अनातोली बुरोव्ह नावाचा हा तिशीतला, टकल्या, मोठा संगदिल होता. त्याचे वडील 'भांडवलदार' होते. मोठी ऐकण्यासारखी गोष्ट आहे. १९३० च्या सामुदायिक शेतीच्या काळात जवळ दोन गाई असणांराही 'भांडवलदार' या शिवीला पात्र होत असे. तर अशा काही 'भांडवलदारा'ना बोटीत भरून पार लांब, ऑब नदीच्या दुसऱ्या टोकाला नेऊन वैराण भागात सोडून देण्यात आले.

'करा काहीतरी, आणि जगा वेट्यांनो कसे जगायचे असेल ते!'

त्या बिचाऱ्यांनी दगडांना घासून धार लावली, शस्त्रे कशीबशी तयार केली. जमिनी उकरल्या. नांगरल्या. वैराण जागेवर वाडी उभी केली. पिके डोलू लागली. पाखरांच्या गोड किलबिलाटाने परिसर भरून गेला. कित्येकजण मेले. इतर उभे राहिले–ताठ उभे राहिले.

तीन चार वर्षांनी 'समाजवादी' सरकारी बोटी परत आल्या. 'आँ!'

कप्तानाने किंचाळून विचारले, 'बेटयांनो! तुम्ही मेला नाहीतच काय शेवटी? पुन्हा आपले तुम्ही भांडवलदारच!'

त्यांच्या विध्वंसाचे आता सांगत नाही. त्यातल्या एकाचा बुरोव्ह हा मुलगा त्याला १९४५ मध्ये सैन्यात भरती केले गेले. तेथून त्याने पळ काढला, तेव्हा त्याला पकडून ५ वर्षे सक्तमजुरी फर्मावण्यात आली. तेथूनही त्याने दोनदा सुटकेचा प्रयत्न केला आणि अखेर माझी त्याची गट्टी जुळली. तेव्हा तो १६ वर्षांसाठी मॉडेव्हियन कॅम्प्सचा पाहुणा होता.

तेव्हा आमचा हा दोस्त, पळण्याच्या बाबतीत चांगला तयार होता. आम्ही आमच्या बरॅक्सखाली बोगदा खणण्याचे ठरविले. रात्री दहाला कर्फ्यू-टोल झाल्यावर दोनपर्यंत सामसूम असे. दोनला गस्त येई व मग पुन्हा पहाटेपर्यंत आम्ही कामाला लागत होतो. तिसऱ्या एकालाही आम्ही साथीला घेतला.

त्या सगळया मेहनतीचा फायदा असा—सगळया बरॅक्सखाली पाणी लागले!

दरम्यान आणखी एक गोष्ट घडली. सबंध रात्री कष्ट, दिवसा कष्ट. आमच्याने कामाचा कोटा काही पुरा होत नव्हता. शेवटी व्हायचे तेच झाले. आम्हाला एकांत कोठडीमध्ये डांबण्यात आले.

एकांत कोठडीतील मुख्य शिक्षा म्हणजे सक्तीचा उपास. ब्रेकफास्टच्या वेळी एक कप गरम पाणी व दिवसाचे ब्रेडचे रेशन ४५० ग्रॅम्स ताब्यात मिळे. दुपारचे जेवण एक वाडगाभर सूपवर भागे, तर रात्रीच्या जेवण्यासाठी खराब झालेला कॉड्र माशाचा एक तुकडा असे, तोही काडयापेटीच्या आकाराचा!

सबंध शिक्षेपेक्षाही, ही एकांत कोठडी संपण्याची वाट पहात मी फार तळमळू लागलो.

एकांत कोठडीच्या जवळपास गवताचे एक पातेही उगवू दिले जात नसे—कैद्यांनी खाऊन टाकले तर? नेहमीच्या कॅम्पमधील अर्धपोटी राहण्याएवढे जेवणही मला आता एखाद्या मेजवानीसारखे वाटू लागले होते. सात दिवस मी तेथे काढले. आठव्या दिवशी बाहेर पडलो, तेव्हा सहा महिन्यांच्या दुखणेकऱ्यासारख्या माझ्या पावलागणिक झोकांड्या जात होत्या. आधार घेत घेत मी निघालो.

दुसऱ्याच दिवशी मला कामावर हजेरी द्यावयाची होती.

लवकरच मी थोडाफार ठिकाणावर आलो आणि आमचे त्रिकुट पुन्हा जमले. बुरोव्ह, मी आणि तो तिसरा. आमच्या बराकीखाली पाणी लागलेच होते. आता एक नवी बरॅक-बिल्डिंग उभी रहात होती. त्या रात्री कैद्यांना फिल्मशो होता. बातम्या-न्यूज-रीलचे चऱ्हाट संपले आणि आम्ही हलकेच—पसार!

सामसूम होती. आमचे श्वासच ऐकू येत होते. उत्सुक, थंडगार बोटांनी आम्ही कुदळींना हात घातले. कुदळी-फावडी कसली, काहीतरी खणण्यासारखे. टॉवरवरून प्रकाशकिरण सावकाश फिरत शोध घेत होता. तो जवळ येताच आम्ही लपत

होतो, पुन्हा मातीशी झगडत होतो. आम्ही खणले, खणले —

— आणि कुदळी थांबल्या. माना करकरत उचलून अंधारात आम्ही एकमेकांच्या वाकड्यातिकड्या, भुतांसारख्या तोंडाचा अंदाज घेत उभे झालो —

— पाणी. पाणी लागले होते.

आमचे मणके ओणवे होताना वाजले आणि बाहेर पहारा करणारा बुरोव्ह, आत घुसला. 'गार्ड !' उत्तेजित स्वरात कुजबुजला, 'आत्ताच पुढे गेला !'

आम्हा दोघांच्याही भिवया एकाचवेळी उंचावून वाकड्या झाल्या. घाईने आम्ही खंदक बुजवून टाकला आणि त्या ओल्या मातीवरून बाहेर पडलो.

— आणि सबंध परिसर प्रकाशझोतांनी झगमगून गेला.

पहारेकऱ्यांनी रागाच्या भरात आमचे प्राणच घेतले जाऊ नयेत म्हणून आपल्या रायफल्स आणल्या नव्हत्या. लाथा-बुक्या-ठोशांचा वर्षाव झाला. शिव्यांची फैर झाडीत आम्हाला एक स्पेशल झोनमधील सेलमध्ये हातकड्या घालून लाथांनीच उडविण्यात आले.

तीनचार दिवस आम्ही तसेच रक्ताच्या थारोळ्यात विव्हळत पडून राहिलो. अन्न आत ठेवण्यापुरते दार उघडले जात होते. पण कसले काय नि कसले काय. दोन हातांवरील ते अन्न घेण्याएवढी हालचाल करण्याचेही त्राण आमच्या अंगात उरले नव्हते.

## विश्वास बसणार नाही

हळू हळू आम्हाला जाणीव आली. या 'स्पेशल' कोठड्यांचे नांव 'स्पेटझ'. हे नाव कैद्यांनीच दिले होते. सांगून विश्वास बसणार नाही अशा गोष्टी मी इथे अनुभवल्या. सुटकेचा प्रयत्न, गार्डसना विरोध, वा कामाचा कोटा पुरा न होणे — वारंवार — अशांच्या कपाळी 'स्पेटझ'मधील कारावास असे.

इथेही मुख्य शिक्षा तीच होती — भूक. फरक हा, की रेशनमधील कपातीबरोबरच कामाचे प्रमाणही इथे वाढविण्यात येई. तेवढे काम अर्थातच होत नसे — मग पुन्हा रेशनमध्ये कपात !

हळूहळू माणसाचे एक जनावर होई. भुकेने वखवखलेले. लाचार. भेसूर —

कशाचा आत्मसन्मान नि व्यक्तित्व. काय असते नीती नि कराल काय ? तिघांनी आत्महत्येचा निश्चय केला. ते कुंपणाकडे निघाले. खुरडत — आणि...'हॉल्ट् !' वॉच–टॉवरमधील गार्ड रायफल् कडाडल्यासारखा ओरडला, 'चढण्याचा प्रयत्न करू नकोस ! रायफलच्या रेंजमध्ये आहेस, राजा !'

'झाड ! लवकर !' तो कैदी तारेवर पाय ठेवीत म्हणाला, 'उपकार होतील !'

— आणि रायफल मौजेने फडफडली.

त्याचे शव कुंपणावर लोंबकळत राहिले.

दुसरा.

तिसरा ... पण हा मेला नाही. त्याला हॉस्पिटल-झोनकडे नेण्यात आलें.

— तेवढ्यापुरती – ' स्पेटझ 'मधून सुटका !

कित्येकदा साध्या कैद्याची एक चुकीची समजूत व्हायची — राजकीय कैद्यांना जरा बरे दिवस असतात, अशी. मग ते 'पार्टी 'वर हल्ला करणारे एखादे पत्रक लिहायचे किंवा जवळच्या चिंध्यांचाच एक 'अमेरिकन ध्वज' तयार करून तो कोठेतरी उभारायचे ! झाले ! ते राजकीय कैदी होण्यास हे पुरेसे असे.

पण लवकरच त्यांना सत्य समजून यायचे — परंतु आता वेळ गेलेली असे. ते तक्रारी करीत. क्वचित अंथरुणात आपल्या नाड्या कापून टाकून मरून जात. कित्येकजण पशुतुल्य जिणें जगत, जगत रहात –

आणखी एक उपाय होता — कम्युनिस्ट अत्याचारांच्या निषेधाचा. तोंडाने ओरडण्याचा उपयोग नव्हता.

हे लोक आपल्या कपाळावर, तोंडावर, गोंदवून घेत असत. ' क्रुश्चेव्ह, ब्रेझनेव्ह, वोरोशिलोव्ह — सगळे हुकूमशहा, भांडवलवाले आहेत !' ते लिहीत, लिहीत कसले, चेहऱ्यावर खोदून काढीत, त्यासाठी एकादी वायरची धसडी किंवा बुटाचा अणकुचीदार खिळा घासून टोकदार करण्यात येई. काळा बुटाचा सोल जाळून ती काळी राख लघवीमध्ये मिसळून तो काळा रंग या कामी वापरण्यात येत असे– ' क्रुश्चेव्हचा गुलाम !' 'कम्युनिस्टस् हे हुकूमशहा असतात; ते रक्त पितात '–

एक तरुण पोरगा आमच्यात होता, निकोलाय शेरबेकॉव्ह नावाचा. त्याच्या तोंडावर एक कणभरही जागा अशी नव्हती, की जेथे गोंदविलेले नव्हते ! त्याने एका डोळ्याखाली गोंदले होते, ' लेनिन–निव्वळ निव्वळ हुकुमशहा.' आणि दुसऱ्या डोळ्याखाली त्या धृपदाचा उत्तरार्ध – ' कितीजण त्याच्यामुळे सोसतात, पहा '–

सप्टेंबरच्या एका सायंसमयी ती बातमी फुटली. त्याच्या सेलच्या भिंतीवर ' शेरबेकॉव्हने जोराने काही आपटले, तेव्हा पीप-होलमधून एक गार्ड डोकावला.

' काय आहे ?' तो खेकसून म्हणाला.

शेरबेकॉव्हने काहीतरी त्याच्याकडे भिरकावले. गार्डसुद्धा पहातच राहिला – शेरबेकॉव्हने आपला कान कापून तो फेकला होता आणि त्यावर अगोदर गोंदवलेले होते.

' पार्टीच्या २२ व्या कॉंग्रेसला प्रेमाची भेट !'

परंतु का, कां म्हणून माणसे असे करीत ?

– किंवा, करीत असतात ?

एकदा गोंदवून घेतल्यानंतर सर्वसामान्य जीवन संपूनच जाते.

तरीही, तरीही, का माणसे असे करतात ?

असाच एकजण होता. त्याने कपाळावर गोंदवून घेतले. डॉक्टर्सनी ते कातडे फाडून काढले, व खाली-वर शिवून टाकले. त्याने पुनः तेच केले. हा प्रकार तीन-चारदा झाला. आता त्याच्या कपाळाचे कातडे एवढे ताणले गेले होते, की त्याला

त्याचे डोळेच मिटता यत नव्हते.

आम्ही त्याला ' सदैव जागता सोबती ' म्हणू लागलो.

मला मात्र हे पटले आहे. निराशेच्या क्षणी असे वाटते, का म्हणून मी माझा कान, नाक, वा हात तोडून काढून या राक्षसांकडे फेकू नये ? का म्हणून ?

' स्पेटझ 'मध्ये तीन आणि एकांतवासात अर्धा महिना काढल्यावर मला ' जनता कोर्टा 'पुढे उभे करण्यात आले. एकजण जज्ज, काही प्रेक्षक, खूपसे कँप-अंमलदार, एक वयस्कर माणूस, एक बाई. या सर्व ' जनते 'ने ' त्यांच्या ' न्यायालयात एक अवाक्षरही उच्चारले नाही. या फार्समध्ये भाग घ्यायला मी नकार दिला. काय भाग घेऊन करायचे !

कँपमधील माझी तीन वर्षे, मी व्लादिमिरच्या तुरुंगात काढावी, असे फर्मावण्यात आले.

मॉस्कोपासून एकशेऐंशी किलोमीटर्सवर, झारच्या वेळेपासून एक तुरुंग व्लादिमिरमध्ये आहे. कित्येक इतर कैदी सोबत्यांबरोबर आमची रवानगी तिकडे झाली. एक गोष्ट खरी. सबंध रशियाभर, सामान्य लोकांना कैद्याबद्दल दया असते. सरकारी प्रचार काहीही असो. एका स्टेशनवर असेच झाले. पाचा-पाचांच्या रांगांनी, गार्डस व कुत्रे, यांच्या पहाऱ्यांतून आम्हाला रस्त्यातून चालवण्यात आले. भोवताली हा हा म्हणता लोक जमलेच. ' अरे !–कोठे चालवले बाबांनो तुम्हाला ?' अनेक हाका आल्या आणि त्या जमावातून आमच्यावर सिगार, चॉकोलेट्स्, ब्रेड, नाणी यांचा प्रचंड वर्षाव झाला !

' ट्रान्स्पोर्ट कमांडर 'ला मात्र दणकून शिव्या बसल्या – आम्हाला दिवसाउजेडी उघडयावरून चालवून लोकांना तमाशा दाखविला, म्हणून !

सेल नंबर ५४.

साडेचार मीटर्स बाय अडीच. एवढयात आम्ही पाचजण होतो. भितीमध्ये आम्हाला झोपण्यासाठी कोनाडे काढलेले होते, आणि समोर एक उजेड न येईल, अशी खबरदारी घेऊन काढलेली खिडकी. बाहेर पहाऱ्याच्या गार्डसचे बूट कायम घुमत असत आणि वारंवार दाराच्या पीप होल्मधून ते आमच्याकडे नजर फेकीत– खोलीत एक लोखंडी ' तिजोरी ' होती, पाचजणांसाठी पाच खण पाडलेली. तीत आमचे दिवसाचे ब्रेड-रेशन ठेवायचे असे व भांडीही. खोलीच्या मधोमध एक लालभडक लोखंडी टेबल जमिनीला वेल्डिंगने जखडलेले होते.

इथे मुख्य फरक असा, की येथे काम नव्हते. सकाळी ६ वाजता झोपण्याचे कोनाडे सोडावे लागत, ते रात्री दहाला पुन्हा कर्फ्यू. सोळा तास कैद्याने करायचे तरी काय ? चेस खेळता येई. काही लिहिता येई. (दोन आठवडयात १२ पाने.

त्याला कडक चेकिंग असे.) प्रिझन – लायब्ररीतून काही वाचायला आणता येई.

परंतु भुकेने वखवखलेल्या माणसाला कशानेही ठिकाणावर येता येत नाही. सुरुवातीचे दोन महिने रोजचे ब्रेड–रेशन ४०० ग्रॅम्स् एवढे होते. उजाडले, की उठायच्या टोलांच्याही अगोदर आम्ही उठून बसत असू. दाराच्या फटीजवळ केलेल्या पिंजऱ्यात बाहेरुन ब्रेड येऊन पडण्याची वाट पहात. मग तो ब्रेड आला म्हणजे तेथे एकच झुंबड उडायची – आपल्या वाटयाला एखादा मोठा तुकडा येतो काय, ते पाहण्यासाठी प्रत्येकजण झुंजत असे !

–जणू काय नऊ-दहा ग्रॅम्स्च्या एखाद्या जादा तुकडयाने आम्ही उपासमारीपासून बचावणारच होतो !

जे अधिक शहाणे होते, ते दिवसाच्या पावाचे तीन भाग करीत, तीन वेळच्या जेवणासाठी. ब्रेक-फास्टसाठी आणखी काही होते–थोडेसे खराब झालेले सार्डाईन्स व एक कपभर गरम पाणी.

परंतु रेशनचे तीन भाग करणारांची फार तगमग होत असे. भुकेने व्याकूळ होऊन तासन तास घालवताना आपल्या तिजोरीमध्ये पावाचा एक तुकडा आहे, ही जाणीवच त्याला इतकी जाळून काढी, की तो राहिलेला तुकडा तोंडात कोंबी. दाढेत, जिभेखाली – जमेल तिथे तो दडवून काही मिनिटे तो जास्त वेळ पुरवण्याची विलक्षण कोशीस तो करीत असे.

एके दिवशी आम्हाला एक बातमी समजली. फ्रॅन्सिस गॅरी पॉवर्स, अमेरिकन यू–२ पायलट, (रशियावर पाडलेला), त्याच्या सुटकेच्या वर्षांआधी सुटला होता. एकूण शिक्षेच्या एक चतुर्थांशसुद्धा शिक्षा त्याने भोगली नव्हती.म्हणजे,एक भांडवलदार गुप्त हेरही आमच्यापेक्षा कमी धोकेबाज होता तर ! आम्हाला त्याच्या या लवकर सुटकेचे कारण असे सांगण्यात आले, की त्याचा कष्टाळूपणा, आज्ञाधारकपणा व शिस्त पाहून त्याला सोडले. परंतु हे खोटे होते. आमच्या एका हेराच्या सुटकेबदली हा सुटला, हे पुढे आमच्या कानावर आले. हा पॉवर्स आमच्याच तुरुंगात होता, हेही आम्हाला काही दिवसांनी समजले. परंतु त्याचे जग आमच्यापेक्षा वेगळे ठेवण्यात आले होते. त्याला उत्तम वागणूक मिळे. त्याला आवारात फिरायची मुभा होती. जेवण चांगले मिळे. सर्वांवर ताण म्हणजे, आमच्यापैकीच एका कैद्याला त्याच्या सुटकेचे आमीष दाखवून पॉवर्सच्या सोबतीला ठेवण्यात आले होते. त्याच्याकडे काम हे, की रशियाबद्दल कमीत कमी, पण चांगल्यात चांगले बोलून जी उत्तम वागवणूक आपल्याला दिली जाते, तीच सर्व कैद्यांना मिळते, असा पॉवर्सचा ग्रह त्याने करून दिला पाहिजे !

आमच्यापैकी, गेनेडी नावाचा एकजण अविश्वासू होता. त्याला काही हे पटत नसे. 'एकाच तुरुंगात अशी दोन जगे असणे कसे शक्य आहे ?' तो म्हणे.

अखेर एक दिवस प्रत्यक्षच पाहयचे ठरले. परंतु पाहणार काय ? पॉवर्सचे तर

आम्हाला नखही दिसू दिले जात नसे, आमचा वारा त्याच्या दिशेला जाऊ दिला जात नसे. त्याची कोठडी मात्र आमच्या शेजारीच होती. त्या दिवशी मात्र काही तरी घडले. अनेक कैद्यांनी एकदम आरडा ओरडा केला तेव्हा कित्येक गार्डस् धावत आले.—गेनेडीने दोन चमचे गिळले होते.

—वैतागलेले कैदी असे करीत. गोंदवून घेण्याबद्दल तर मी मागे लिहिलेच आहे. त्याखेरीज कैदी आपले पोट चिरून घेत. डोळ्यात, नाकात (जवळ असलीच, तर) साखर ठासून भरीत. हाती लागेल ते गिळीत—तारा, ब्रश, दगड, चमचे,—सापडेल ते. तसाच प्रकार होता—गेनेडीने एकदम दोन चमचे गिळले होते. आधी त्याच्या सेलची कसून उलथापालथ करण्यात आली. परंतु नाही; ते तेथे नव्हते. तावडतोब गेनेडीला हॉस्पिटलकडे एक्स्—रे तपासणीसाठी नेण्यात आले.

हॉस्पिटलमध्ये जाणारा रस्ता, पॉवर्सच्या सेलवरून जात होता. गेनेडीने सरळ मुसंडी मारली आणि पॉवर्सच्या सेलच्या पीप्होलमधून आत डोकावून पाहिले.

—पुढे त्याने इतरांचे सांगणे मान्य केले. तो म्हणाला, 'बरोबर आहे बाबांनो तुमचेच. मी पॉवर्सला पाहिला.'

आम्ही सगळे गोळा झालो. गेनेडी पुढे बोलला, 'मोठा चैनीत आहे आदमी ! त्याचे केस नीट कापलेले होते, दाढी गुळगुळीत, कपडे त्याचेच होते आणि पोटाला मस्त खायला मिळाल्यासारखा दिसत होता प्राणी. मजा आहे बेट्याची. तुम्ही म्हणत होता, तेच खरे झाले शेवटी !'

पुढे गेनेडीला एकांतवासाची सजा झाली. एक्स—रे रिपोर्टमध्ये तो खोटे बोलल्याचे उघडकीला आले. गेनेडीने चमचे गिळलेच नव्हते !

## नको ते फिरणे

आम्हाला दिवसातून एकदा बाहेर काढण्यात येत असे. कैदी बाहेर फिरण्यास अगदी उत्सुक असतील, असेच एखाद्याला वाटावे. परंतु अवस्था अगदी उलट असे. तपमान ० अंशाच्या खाली —१५ ते ३० अंश असायचे. अंगावर नेहमीच्या कपड्यावर घालायला फक्त एक पातळसर कुडता—'पोंचो' मिळे; पोटात तर काहीच नसे आणि यार्डाभोवती पाय आपटीत, हात चोळीत, आम्हाला चालवण्यात येई. जे आजारी असत वा म्हातारे, अशांना तासभर कुंपणाशेजारी हुडहुडी भरलेल्या अवस्थेमध्ये लटलट कापत बसावे लागे. त्या फिरण्याच्या आपदेतून एरवी काही सुटका नसे. परत कोठड्यांकडे आल्यावरही काही विशेष फरक पडायचा नाही, कारण त्या सेल्स अगोदर थंडगार, जडशीळ पडलेल्या असत. चहाचे भांडेही गोठून जाऊ नये, म्हणून आम्ही त्याच्यावर रात्रभर 'पोंचो,' आणि चिंध्या झाकून ठेवीत होतो.

आंघोळीची हीच दशा. दर १० दिवसांनी आंघोळ असे. उन्हाळ्यात तो दिवस उत्सवासारखा असे, परंतु हिवाळ्यात मात्र—कसले काय, सैबेरिया—सारख्या भीषण

थंड प्रदेशात वाढलेल्या माझ्यासारख्याचेही हात, पाय गोठून ठार बधिर होत— बाथ हाऊसच्या शेवाळलेल्या भिंतीवरून बर्फाच्या चिपा जमलेल्या असत.

सगळे हाल सोशिकपणाने गळ्याखाली उतरविणारे देवभक्तही आमच्यामध्ये होते. त्यांच्या श्रद्धेला तोड नसे. सगळे काही देवाच्या इच्छेने चालले आहे, अशी त्यांची निष्ठा होती व त्या निष्ठेने ते सर्व हालअपेष्टांना तोंड देत. तरीही त्यांच्यापैकी फार मोठ्या संख्येने लोक व्लादिमिरच्या छळवादाकडे पाठविले जात असत-धार्मिक व्रतांच्या दिवशी काम करण्याचे नाकारण्याबद्दल, वा कामाचा कोटा पुरा न होऊ शकल्याने.

लेन्ट ! उपवास ! तेही इथे पाळणारे निर्धारी लोक होते. रोजचे जेवण आणि उपवास, यात फारसा फरक नव्हताच, परंतु या दिवसात मात्र केवळ ब्रेड व पाणी यावर राहणारे हे लोक. ॲड्मिनिस्ट्रेशन त्याना उपहासाने खाली पहायला लावण्यास नेहमीच उत्सुक असे, टपलेली असे. डॉक्टरकडे जाण्याची त्यानी इच्छा करताच जेलर्स म्हणत. 'अरेच्चा ! डॉक्टर ? ते कशाला हवेत तुम्हाला ? देवाला काढा हुडकून—तो करील की बरे तुम्हाला ! अगदी—झटपट !'

विश्वास ठेवणे कठीण आहे, हे मला समजते. परंतु असे माझ्यासमोर घडलेले आहे. कैदी आपल्या स्वतःच्या पोटाचा, वा हातापायाचा एखादा मांसाचा तुकडा कशाने तरी ओरबाडून काढीत, आणि एखादा कागदाचा तुकडा जाळण्यास सुरुवात करीत. काय चालले आहे, ते पाहण्यासाठी घाईघाईने गार्डस् आत घुसायचे. त्यांच्यासमोर मग हे कैदी, आपल्याच मांसाचा तो तुकडा त्या आगीवर खरपूस भाजण्याचा प्रयत्न करीत आणि तो तुकडा सरळ आपल्या तोंडात कोंबीत—

आमच्यापैकी एकही जण 'नॉर्मल' नाही, सर्वजणांच्या माथ्यांचे 'स्क्रू' ढिले पडले आहेत, याबद्दल आमची खात्री होती. जरूर, हे सर्व वेडेपणाचेच प्रकार होते. परंतु मग आम्ही इथे का होतो ? ईव्हन सोव्हिएट कायद्याप्रमाणेही, वेड्याला इस्पितळात तरी पाठवावे लागते वा त्याच्या नातलगांच्या सहवासात तरी त्याला ठेवला पाहिजे. परंतु आम्ही इथेच होतो. म्हणजे कायदा काही आम्हाला 'ढिल्या डोक्यांचे' म्हणत नव्हता; जर आम्ही 'नॉर्मल' होतो, तर असले वेडेपणाचे प्रकार शहाण्या, नॉर्मल लोकांना करायला लावणाऱ्या परिस्थितीबद्दल काय बोलावे ?

अगदी अनपेक्षितपणे, माझ्या सुटकेआधी वर्षभर मला व्लादिमीरमधून सोडण्यात आले. उन्हाळ्याच्या आरंभाला मला पोटमा इथे पुन्हा आणण्यात आले. कॅम्प ७. सास्नोका रेल्वे-स्टेशनवरून आम्हाला लेफ्ट-राइट करीत कॅम्पकडे नेत होते, तेव्हा मला फार आनंद झाला होता. रस्त्याच्या कडेने गवताची पाती उगवलेली दिसली. दोन वर्षांत मला गवत दिसले नव्हते.

[ उत्तरार्ध पुढील अंकी ]

# क्रीडा पारितोषिके

क्रीडापटूंच्या नावांची शिफारस संबंधीत क्रीडासंस्थाकडून न घेता जिल्हा परिषदा, साखर कारखाने, काँग्रेस कमिट्या यांच्याकडून घेतली जावी म्हणजे....

## शिवछत्रपती पारितोषिक नावाची खिरापत

प्रतिवर्षी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा गाजविणाऱ्या क्रीडापटूंचा गौरव करण्यासाठी केंद्र सरकारच्या क्रीडाखात्याने 'अर्जुन पारितोषिके' देण्याची प्रथा सुरू केली. त्या धर्तीवरच तीनवर्षापूर्वी महाराष्ट्रराज्याच्या क्रीडाखात्याने-देखील राज्यातील खेळाडूंचा गौरव करण्यासाठी शिवछत्रपती पारितोषिके देण्याचा उपक्रम सुरू करून खेळाडूंच्या गुणगौरवात आम्हीदेखील मागे नाही हे सिद्ध केले. पण केवळ तीनवर्षापूर्वीच सुरू झालेली ही प्रथा यावर्षी कटू टीकेच्या भोवऱ्यात सापडली आहे. यावर्षी पारितोषिकांसाठी निवडलेल्या खेळाडूंची यादी पाहिल्यास हे स्पष्ट होईल.

यावर्षी कुस्ती, खो खो आणि कबड्डी या खास महाराष्ट्रीय खेळांसाठी दिलेली पारितोषिके नियमानुसार, राष्ट्रीय स्पर्धांतील खेळाडूंच्या कामगिरीनुसार दिली आहेत काय याची शंका वाटण्याइतपत आश्चर्यजनक आहेत. पारितोषिकांसाठी पात्र असणाऱ्याच खेळाडूंची निवड केल्याने खेळाडूस बहुमान प्राप्त होतोच पण त्याहीपेक्षा पारितोषिकाचे प्रेस्टीज वाढते हे महाराष्ट्राच्या क्रीडाखात्यास आता समजावून सांगितले पाहिजे.

आता कुस्तीचेच उदाहरण पाहू. १९७१–७२ साली उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल दादू चौगुलेला हा बहुमान मिळाला. पण या पठ्ठ्याने गेल्या आणि यावर्षीच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये कोणती कामगिरी बजावली होती? गेली दोन वर्षे हा शिवछत्रपती पारितोषिकवीर या स्पर्धेत उतरलाच नाही. कारण या स्पर्धांसाठी रोख बक्षिसे किंवा इनामे मिळत नाहीत ना! पण क्रीडासचीव मेजर साळवी आपली बाजू सावरण्यासाठी खुलासा करतात, की आम्ही राष्ट्रीय स्पर्धांतील काम-

गिरीच विचारात घतो असे नाही; फारतर त्या कामगिरीस आम्ही शिफारस मानतो ! असा मुलखावेगळा खुलासा देणाऱ्या क्रीडासचिवांना मग प्रश्न करावासा वाटतो, की गावोगावी होणाऱ्या फडातील मल्लांचा या पारितोषिकांसाठी आपण विचार करता काय ! वल्लभभाई स्टेडियममध्ये सध्या चाललेल्या कुस्त्या नामक क्रीडाप्रकारांत भाग घेणारा एखादा महाराष्ट्रीय मल्ल दिसतो की काय ते आतापासूनच पाहिले पाहिजे. पण यावर्षी क्रीडाखात्याच्या अज्ञानाची झळ लागली राष्ट्रीय अजिंक्यवीर मारुती आडकरला. मामासाहेब मोहोळांची कुस्तीगीर परिषद या छोटया मल्लाच्या पाठीशी नव्हती. ती होती दादू चौगुलेच्या पाठीशी आणि क्रीडाखातेदेखील परिषदेची शिफारस ग्राह्य मानून दादू चौगुलेलाच पारितोषिकाची खिरापत वाटते.

खो खो मध्ये महिला विभागात उषा गोंडाणेची निवड करून हेमा नरवणकरवर उघड उघड अन्याय केला आहे. या खेळासाठी असलेल्या पारितोषिकावर नागपूरच्या भुटे गुरुजींच्या कन्याशाळेचाच हक्क आहे असा अलिखित नियम झाला आहे. अन्यथा ओळीने तीन वर्षे या शाळेच्या महिला खो खो पटूंस ही पारितोषिके मिळती ना ! उषा गोंडाणेचे नाव देखील क्रीडारसिकांना या पारितोषिकांद्वारेच माहित झाले आहे. विदर्भीय क्रीडासंघटकांच्या दडपणामुळे बिचाऱ्या हेमा नरवणकरचा बहुमान यावर्षी हुकला. हे पारितोषिक कोणत्याही दडपणास बळी न पडता दिले गेले आहे असे सदसद्‌विवेकबुद्धीस स्मरून मेजर साळवी सांगतील काय ?

## हास्यास्पद खुलासा

कबड्डी महिला विभागासाठी क्रांती नाबरची निवड करताना क्रीडाखात्याने नियम देखील गुंडाळून ठेवले. यावर्षी राष्ट्रीय स्पर्धेत आजारपणामुळे भाग न घेऊ शकलेल्या या खेळाडूस भविष्यकाळी हे पारितोषिक निश्चितपणे मिळाले असते, कारण तिच्या तोडीची चढाईपटू महिला खेळाडू सध्या भारतात तरी नाही. पण तिला पारितोषिक याच वर्षी मिळावे म्हणून प्रयत्न करणाऱ्या महाराष्ट्र राज्य कबड्डी असोशिएशनच्या काही पदाधिकाऱ्यांच्या खटपटीस यश आले खरे पण एक गुणवान खेळाडू मात्र निष्कारण वादात ओढली गेली. मेजर साळवींनी १२ एप्रिलला आणि देशी खेळांचे मंत्री ना. भाऊसाहेब वर्तक यानी पारितोषिक वितरण प्रसंगी केलेला खुलासा तर चमत्कारीक आणि हास्यास्पद आहे. ना. वर्तक आणि मेजर साळवी म्हणतात ' पारितोषिक देताना जानेवारी ते डिसेंबर या कॅलेंडर वर्षातील कामगिरीचा विचार केला जातो पण पारितोषिक मात्र एप्रिल ते मार्च या आर्थिक वर्षासाठी दिले जाते ' या खुलाशामुळे क्रान्ती नाबर फेब्रुवारी १९७२ ला झालेल्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धात भाग घेऊ शकली नसली तरी पारितोषिकास पात्र ठरते. क्रान्ती नाबरच्या क्रीडाकौशल्याबद्दल योग्य तो आदर राखून हे पारितोषिक या वर्षी राष्ट्रीय स्पर्धा गाजविणाऱ्या साधना धारिया किंवा अरुणा चव्हाण यांना

मिळावयास हवे होते असे वाटते पण या दोघींच्या नावाची शिफारस महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशने केलीच नाही कारण असोसिएशनचे काही पदाधिकारी क्रान्ती नावरच्याच नावाचा आग्रह धरीत होते.

या पदाधिकाऱ्यांपैकीच काहीजण तीन वर्षापूर्वी या पारितोषिकासाठी पुण्याच्या वासंती सातव (आता सौ. बोर्डे) चा विचार करताना झारीतील शुक्राचार्य बनले होते. वर्तमानपत्रातून टीका झाल्यावर मात्र वर्षाच्या नियमाकडे बोट दाखविले गेले होते. पारितोषिक देण्यासाठी विचारात घेतलेल्या वर्षात तिची कामगिरी खास मोठी नसेलही, पण त्या आधीच्या अनेक वर्षात, आपल्या चढाईच्या बहारदार खेळाने महाराष्ट्र संघास राष्ट्रीय अजिक्यपद मिळवून देताना किंवा साधना क्रीडा मंडळातून खेळताना मुंबईच्या बलाढ्य महिला संघाच्या तोंडचे पाणी पळवताना दाखविलेल्या क्रीडाकौशल्याची किंमत त्यावेळी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनला आणि क्रीडाखात्यास वाटली नाही काय ?

पारितोषिकासाठी खेळाडू निवडताना यावर्षी गोंधळाची परमावधी झाली. पुरुष कबड्डीपटूचे नाव जाहीर करतेवेळी २२ एप्रिल रोजी जाहीर झालेल्या खेळाडूंच्या यादीत पुरुष कबड्डीपटूचे नावच नव्हते. एक-दोन दिवसातच हे नाव जाहीर होईल असा खुलासा त्यावेळी मेजर साळवींनी केला, पण नाव जाहीर झाले ते पारितोषिक वितरण प्रसंगी ! आणि ही खिरापत मिळाली विदर्भाच्या रामू पवारला ! त्याला हे पारितोषिक मिळावे म्हणून विदर्भातील काही उच्च पदस्थ आणि पुढारी क्रीडाखात्यावर दडपण आणण्याचा प्रयत्न करीत आहेत असे वर्तमानपत्रात येताच बहुसंख्य क्रीडाप्रेमीच्या पुढे प्रश्न पडला. 'सांप्रती कोण हा नवा पुरुषावतार !' पण हा अवतार नवा नसून खूप जुना आहे. त्याची कामगिरी कोणती ? तर राष्ट्रीय स्पर्धेमध्ये प्रारंभीच्या साखळी सामन्यातदेखील अजिक्य किंवा उपअजिक्य न ठरलेल्या विदर्भ संघाचे नेतृत्व गेली काही वर्षे तो करतो ! विदर्भकरांचे दडपण आल्यावर बिचारे क्रीडाखाते तरी काय करणार ? सध्या जिकडे तिकडे चलती आहे विदर्भवाल्यांची !

या पारितोषिकासाठी म. रा. क. अ. ने यावर्षी वसंत सूदची शिफारस केली होती. पण रामू पवारची निवड करण्याचे अगोदरच ठरले होते. क्रीडाखात्याने मग वसंत सूदच्या नावाचा विचार का केला नाही ? कारण तो त्याच्या ऑफिसमधील एका प्रकरणात गुंतला आहे म्हणून. खरे पाहू गेल्यास कबड्डी असो. च्या अधिकाऱ्यांना हे सर्व ज्ञात होते. तरीही त्यानी एकट्या सूदचीच शिफारस केली. पुण्याचा बाळ कोंढाळकर किंवा सोलापूरच्या गौरप्पा पारशेट्टी यांची नावे या पदाधिकाऱ्याना सुचली नाहीत, की सुचलेली असताही त्यांची शिफारस होऊ नये असे त्यांना वाटत होते ?

कबड्डी, खो खो, कुस्तीमध्ये संबंधीत क्रीडापटूंच्या राष्ट्रीय स्पर्धातील कामगिरीचा

विचार न करता त्यांना पारितोषिक बहाल करण्यासाठी उतावीळ झालेल्या क्रीडा खात्याने भारताचा राष्ट्रीय खेळ असलेल्या हॉकीमध्ये पुरुष खेळाडूचे पारितोषिक कुणालाच दिले नाही ! शंकर लक्ष्मण नंतर त्याची गादी काही प्रमाणात समर्थपणे सांभाळणारा, भारतीय हॉकी संघातून गेली चार वर्षे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये चमकणारा गोलरक्षक सेड्रीक परेरा निवड समितीस कसा दिसू शकला नाही ?

## नियम हवेत कशाला ?

एक मे रोजी झालेल्या पारितोषिक वितरण प्रसंगी आणखी चार नावाची यादी जाहीर करून क्रीडा खात्याने अखेरचा धक्का दिला. या चारापैकी अजित वाडेकरला हे पारितोषिक दुसऱ्यांदा देताना नियमास अपवाद केला गेला. मला तर असे वाटते की नियम बनवून नंतर त्यांचा सोईस्कर अर्थ लावण्यापेक्षा किंवा त्यांना अपवाद करण्यापेक्षा नियम हवेतच कशासाठी ? दरवर्षी विदर्भास थोडी, मराठवाड्यास थोडी, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रास थोडी अशी पारितोषिकांची वाटणीच करावी. क्रीडापटूंच्या नावाची शिफारस संबंधित क्रीडासंस्थाकडून न घेता जिल्हा परिषदा, साखर कारखाने, काँग्रेस कमिट्या यांच्याकडून घेतली जावी म्हणजे भानगडच मिटली ! वाडेकरचे नाव इतक्या ऐनवेळी जाहीर केले गेले की त्याच्या कुटुंबियांसदेखील त्याचा पत्ता नव्हता, असे वर्तमानपत्रातील बातमीवरून दिसते. पुरवणीमध्ये रामू पवारचे नाव अखेरीस जाहीर करून अगोदरच उघड झालेले रहस्य समारंभपूर्वक उघड केले. पुरवणीतील दुसरी दोन नावे आहेत, क्रीडासंघटक यशवंतराव गोळे आणि दि. गो. वाखारकर यांची. अॅड. गोळेंना पारितोषिक देऊन क्रीडा खात्याने त्यांचा गौरव केला हे योग्यच झाले, पण वाखारकरांना पारितोषिक कशासाठी ? ते तर क्रीडा खात्यातीलच एक अधिकारी आहेत. खेळासाठी त्यांनी केलेली कामगिरी हे त्यांचे कर्तव्यच ठरते. आपल्याच खात्यातील एका अधिकाऱ्याचा अशाप्रकारे गौरव करणाऱ्या क्रीडा खात्यासच हे पारितोषिक देऊन गौरविले पाहिजे ! दक्षिण महाराष्ट्रात व्यायाम प्रसाराचे ध्येय घेतलेल्या मिरजेच्या म. द. करमरकरांचे किंवा पुण्याच्या शि. वि. दामल्यांचे नाव वाखारकरांच्या नावाऐवजी दिसले पाहिजे होते.

अखेरीस या पारितोषिकासाठी खेळाडूंची निवड करणाऱ्या क्रीडा खात्यातील महाभागांना एकच विनंती करावीशी वाटते, ' बाबांनो, त्या महान पुरुषाच्या नावे दिल्या जाणाऱ्या पुरस्काराची अशी खैरात करून त्याची रया कृपया घालवू नका !'

—चंद्रमोहन शिंदे

# १९७२ : चित्रपट पारितोषिके

रसिक

चित्रपटांना पारितोषिके देण्याची प्रथा आता तशी जुनी झाली आहे. चांगल्या चित्रपटांना चालना मिळावी, आणि शासकीय पाठबळाचा आधार मिळावा, म्हणून प्रथम केंद्र सरकारने ही पारितोषिके सुरू केली. 'शामची आई' या आचार्य-अत्रे यांच्या चित्रपटाने पहिले राष्ट्रपती सुवर्णपदक पटकावले. त्यानंतर प्रतिवर्षी ही पारितोषिके दिली जातात. त्यांची व्यापकताही आता वाढवण्यात आली आहे आणि दिल्या जाणाऱ्या रकमाही थोड्याफार वाढवल्या आहेत. वास्तविक आता वीस वर्षांची परंपरा झाल्यावर या पारितोषिकांना काही निश्चित स्थान प्राप्त व्हावयास हवे होते. परंतु वर्तमानपत्रामध्ये 'वृत्त म्हणून प्रसिद्ध झालेल्या चार ओळी आणि क्वचित जाहिरातीबरोबर प्रसिद्ध होणारा मजकूर यापेक्षा या पारितोषिकांची गंभीर दखल घेतली जात नाही. केंद्र सरकारच्या मार्फत दिल्या जाणाऱ्या या पारितोषिकांप्रमाणे बहुतेक सर्व राज्य सरकारेही आपआपल्या भाषेतील चित्रपटांना पुरस्कार देतात. या पारितोषिकांनाही जनमानसामध्ये अथवा चित्र व्यवसायात स्थान नाही. या पारितोषिकांपेक्षा आमच्या हिंदी जगतामध्ये 'फिलम फेअर अॅवॉर्डस' जास्त महत्त्वपूर्ण मानतात. हे असे का व्हावे ?

वर्ष संपले की पारितोषिकांबाबत सरकारी यंत्रणा हलू लागते. प्रथम केंद्रीय पारितोषिकांचा विचार करू. या पारितोषिकांसाठी प्रथम विभागीय समित्या नियुक्त होतात. व्यवसायातील एखादादुसरा प्रतिनिधी सोडला तर अन्य सर्व मंडळी सरकार नियुक्त असतात. समितीचा अध्यक्षही सरकारच नेमते. पारितोषिके घेऊ इच्छिणाऱ्या निर्मात्या दिग्दर्शकांना आपल्या चित्रपटाची प्रत या समितीच्या ताब्यात द्यावी लागते. ही समिती चित्रपट पाहून निवडक चित्रपटांची शिफारस करते. मद्रास, कलकत्ता आणि मुंबई अशा तीन ठिकाणाहून विभागीय समित्यांनी शिफारस केलेले चित्रपट केंद्रीय समिती पाहते आणि आपला निर्णय देते. या समित्यांवरील नेमणूकाबाबत काहीही निश्चित तत्त्वे अथवा कसोट्या नाहीत. केंद्रीय माहिती आणि नभोवाणी खात्याशी ज्याची लगट अधिक, मंत्र्यांपर्यंत ज्यांचे वैयक्तिक संबंध अधिक अशा मंडळींना या समित्यांवर नेमून भत्त्यांचा मलिदा चारला जातो. आणि ही मंडळी अविश्रांत परिश्रम आणि लाखो रुपयांचे भांडवल घालून निर्माण केलेल्या चित्र कृतींची वर्गवारी ठरवणार.–भाषा, विषय यांचा अलगपणे विचार न करता.

समिती सदस्यांच्या लायकीबाबत मीं जी शंका व्यक्त केली आहे त्याबाबत पुरावा देतो—

या वर्षीच्या केंद्रीय समितीचे एक सदस्य अशिश बर्मन यांनीच ही तक्रार नोंदवली आहे.

' समितीसाठी चित्रपटांचे कार्यक्रम चालू होते. विभागीय समित्यांच्या शिफारसी-प्रमाणे, त्याच अनुक्रमाने चित्रपट दाखवले जात होते. त्या दिवशी कलकत्ता विभागीय समितीच्या शिफारसीप्रमाणे अंतिम निवडीसाठी आलेला एक चित्रपट दाखवला जाणार होता. ठरल्या वेळेपूर्वी केवळ एक-दोन मिनिटे समितीच्या सदस्याबाई घाईने दाखल झाल्या. आज कोणता चित्रपट आहे. त्यांनी विचारले. ' सीमाबद्ध ' मी सांगितले.

दिग्दर्शक कोण – सत्यजित रे ?

अस्सं. कोणत्या भाषेत आहे हो बोलपट.

मी – बंगाली. –

भारतातील प्रथम श्रेणीच्या दिग्दर्शकाबाबत इतके अगाध ज्ञान असलेली स्त्री केंद्रीय समितीची सदस्य होती. दुसरे एक सदस्य शर्मिला टागोरचा एक चित्रपट पहात असताना शर्मिला आणि तिच्या सारखीच दिसणारी दुसरी स्त्री कलावंत यांच्यातील फरक समजु शकत नव्हते.

हे किस्से समितीच्या एका सदस्याने नोंदवले आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. अशी मंडळी जर सदस्य म्हणून काम करत असतील, तर आठवड्यात दोन चित्रपट पाहून आपले मत नोंदवणाऱ्या रसीक प्रेक्षकाचा निर्णय जास्त ' वजनदार ' मानला पाहिजे. सुदैवाची बाब इतकीच, की समितीवर १०–१२ सदस्य असले, तरी प्रत्यक्ष निर्णय केवळ ३–४ मंडळींच्या प्रभावाखाली घेतले जातात. आणि सुदैवाने ही मंडळी पुष्कळच अनुभवी व समजुतदार असतात.

## व्यवसायिकांचे हितसंबंध

सर्व साधारण धंदेवाईक सिनेमाचा निर्माता या पारितोषिकाबाबत उदासीन असला तरी काही विशिष्ठ निर्माते, दिग्दर्शक या पारितोषिकांकडे डोळे लावून बसलेले असतातच. ही मंडळी दिल्लीमध्ये स्वत:ची लॉबी तयार करतात. आणि समिती सदस्यांवर सर्व बाजूंनी दडपण आणले जाते. केवळ अशा दडपणामुळेच मद्रासच्या एम. जी. रामचंद्रन यांची या वर्षीचे सर्वोत्कृष्ट कलाकार म्हणून निवड झाली असल्याचा आरोप एका समिती सदस्यांनेच केला आहे. शुद्ध न्यायाची अपेक्षा असेल, तर समितीला व्यवसायिक मंडळींच्या संपर्कापासून दूर ठेवलेच पाहिजे. बंगाली चित्रपटांची, आणि व्यक्तिश: सत्यजित रे यांच्या चित्रपटांची निर्वीवाद गुणवत्ता मान्य करूनही या चित्रपटांनी, आणि त्या मागे असलेल्या मंडळींनी जे एक दडपणाचे वातावरण निर्माण केले आहे ते निषेधार्हच मानले पाहिजे.

या पारितोषिकांबाबत व्यावसायिकांच्या आणखीही काही गंभीर तक्रारी आहेत. पारितोषिकांसाठी दाखल झालेल्या चित्रपटांची एक प्रत निर्मात्याला दीर्घ काळासाठी गुंतवून ठेवावी लागते. लहान निर्मात्यांना हा बोजा सहन होत नाही. आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे चित्रपटाला पारितोषिक मिळाले, तर पारितोषिक प्राप्त चित्रपटाची प्रत सरकार जमा होते. म्हणजे पाच हजाराचे पारितोषिक घेणाऱ्या निर्मात्याला जवळ जवळ तेवढ्याच किंमतीची आपल्या चित्रपटाची प्रत सरकार जमा करावी लागते. अशा प्रकारे प्रतिची मागणी करणे अन्यायकारक आहे. पारितोषिकांसाठी दिली जाणारी रक्कम दुर्लक्षणिय नसली, तरी अत्यल्प आहे आणि ही रक्कम वाढवण्यात यावी, अशीही मागणी प्रतिवर्षी रेटली जाते.

## विलक्षण दिरंगाई

ही पारितोषिके प्रतिवर्षी फार उशीरा जाहीर केली जातात. पारितोषिके जाहीर होईपर्यंत पारितोषिक प्राप्त चित्रपटांचे वितरण पूर्ण झालेले असते. ६९ व ७० सालची पारितोषिके फार उशीरा जाहीर झालेली असली तरी ७१ ची पारितोषिके लवकर जाहीर झाल्याने या दिरंगाईचे तक्रारी बाबत पुढील काळात दक्षता घेतली जाईल असे दिसते. व्यवसायिकांची या पारितोषिकांबाबतची उदासिनता किती तीव्र आहे याची कल्पना येण्यासाठी काही आकडेवारी देतो. ७१ साली भारतामध्ये ४३३ चित्रपट तयार करण्यात आले. ७१ सालामध्येच २४० चित्रपटांचे वितरण झाले. तर स्पर्धेसाठी केवळे ८२ चित्रपट दाखल झाले. म्हणजेच वितरण झालेल्या चित्रपटांपैकी ३/४ निर्माते या पारितोषिकापासून दूर राहिले.

हीच परिस्थिती आणि हीच कारणे विविध राज्य सरकारांमार्फत दिल्या जाणाऱ्या पारितोषिकाबाबत दिसून येते. म्हणूनच महाराष्ट्रामध्ये घरकूल वरून वादळ उठते. केरळमध्ये 'सरसय्या' विरुद्ध जोरदार आवाज उठतो. निवड म्हटली की मतभेद आलेच हे जरी गृहीत धरले, तरी रसीक प्रेक्षक, आणि समिती सदस्य यांच्यामध्ये विलक्षण दुरावा निर्माण झाला तर त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटणारच. अशा प्रतिक्रियेचा भाग म्हणून राजा परांजपे यांनी त्यांच्या ऐन उमेदीच्या काळात घातलेला बहिष्कार आठवतो. हे असेच चालू राहिले, तर उदासिनता वाढणारच. या वर्षीच्या मल्याळम फिल्मस पारितोषिकांसाठी ५१ फिल्मसपैकी केवळ १८ फिल्मस पारितोषिकांच्या रिंगणात उतरतात. याचा अर्थ व्यवसायामध्ये या पारितोषिकांबाबत उदासिनता आहे असा निघतो.

तरुण रक्ताचे अनेक दिग्दर्शक कलावंत व्यवसायामध्ये उमेदिने उतरत आहेत. या गलथान यंत्रणेमुळे त्यांच्या चांगल्या कलाकृतीही नाकारल्या गेल्या तर अधीच घसरणीला लागलेल्या या पारितोषिकांच्या प्रतिष्ठेला केवळ वार्षिक उपचारा खेरीज जास्त अर्थ रहाणार नाही.

□ □ □

पुन्हा एकदा माता द्रौपदी

# दोन मुलाखती

प्रभाकर नारायण परांजपे

## बाबुराव सडवेलकर

नेपथ्यरचनाकार

सडवेलकर, तुम्ही नेपथ्यरचनेकडं कसे वळला ?

'एक शून्य बाजीराव'च्या वेळी मला प्रथम असं वाटलं, की आपण नेपथ्यरचना करावी. पण माझी संकल्पना प्रत्यक्षात आणणे फार खर्चिक झाले असते. म्हणून क्यूबिझमवर आधारलेली माझी ती संकल्पना कागदावरच राहिली. त्यानंतर मी 'बाई खुळाबाई'चे नेपथ्य केले. त्या नाटकातील काळाची दोन रूपे—थांबलेला काळ व गतिशील काळ — लक्षात घेऊन मी खुळाबाईच्या व्यक्तिमत्वाशी सुसंगत असे फ्युचरिस्ट नेपथ्य बनवले होते.

मराठी नाटकातील नेपथ्यरचनेबद्दल तुमचे काय मत आहे ?

आत्तापर्यंतच्या आपल्या नेपथ्याचा मुख्य उद्देश दृश्य आभास निर्माण करणे हा आहे. आधी रंगवलेले पडदे, मग त्रिमितिबद्ध रचना यातून आभासाचे टोक गाठले जाऊ लागले. पण एकेकाळी ताजी असलेली आभास संकल्पना आता अर्थशून्य व गैरलागू वाटू लागली आहे.

पौराणिक नाटकाच्या नेपथ्याबद्दल काय मत ?

ते बरेचसे झगझगीत व अति नक्षीदार (बॅरोक) असते. त्यातल्या कमानी गॉथिक शैलीच्या असतात. त्यामुळे पुराणकाळाशी ते नेपथ्य विसंगत वाटत राहाते.

'माता द्रौपदी' मधील नेपथ्याची संकल्पना तयार करताना तुमची भूमिका काय होती ?

महाभारतकालीन संकृती म्हणजे कनिष्कांच्या फार पूर्वीची संस्कृती. ती कशी असावी याची कल्पना करण्यात आली आहे. ती 'हिंदू' संस्कृती नव्हती. त्यामुळे

त्यावेळी हिंदू देवतांच्या प्रतिमा नसणार. पण वेगवेगळ्या शक्तींची – उदाहरणार्थ अग्नी, सूर्य, चंद्र, वरुण इत्यादी उपासना त्यावेळी होत असे. स्थापत्यात त्यावेळी फारसं कोरीव काम नसावं. त्यात लाकडाचा अधिक वापर असावा. कारण कर्णाचा वाडा चंदनाचा होता, असा उल्लेख आहे. लाकडावर रंगवण्याची प्रथा असावी. रंगही फक्त ' अर्थ कलर 'च्या मर्यादेतले – उदाहरणार्थ शाडूसारखा पिवळा, तांबड-मातीचा तांबडा, हिरवा, व चुन्याचा पांढरा. भिंती चुन्याने रंगवून मग त्यावर इतर रंगकाम केले जात असावे. भिंतीवर मनुष्याकृती असण्याचा संभव कमी. नक्षी कामात वापरलेले आकार भूमितीतले – म्हणजे चौकोन, त्रिकोण, वर्तुळ, इत्यादी असणार. कारण हेच आकार तांत्रिक उपासनेतही वापरले जात. स्थापत्यात कमानीही नसणार. पण महिरप असावी – वाड्यांमध्ये वर छत नसलेले चौक असावेत. या सर्व गोष्टींचा विचार करून नेपथ्यविषयक संकल्पना मी तयार केली.

आणि सर्प, सूर्य, चंद्र अग्नी यांचा वापर.

आदिमानवी श्रद्धेतील यातूविधीची प्रतीके (प्रिमिटिव्ह मॅजिकल सिम्बॉल्स) म्हणून ती वापरली. अश्वत्थाची म्हणजे पिंपळाची सात पानंही वापरली आहेत.

या प्रतिकांचा अर्थ ?

सूर्य = शक्ती, सर्प = सातत्य अश्वत्थ = वाढ (ग्रोथ), चंद्र = चंद्रवंश, इ. ' अस्सलपणा ' (ऑथेन्टिसिटी) म्हणून हे सारे ठीक आहे. तुम्ही केलेले नेपथ्य अतिशय देखणेही आहे. पण खरा प्रश्न असा आहे की ते नाट्यवस्तूशी नाटकातल्या भाववृत्तीशी – सुसंगत आहे का ?

हे मान्य. पण एकंदर कथेवरून, तिच्या अंतर्गत पुराव्यावरून त्या काळातील जीवनपद्धतीबद्दल अंदाज करता येतो. त्या अंदाजाशी विसंगत असे नेपथ्य करून चालले नसते. शिवाय नाट्यवस्तूशी सुसंगत साधण्याचा मी माझ्या पद्धतीने प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ, दुसऱ्या अंकातील मूळ टोन करडा (ग्रे) आहे, आणि तिसऱ्या अंकात तो लालसर व काहीसा मंद (डल्) होतो – हे नाट्यवस्तूचा विचार करूनच मी केले. अर्थात माझा प्रयत्न प्रेक्षकांपर्यंत पोचतो का हा वेगळा मुद्दा आहे.

काही जण असं म्हणतात की या नाटकाला भव्य नेपथ्य हवं होतं. ही भव्यता काळे पडदे व भक्कम खांब यांनी साधली असती. आणि हे नेपथ्य अधिक परिणाम-कारक झाले असते.

काळ्या पडद्यांवर नाटक करणे हाही आता एक संकेत झाला आहे. शिवाय महाभारतकालीन भव्यपणात एक आदिमानवी सोपेपणा (प्रिमिटिव्ह सिम-प्लिसिटी) असला पाहिजे, ही गोष्ट गृहीत धरली आहे. आणि मी दुसऱ्या अंकात

राक्षसांचा व तिसऱ्या अंकात कठड्यांचा उपयोग केला आहे तो अवकाश (स्पेस) वाढवण्याच्याच दृष्टीनं. अर्थात एकाच नाटकाचं नेपथ्य अनेक पद्धतींनी करता यणं शक्य असतं. पण अशा शक्यता असतात म्हणून एका विशिष्ट पद्धतीनं केलेलं नेपथ्य चुकीचं वा गैरलागू ठरत नाही.

पण नेपथ्याला भरीवपणा आलेला नाही त्याचं काय? भिंतीवर टांगलेल्या चित्राप्रमाणं 'माता द्रौपदी'चे नेपथ्य सपाट वाटतं.

ते नेपथ्यासाठी वापरलेल्या सामुग्रीमुळं—माझ्या रचना प्लायवुडवर रंगविल्या जाणे अवश्यक होतं. तसं झालं असतं तर त्याला जरूर ती स्ट्रक्चरल क्वॉलिटी आली असती. पण खर्च व दौऱ्यावर जातानाची वाहतूक या दोन गोष्टींमुळे निर्मात्यांनी प्लायवुडऐवजी कापड वापरलं.

व्यावसायिक रंगभूमीसाठी तुम्ही नेपथ्यरचना कराल का?

का नाही? नाटक मला आव्हान देणारे असले तर जरूर करीन.

□

## अशोक रानडे

### संगीतकार

रानडे, सडवेलकरांनी ज्याप्रमाणे नेपथ्यरचनेमध्ये अस्सलपणासाठी विशेष प्रयत्न केले तसे तुम्ही केले का?

काही विशिष्ट मर्यादेपर्यंत केले. या नाटकातले वातावरण, त्याचा काळ, त्याच्यातील गाढ धर्मश्रद्धा या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्या प्रस्थापित होण्यापुरता अस्सलपणाचा पाठपुरावा केला.

त्यासाठी तुम्ही काय केले?

व्हायोलिनसारखी त्या काळात नसलेली वाद्ये वर्ज्य ठरवली. औक्षणाच्यावेळी वाजवायच्या लयबंधामागची भावना आरतीची असली तरी त्यातून फार समकालीन संदर्भ जागृत होऊ नये म्हणून जैन मंदिरातल्या झांजांप्रमाणे मोठ्या झांजा वापरल्या. हव्या त्या टिंबरच्या झांजा निवडण्यासाठी मी झांजांचे बारा जोड घेऊन तीन तास बसलो होतो. तत्कालीन संगीतातील बंदिशीविषयी आपल्याला निश्चित अशी काहीच माहिती नाही. पण उत्तरकालीन संगीतातील रागांच्या बंदिशी वापरल्या तर कालविपर्यास होईल म्हणून मी टाळल्या.

पण हा अस्सलपणाचा आग्रह किती मर्यादेपर्यंत ताणावा ? काही झालं तरी हे नाटक आपण आज करतो, पाहातो आहोत; पात्रे मराठीतच बोलताहेत – संस्कृतात नाही; नाटकातून आजच्याच जाणीवा व्यक्त होताहेत. हे पाहाता अस्सलपणाचा आग्रह अस्थानी आहे, अनावश्यक आहे असं नाही वाटत तुम्हाला ?

अस्सलपणाचा हट्टाग्रह असू नये हे मान्य. पण ते वातावरण उभं तरी झालं पाहिजे. कारण त्याच वातावरणाच्या चौकटीत ह्या व्यक्ती वावरताहेत, घटना घडताहेत. अस्सलपणाचा हट्टाग्रह मी पार्श्वसंगीतात धरलेला नाही. त्या काळात तंबोरा नव्हता, पण मी त्याचा वापर केला आहे – त्यावेळी तंतुवाद्ये होती. या काडीच्या आधारावर ! ऋचा म्हणण्यासाठी अर्ध्या स्वराचा फरक करीत स्वररचना केली. त्या स्वररचनेच्या अस्सलपणाची खात्री मला नाही. पण नाटकात अभिप्रेत असलेले वातावरण निर्मिण्यासाठी ती रचना आवश्यक होती.

मला असं वाटतं, नाटक पाहताना तुमच्या पार्श्वसंगीताची वेगळी जाणीव होत नाही.

ते माझं यश आहे असं मी मानतो. मी दिलेले संगीत माझे संगीत म्हणून उभे राहण्यापेक्षा एका विशिष्ट नाटकातले संगीत म्हणून ते उभे राहावे असा माझा प्रयत्न असतो.

पार्श्वसंगीत संकल्पिण्याची तुमची प्रक्रिया सांगाल का ?

एखाद्या नाटकाचे संगीतदिग्दर्शन करताना त्याचे संकल्पन सांगीतिक दृष्टीने झाले आहे का हे मी पाहतो. तसे नसल्यास संहितेत कुठे संगीत कल्पिता आले असते, याचा अंदाज घेतो. संगीत देताना ध्वनींचे कोणतेही आकृतिबंध वर्ज्य मानीत नाही. पात्रांच्या आवाजाचे खास गुण, नाटकाच्या दिग्दर्शकाला अभिप्रेत असलेला नाटकाचा रूपरंग यावर माझ्या स्वररंगाची जात मी अवलंबून ठेवतो.

सर्वसाधारण संगीतदिग्दर्शनात काय होते ?

लोकांना विशिष्ट तऱ्हेचे संगीत आवडते वा समजते असे त्यामध्ये गृहीत धरून तेच लोकांना भरवले जाते. यामुळे प्रेक्षकांना आपण कमी लेखतो असं मला वाटतं. संगीत त्यांच्यापर्यंत पोचावं याचा ध्यास घेण्यापेक्षा प्रेक्षक नाटकातल्या संगीतापर्यंत पोचतील असा विश्वास बाळगणं मला अधिक निरोगीपणाचं वाटतं.


या नाटकातले संगीत 'सार्थ' व्हावे म्हणून तुम्ही काय योजना केली ?

उदाहरण म्हणून द्रौपदीची संगत करणाऱ्या स्वराकृतीचा उल्लेख करता येईल. पहिल्या दोन अंकांतील द्रौपदीचे व्यक्तिमत्त्व अभंग आहे, न बदलणारे आहे. पण तिसऱ्या अंकात ती पार बदलते. ती जीवनाच्या निरर्थकतेचा शोध घेऊ पाहाते;

जीवनाचा अन्वयार्थ लावू पाहाते. म्हणून पहिल्या दोन अंकांमध्ये एकाच प्रकारची स्वररचना तिच्याबरोबर वावरते. आणि तिसऱ्या अंकात ती स्वररचनाही बदलते. औक्षणाच्या वेळचा लयबंध व द्रौपदीची हालचाल यातून तिचे झपाटलेपण व्यक्त होते.

तुमच्या मार्गातही अडचणी आल्या का? कोणत्या?

पहिली अडचण म्हणजे या नाटकात जास्त वाद्ये (पावा, वीणा, मृदंग याखेरीज) वापरता आली नाहीत. दुसरे म्हणजे ध्वनी विशिष्ट तऱ्हेचा, विशिष्ट ताकतीचा आणि विशिष्ट दिशेने यावा ही माझी इच्छा आपल्याकडील तांत्रिक प्रगती पाहता पुरी झाली नाही. घुबडाच्या घूत्कारामुळे सर्वाधिक सावधान असलेली द्रौपदी प्रथम दचकते, मग भीम व मग मद्यपान करून अर्धजागृतावस्थेत असलेली मुलं अशा क्रमाने मला ध्वनीचा (घूत्काराचा) उगम व त्याची दिशा दाखवायची होती. पण तांत्रिक अडचणीमुळे हे शक्य झाले नाही. म्हणून मग हा सारा परिणाम दृश्य अभिनयातून साधण्याचे काम विजयाबाईंना करावे लागले. आणि सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे माझे संगीत (ही) दुर्बोध होणार की काय ही शंका! कारण आपला नाट्यसंगीताकडे पाहाण्याचा दृष्टीकोन. जास्तीजास्त वाद्यं वाजवून स्वतःकडे लक्ष खेचून घेणारे संगीत म्हणजे उत्तम संगीत अशी बऱ्याच जणांची कल्पना असते. ती मी पुरी करू शकत नाही.



# आतून कीर्तन वरून तमाशा

## एकूण सर्व त्रासदायक

दादू मारुती इंदुरीकर यांचे गाढवाचं लग्न यशस्वी करून 'आतुन कीर्तन वरून तमाशा' हे नवीन लोकनाटय जसराज थिएटर्सने रंगभूमीवर आणले आहे. दामू केंकरे यांच्यासारखा नाटकातला दर्दी दिग्दर्शनासाठी आणला असून शंकर घाणेकर हा नाटकातला यशस्वी कलावंत लोकनाटयामध्ये पुन्हा आणला आहे.

रामजोशी, पठ्ठे बापूराव या गाजलेल्या तमासगिरांना, तमाशा आणि कीर्तन यात विलक्षण जवळीक अढळली. बहुजन समाजाला रिझवण्यासाठी तमाशा-कीर्तनाचे सूत्र घेऊनच दाखल झाला. निदान पठ्ठे बापूरावांना तरी हाच अर्थ अभिप्रेत होता—

> लवकर यावे सिद्ध गणेशा
> आतमध्ये कीर्तन वरून तमाशा

या गणामध्ये त्यांनी हाच विचार मांडला. कालौघामध्ये तमाशा आणि कीर्तन यातील जवळीक संपली. सिनेमाचे भ्रष्ट अनुकरण सुरू झालं तेव्हा तमाशाचं खरं स्वरूप स्पष्ट करून तमाशा आणि कीर्तन यातील नात्यावर पुन्हा एकदा बोट ठेवावे अशा प्रेरणेतून श्री. अशोक परांजपे यांनी हे लिखाण केले आहे. हा विचार वेगळा असला तरी प्रत्यक्ष जे दिसते, ते समाधान देऊ शकत नाही.

वगापूर्वीच्या भागामध्ये किर्तनकार आणि शाहीर यांना एकत्र आणले आहे. प्रारंभी दोघेही आपली क्षेत्रे भिन्न आहेत असे मानत असले, तरी लेखकाला त्यातील जवळीक दाखवायची असल्याने प्रत्येक भागावर दाखल्यानिशी सुस्पष्ट निरूपण करीत कीर्तनकार आणि शाहीर यांना लेखकाने जवळ आणले आहे, इतके जवळ, की अखेरीस कीर्तनकार रसिकांसमोर सादर होणाऱ्या वगामध्ये भाग घ्यावयास तयार होतात. प्रारंभीच्या या संपूर्ण भागामध्ये तमाशा आणि कीर्तन यातील जवळीक सांगणे एवढेच उद्दीष्ट असल्याने पुष्कळ वेळा पुनरुक्तिचा दोष आढळतो. एकच विचार बिंबवण्यासाठी तास दीडतास खर्ची पडत असल्याने प्रारंभी बरा वाटणारा हा प्रकार नंतर त्रासदायक आणि पुढे कंटाळवाणा ठरतो.

वगाचा बाजही लेखक अशोक परांजपे यांना जमलेला नाही. पाणी बिघडल्याने ते पाणी पिणाऱ्याचं डोकं फिरतं आणि त्यावर उतारा—मानस सरोवर पाण्याचा.

अशा कल्पनेमध्ये राजा व प्रधान – कोतवालाचे नेहमीचे कथानक गुंफले आहे; लिखाण सामान्य असून 'प्रसंगी चवक बोअर करणारे आहे.'–अशा या कंटाळ-वाण्या प्रकारावर खरा उतारा आहे तो सुरेख नृत्ये आणि श्रवणीय संगीत यांचा.

बिजलीप्रमाणे नाचणाऱ्या मंगला आणि मधुमालती यांच्यावरच प्रयोगाचा तोल संभाळण्याची जबाबदारी येऊन पडली असून ही कामगिरी त्या चांगली संभाळतात. वगातील गीतेही बरी असून विश्वनाथ मोरे यांनी दिलेल्या चाली श्रवणीय आहेत.

'राया मला पुढयात घेऊन बसा....
आणि
खेळीमेळीत चालले होते
अन् तुला मी डोळ्यानं खुणवित होते...

या लावण्या छान वाटतात. नृत्येही गतिमान असून अपेक्षित परिणाम जरूर साधतात.

कलाकारांपैकी शंकर घाणेकर भरपूर मोकळीक घेत इतकी पदरमोड ऐकवतात की दामू केंकरे (दिग्दर्शक) आणि अशोक परांजपे यांनाही चमत्कार वाटावा. प्रकाश इनामदार, अशोक सराफ यांचा पति गेले ग काठेवाडी मधील रोल आपल्या ढंगात दाखवतात असे वाटते. अप्पासाहेब इनामदार कीर्तनकार बुवा म्हणून शोभून दिसतात.

देऊळ, आणि पाडाचे दृश्य चित्रीत केलेला पडदा पार्श्वभूमी म्हणून वापरण्याची कल्पना चांगली वाटली.

दामू केंकरे यांची दिग्दर्शक म्हणून निश्चित कामगिरी काय? या प्रश्नाचे उत्तर देणे स्वत: केंकरे यांनाही अवघड असावे असा विचार निश्चितपणे मनात येऊन जातो.

चावट असले तरी चालेल, परंतु रंजन भरपूर असले पाहिजे. अशी लोक-नाट्याच्या प्रेक्षकांची आपेक्षा असते. जसराजच्या या नवीन कलाकृतीमध्ये केवळ नृत्य आणि संगीत या दोनच बाजू या दृष्टीने समाधानकारक असल्याने प्रयोगाचे एकंदर भवितव्य कठीणच दिसते. ◻

# बाबला आणि मंडळी

## अस्सल फिल्मी करमणूक

घराघरात बुधवारी रात्री गरजणारी 'बिनाका' आणि विविध भारती व रेडिओ सिलोनवरून होणारा चित्रपट-संगीताचा धुमधडाका या संगीताची तरुणपिढी-वर किती जबरदस्त मोहिनी आहे याची साक्ष पटवतो. चित्रपट-संगीतामध्ये

न्हाऊन निघालेल्या रंजक रजनींची बरसात आजपर्यंत अनेक प्रति किशोर, प्रति लता यांनी केली आहे. अधूनमधून नव नवीन पार्टर्यांची त्यात भर पडत असते. आता कल्याणजी-आनंदजी यांचे बंधू बाबला (आहे की नाही अस्सल फिल्मी नाव !' एक नवीन संच घेऊन आले आहेत.

या मंडळींनी सादर केलेला पुण्यातील पहिला प्रयोग योग्यवेळी संपवल्याने समाधानकारक ठरला. प्रेक्षकांतून फिरक्या सुरू झाल्याच होत्या. प्रयोग थोडा लांबता तर बाबला कंपनीची अवस्था केविलवाणी झाली असती. बाबलाजींचा संच रंगमंचावर अवतीर्ण झाला तो थाटामाटात. रंगमंदीरातील प्रत्येक बेबीचा आणि स्पॉटचा त्यांनी भरपूर वापर केला. सुटाबुटातील वाद्यवृंदवाल्यांचा ताफा, नीटस साड्या नेसलेल्या नखरेल गायिका, आणि साभिनय गायन करणारे गायक, असा संच घेऊन उभ्या राहिलेल्या या पार्टीचा बाह्यात्कारी देखावा जमून आला, तरी कार्यक्रम सुरू झाल्यावर त्यांची ही शान ते कायम ठेवू शकले नाहीत. अशा कार्यक्रमांचे स्वरूप बहुढंगी ठेवावेच लागते, त्याप्रमाणे ते याही कार्यक्रमाचे होते. दिनेश-हिंगू (दो राहा फेम), लॉलीपाप (बाल कलाकार) आणि अस्मत (नृत्यांगदा) ही मंडळी जोड देऊन उभी होती. तोंड फाटेपर्यंत निवेदकांनी अस्मत वर स्तुतिसुमनांची उधळण केली, तरी अस्मत नृत्य, रूप, आणि पदलालित्य या बाबतीत बेताचीच होती. सुदैवाने तीन मिनटांच्या तबकडीवर तिचे नृत्य बसवले असल्याने अत्याचार होण्यापूर्वी ते संपून गेले. इन्ही लोगोंने (पाकीझा) आणि आणि राजा जानी (शराफत) ही दोन्ही नृत्ये अगदीच बेताची होती. चुना लगाके या गीतावर नृत्य करणारा लॉलीपाप उगाचच आगाऊपणा करून गेला. दिनेश हिंगू हा नकल्या ठीक होता. एकच संवाद विविध कलाकार कसे म्हणतील याचे त्याने दिलेले प्रात्यक्षिक समाधानकारक होते. त्याचा अशोक कुमार, बलराज सहानी व काही प्रमाणात दिलीपकुमार, झकास जमून आले. त्याचे अन्य दोन अॅटमस् अगदीच टुकार होते. जोड कलाकाराची कामगिरी अशी यथातथा आघाडी संभाळणारी होती. आता संगीत मैफलीकडे वळूया. ए वन म्हणून निर्विवादपणे दाद घ्यावी असे एकही गीत गायक देऊ शकले नाहीत. संपूर्ण कार्यक्रमामध्ये केवळ तीने गीते चांगली, म्हणण्या इतपत वठली. त्यात सर्वोत्तम म्हणून मनोहर यांनी गायलेल्या बॉम्बे गोवा मधील कुकुड कु या हलक्या फुलक्या गीताचा उल्लेख करावा लागेल. या गीताला 'वन्स मोअर'ची दादही मिळाली. त्याखेरीज कल्याणी मित्राचे दम मारो दम आणि नरेंद्र भन्साळीचे 'चिंगारी कोई भडके तो सावन उसे बुझाये' (अमर प्रेम) या गीताचा उल्लेख करावा लागेल. कांची रे कांची आणि ओ मेरी, ओ मेरी,–ही दोन गीते ठीक म्हणण्याइतपत रंगली. माळयाच्या मळयामंदी कोण ग उभी ? हे ७१ चे हिट् मराठी गाणे मनोहर आणि कांचन यांनी मनापासून म्हटले. तर कल्याणी आणि मनोहर यांनी 'मी डोलकर' या उत्तम कोळी

गीताची वाट लावून टाकली. वाद्यवृंदातील सोलो अॅटमस् अपरिचित असले, तरी कानाला चांगले वाटले. याच विभागात ड्रमरचे कौशल्य प्रकर्षाने जाणवले.

गायकांपैकी मनोहर (प्रति किशोर) व नरेंद्र भन्साळी हे पुरुष गायक चांगले वाटले. कल्याणीचा नखरा भरपूर असला आणि आवाजात गोडवा असला, तरी दम टिकत नसल्याने ती प्रभावी ठरू शकली नाही. स्वाभाविकपणे तुलनेने तिच्यापेक्षा कांचन बरी वाटली. अशा कार्यक्रमांची मदार प्रामुख्याने गायक-गायिका आणि वाद्यवृंदावर असते. या विशिष्ट कार्यक्रमाचा गाजावाजा पुष्कळ झाला होता. शिवाय बाबला—हे नामवंत संगीत दिग्दर्शकांचे बंधू; त्यामुळे प्रेक्षकांच्या अपेक्षा वाढल्या होत्या. अशा पद्धतीचे कार्यक्रम सादर करणारी अनेक मंडळी या कार्यक्रमास हजर होती. बाबलांचा हा संच उंचावलेल्या अपेक्षा पूर्ण करू शकला नाही. कार्यक्रमाने असमाधान दिले नाही, इतकेच समाधान घेऊन या मंडळींना मुंबईची गाडी पकडावी लागेल.

□ □ □

---


## ' राजस ' महाविद्यालयीन कथा-स्पर्धा

पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या ' राजस ' ललित मासिकाने, महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी एक कथास्पर्धा आयोजित केलेली आहे.

रु. १००, रु. ७५, रु. ५० व रु. २५ अशी पारितोषिके आहेत. कथास्पर्धेचा सविस्तर तपशील ' राजस' मधून दरमहा प्रसिद्ध होत आहे. शिवाय महाविद्यालयीन लेखकांनी यात अधिक संख्येने सहभागी व्हावे यासाठी संपादकांनी एक आवाहन केलेले आहे.

कथास्पर्धक हा महाविद्यालयीन असावा. त्या स्वरूपाचे एक शिफारसपत्र सोबत जोडलेले असावे.

कथालेखनाची मर्यादा सुमारे दोन हजार शब्दापर्यंतची हवी. कथा पाठविण्याची शेवटची तारीख **३० जून ७२** आहे.

राजस मासिक : महाविद्यालयीन कथा-स्पर्धा, श्री प्रकाशन, ४९५–४९६ शनवार पेठ, पुणे ३०, या पत्त्यावर लेखन पाठवावे.


---


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगांवकर**

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

प्रकाशनाच्या
वाटेवर

# एका पराभवाची कहाणी [ झुंड ]

लेखक : ब्रिगेडियर जॉन पी. दळवी

अनुवाद : अनंत भावे